# पाकिस्तानी वृत्तीचा प्रतिकार

आचार्य

दादा धर्माधिकारी

मे

१९४८

मूल्य तीन रुपये

प्रथमावृत्तीचे हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

★

मुद्रक : प्रकाशक :
दत्तात्रय नारायण ठाकूर
मॅनेजिंग एजंट
ठाकूर आणि कंपनी लिमिटेड,
महेश्वर मुद्रणालय, अमरावती

# प्रस्तावना—

अध्यापक चोरघडे यांनी दादा धर्माधिकारी यांचे लेख मराठी वाचकांपुढे मांडण्याचें ठरविलें, आणि त्यांतल्या पहिल्या हिंदु-मुस्लिम खंडाला निवेदनपर चार शब्द मी. लिहावे अशी मागणी केली. दादांच्या लिखाणाला निवेदनाची तशी कांहींच गरज नव्हती. पण प्रेमाला गरजेचीहि गरज नसते, त्याला कोण काय करणार ?

दादांच्या लेखनाची तऱ्हा बरीचशी मीमांसक असते. तदनुसार हिंदु-मुस्लिम समस्येची बारीक छाननी त्यांनी या लेखनांत केली आहे. बुद्धिवादी वाचकांच्या बुद्धीला अशी मीमांसा काबीज करूं शकते. आणि बुद्धींतला घोंटाळा गेला म्हणजे जीवन-शुद्धीला अनुकूलता होते. तसें कांही काम हे लेख करतील अशी आपण आशा करावी.

पण हिंदु-मुस्लिम समस्या आता गांधीजींच्या बलिदानानंतर शिल्लकच राहूं नये. एवढ्या बलिदानाने हिंदुस्थानांतील सर्व धर्मांची शुद्धि अथवा परिसमाप्ति झाल्याशिवाय गतिच कांही उरली नाही. दोहोंपैकीं कांही झालें तरी हिंदु-मुस्लिम समस्या उरायची नाही.

हिंदु-धर्म आणि इस्लाम एवढ्या पुरतीच दृष्टि मर्यादित केली, तर भागवत-धर्मी साधु-संतांनी दोहोंचा मेळ साधण्याचा प्रयत्न, जो आधींच आरंभिला होता तो गांधीजींनी परिपूर्ण केला आहे असें दिसेल. ह्यापुढें; (१) सामाजिक सुधारणेचें कार्य दोघांना भरपूर करायचें आहे (२) राजकीय क्षेत्रांत सर्व भेदातीत निर्मळ प्रजासत्ता स्थापावयाची आहे (३) आर्थिक क्षेत्रांत गरिबांचीं दुःखें दूर करणें हा एकमात्र धर्म ओळखायचा आहे. ह्या शिवाय अधिक किंवा कमी कांही करायचें नाही.

इतकें करून, व्यक्तिगत अथवा पांथिक उपासना ज्याच्या त्याने संभाळाव्या आणि समाप्त कराव्या. सर्व उपासनांचा शेवट आत्मज्ञानाने, आणि आत्मज्ञानांत होत असतो. दोन्ही धर्मांतील, आणि सर्वच धर्मांतील, सज्जनांनी आपलें आणि जनतेचें लक्ष आत्मज्ञानावर केंद्रित करावें. आणि सर्वांनी वर सुचविलेल्या कार्यक्रमाला लागावें. आणि हिंदु-मुस्लिम समस्या आता शिल्लक नाही असेंच समजून चालावें, असें मला वाटतें.

परंधाम, पवनार.
२२-२-४८

विनोबा.

# अनुक्रमणिका

★


| | | |
|---|---|---|
| | जात, जमात-वाद व बहुराज्यवाद | १-१४ |
| १ | धार्मिक कलह | १ |
| २ | अ-हिंदु आणि गोवध बंदी | १० |
| ३ | हिंदुत्ववाद की शबल राष्ट्रवाद ? | १९ |
| ४ | पाकिस्तानी प्रवृत्तीचा प्रतिकार | ३४ |
| ५ | ' मी हिंदुस्थानी नाही ' | ४७ |
| ६ | मानवतेचा मानदंड : गांधी | ५८ |

# जात, जमात-वाद व बहुराज्यवाद

* * *

कालक्रमणेच्या दृष्टीनें या लेख-संग्रहांतील लेख आतां जुने झालेले आहेत. पण तें फक्त कालक्रमाच्या दृष्टीनेंच. त्या लेखांत व्यक्त झालेले विचार जुने झालेले आहेत असें मात्र मला वाटत नाहीं. याचें कारण असें कीं, हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर आणि पाकिस्तानच्या निर्मितीनंतरहि " हिंदु-मुस्लिम " प्रश्न अद्याप कायमच आहे. त्याचें बाह्यस्वरूप बदललें असलें तरी अंतःस्वरूपाचीं सर्व लक्षणें पूर्ववत् विद्यमान आहेत. त्या लक्षणांची मीमांसा या लेखांतून निरनिराळ्या प्रसंगांच्या व विषयांच्या अनुरोधानें केली आहे.

" माझ्या देहाचीं शकलें झालीं तरी हिंदुस्थानचीं शकलें होऊं देणार नाहीं, ' अशी प्रतिज्ञा गांधींनीं केली होती. मुस्लीम लीग व कायदे आझम जिनासाहेब जेव्हां पाकिस्तानची मागणी करूं लागले तेव्हां दूरदर्शी व्यवहारज्ञांचे शिरोमणि राजाजी वैतागून म्हणाले, " अहो, देशाचे तुकडे करा म्हणणें, म्हणजे गाईचे हिस्से कर म्हणण्यासारखें आहे." पंडित जवाहरलाल नेहरू व इतर पुरोगामी विचाराचे पुढारी यांनी पाकिस्तानच्या कल्पनेची मनसोक्त टर उडविली. कांहीं झालें तरी आम्हीं पाकिस्तान मान्य करणार नाहीं असा कॉंग्रेसच्या वर्किंग कमेटीनें निर्वाळा दिला. पण केव्हां केव्हां प्रबल वस्तुस्थितिसमोर थोरामोठ्यांचाहि पराक्रम उणा पडतो. तसेंच झालें आणि पाकिस्तान अस्तित्वांत आलें.

जिना म्हणत होते, " आम्हांला आमचा वांटा देऊन टाका. म्हणजे आम्ही आपला वेगळा संसार थाटूं आणि मग आपण भाऊ भाऊ शेजारी म्हणून सुखानें आणि सख्यत्वानें नांदूं. कॉंग्रेसच्या धुरीणांना वाटलें पाकिस्तान देऊन टाकल्याने जर शेजारी या नात्याने गुण्यागोविंदाने नांदणें शक्य असेल तर संयुक्त राज्याऐवजी विभक्त राज्यहि पुरवलें. पाकिस्तान मान्य केल्यानें हिंदु मुसलमानांचा प्रश्न सोडविणें

सुकर होईल अशी त्यांची स्वाभाविकच समजूत झाली. म्हणून त्यांनीं देशाची फाळणी मंजूर केली पण तसें करतांना, 'आम्हांला द्विराष्ट्रवाद मात्र मान्य नाहीं,' असें निक्षून सांगितलें.

कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या वरील विधानाचें कित्येकांना आश्चर्य व बहुतेकांना वैषम्य वाटलें. इकडे मुसलमानांना पाकिस्तान देऊन टाकावयाचें आणि स्वतःला मात्र राष्ट्रीयत्वाच्या बंधनांनी करकचून बांधून घ्यावयाचें हें धोरण अर्थातच हिंदूंना आवडण्यासारखें नव्हतें. साधारण माणसाला वाटलें, "मुसलमानांना पाकिस्तान दिल्यानंतर आतां हिंदुस्थानांत संयुक्त राष्ट्रीयत्वाचा प्रश्नच शिल्लक राहात नाहीं. पाकिस्तान हें जसें मुसलमानी सत्तेचें क्षेत्र तसें हिंदुस्थान हें हिंदूंच्या सत्तेचें क्षेत्र बनलें पाहिजे. आतां त्यांत हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या, सांस्कृतिक समन्वयाच्या भानगडी आणण्याचें कारण नाहीं. पाकिस्तानांत मुस्लिम राज्य स्थापन झालेलेंच आहे. आतां हिंदुस्थानांत धडधडीत हिंदुराज्याची स्थापना न केली तर हिंदु संस्कृति व हिंदु जाती रसातळाला गेल्यावांचून राहाणार नाहीं."

सामान्य लोकांची व पुष्कळशा बुद्धिमान लोकांचीहि विचारसरणी अशा प्रकारची असल्यामुळे हिंदुत्ववादाला बरेंच अनुकूल वातावरण देशांत निर्माण झालें. हिंदुत्वनिष्ठ, नव्हे हिंदुत्ववादी संस्थांची प्रतिष्ठा व त्यांच्या सदस्यांची संख्या वाढूं लागली. मोठमोठ्या खंद्या राष्ट्रीयत्ववाद्यांनाहि, हिंदुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व ही भूमिका शुद्ध व संयुक्तिक वाटूं लागली.

अशी परिस्थिति असतांना गांधी, नेहरू जयप्रकाशबाबू व इतर प्रगतिवादी पुढारी यांनी, "आम्हाला हिंदुस्थानांत हिंदु राज्याची उभारणी करायची नाहीं." असें अट्टाहासानें प्रतिपादन करण्यास सुरुवात केली आणि कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीनें, 'आम्हीं पाकिस्तान स्वीकारलें असलें तरी द्विराष्ट्रवाद कधीहि मान्य केलेला नाहीं' या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला.

कांहीं लोकांना वाटलें, या पुढाऱ्यांच्या विचारांतच गल्लत आहे. इतर कांही लोकांना वाटलें, लोकांना भुरळ पाडण्यांत या चाणाक्ष मुत्सद्यांचा हातखंडा आहे. द्विराष्ट्रवादावर आधारलेल्या पाकिस्तानचा स्वीकार केल्यानंतर आम्हीं द्विराष्ट्रवाद स्वीकारलेला नाही, हें म्हणणें भोळेपणाचें तरी असलें पाहिजे किंवा मानभावीपणाचें तरी असलें पाहिजे, असेंच सर्वसामान्य लोकांना वाटलें. तेव्हां कॉंग्रेसपुढाऱ्यांच्या वरील प्रतिज्ञेत विचारांचा घोटाळा अथवा प्रतारणेचा प्रयत्न नाही याचा खुलासा करणें आवश्यक आहे.

आम्हीं नाइलाजास्तव दोन राज्यें मान्य केलीं म्हणून दोन राष्ट्रांचें तत्त्व मान्य केल्याचा आरोप आमच्यावर होऊं शकत नाहीं असें कॉंग्रेसला म्हणावयाचें आहे.

एकाच धर्माच्या, एकच भाषा बोलणाऱ्या, एकाच संस्कृतींत वाढलेल्या लोकांनीहि सोईकरितां, अगर अन्य कारणाकरितां दोन स्वतंत्र राज्यें, एखाद्या वेळीं करावीं लागतील. एकच भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश व संख्या फार मोठी असली तर राज्यकारभाराच्या सोयीकरितां त्यांचे दोन स्वतंत्र प्रांत करावे लागतील. पण म्हणून तीं दोन राज्यें, दोन स्वतंत्र राष्ट्रांचीं आहेत असें म्हणतां येणार नाही. आम्हीं पाकिस्तानी राज्याचा स्वीकार केलेला असला, तरी त्याच्या मूलभूत सिद्धांताचा स्वीकार केलेला नाहीं हा कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या म्हणण्याचा अर्थ आहे.

काश्मीरचा मुसलमान व केरळचा मुसलमान, कराचीचा मुसलमान व सादिया (आसाम) चा मुसलमान यांच्यांत एका धर्माखेरीज दुसरे कुठलेंहि समान तत्त्व नाहीं. त्यांचा रंग, रूप, रहाणी, चालीरीती, पोषाख, भाषा सर्व कांहीं निरनिराळे आहे. असें असूनहि त्या सर्वांनीं मिळून जवळ जवळ एकमुखानें पाकिस्तानची मागणी केली. 'आम्ही मुसलमान आहोंत म्हणून इतरांहून निराळे आहोंत, इतरांहून निराळे असण्यामुळेंच आम्हीं एक स्वतंत्र राष्ट्र आहोंत. स्वतंत्र राष्ट्र असण्यामुळे आम्हांला स्वतंत्र राज्य पाहिजे "—ही पाकिस्तानच्या मागणींतील मूलभूत भावना होती. हिंदुराज्याच्या स्थापनेची कल्पना अशाच स्वरूपाच्या प्रतियोगी भावनेवर आधारलेली आहे. म्हणून द्विराष्ट्रवादाचा स्वीकार केल्याखेरीज हिंदुराज्याच्या स्थापनेचें प्रतिपादन करतां येत नाही. ज्याला द्विराष्ट्रवाद नको असेल, त्याला हिंदु राज्याची कल्पना मान्य होणें शक्य नाहीं.

मुसलमानांनी द्विराष्ट्रवादाच्या अनर्थकारक सिद्धांताचा स्वीकार केला म्हणून आम्हीहि करूं अशी वृत्ति, शहाणपणाची ठरणार नाहीं. इतरांनीं अपसिद्धांत मान्य करण्याचें ठरविलें आणि आत्मनाशाचा मार्ग स्वीकारला म्हणून आम्हींहि त्यांचें अनुकरण करावें असें थोडेंच आहे.

म्हणण्याचा आशय असा कीं, आम्हीं पाकिस्तानचा स्वीकार केला असला तरी पाकिस्तानी वृत्ति आम्हांला आपल्या राज्यांत रुजूं द्यायची नाहीं. पाकिस्तानी वृत्ति म्हणजे धर्मावर किंवा जातीवर आधारलेली विच्छेद भावना. या प्रवृत्तीची पाळेमुळें आपल्या समाजांतून खणून काढणें हा पाकिस्तानच्या प्रतिकाराचा सर्वांत परिणामकारक व श्रेयस्कर मार्ग आहे.

पाकिस्तान निर्माण कसें झालें याचा अंमळ सूक्ष्म विचार केला तर सर्व गोष्टींचा आपोआप उलगडा होईल.

सबंध हिंदुस्थानांत मुसलमानांची संख्या दहा कोटी होती म्हणून त्यांची मागणी मान्य करावी लागली. द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मान्य नसतांहि पाकिस्तान मान्य करावें लागलें. हे दहा कोटी मुसलमान कसे व कोठून आले? परदेशांतून खात्रीने

आलेले नाहीत. परदेशांतून आलेल्या मूठभर मुसलमानांची संतती वाढत जाऊन त्यांची संख्या इतकी फुगली हेंहि म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. कारण संतति वाढविण्याच्या बाबतींत मुसलमानांपेक्षा हिंदु कमी पराक्रमशाली आहेत असें म्हणण्याचें धाडस कुणीहि करणार नाहीं. अर्थात् मुसलमानांची संख्या इतकी वाढण्याचें कारण दुसरें कांहीतरी असलें पाहिजे आणि त्याचा शोध हिंदु समाजाच्या प्रकृतींत केला पाहिजे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं ' हिंदु ' नांवाची व्यक्ति किंवा हिंदु नांवाचा समाज म्हणून अस्तित्वांत नाहीं. ' किराणा माला 'च्या दुकानांत जाऊन एखादें भोळें गिऱ्हाइक जर पावलीचा ' किराणा ' मागूं लागलें, तर दुकानदार त्याला सांगेल कीं बाबा माझ्याकडे, किराण्यापैकीं जिन्नस आहेत, ' किराणा म्हणून ' कुठलाहि स्वतंत्र जिन्नस नाहीं. त्याचप्रमाणें हिंदु समाज म्हणून जो जनसमूह ओळखला जातो त्यांत ब्राम्हण, मराठे, माळी, कुणबी, महार, मांग इत्यादि व्यक्ति व जाति आहेत पण हिंदु नांवाची व्यक्ति किंवा जात नाहीं. ' मुसलमान ' ही व्यक्तिहि आहे व समाजहि आहे. हा दोन्ही समाजांच्या आकृतींतील मूलभूत भेद आहे.

आतां त्यांच्या प्रकृतींतील मूलभूत भेदाचा विचार करूं या. हिंदुसमाज जातिमूलक असल्यामुळें तो अनाक्रमणशील दिसतो. मुसलमान समाज जातिमूलक नसल्यामुळें तो आक्रमणशील बनलेला आहे. हिंदूंची अनाक्रमणशीलता सहिष्णुतेचा किंवा औदार्याचा परिणाम आहे अशी सर्वसाधारण समजूत असली तरी वस्तुस्थिति तशी नाहीं. ' जात ' जन्मावर अवलंबून असल्यामुळें तिची संख्या वाढविण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही आणि ' हिंदुत्व ' हिंदू समाजांतील जातीहून निराळें अशी कांहीं स्वतंत्र व प्रत्यक्ष ' वस्तु ' नसल्यामुळे हिंदूंची संख्या वाढावेिणें या शब्दांना अर्थच राहात नाही. मुसलमानत्व नुसतेंच जन्मावर अवलंबून नाही. मुसलमान कुळांत जन्मलेल्या व्यक्तीला देखील तें स्वीकारावें लागतें. आणि मुसलमानेतराला वाटेल तेव्हां स्वीकारतां येतें. इतरांना मुसलमान समाजांत गोडीगुलाबीनें किंवा बळजबरीनें आणणें हें धार्मिक मुसलमानाला स्वतःचें कर्तव्य वाटतें. त्यामुळें तो असहिष्णु व आक्रमणशील बनलेला आहे. जन्ममूलक भेद आला की उच्च-नीचतेची भावना आलीच. या उच्चनीचतेच्या भावनेलाच व्यवहारांत सोवळें ओवळेंपणाचें स्वरूप प्राप्त होतें. सोवळेपणा म्हणजे इतरांना अपवित्र समजून त्यांच्यापासून लांब राहण्याची वृत्ति. माणसाचा स्पर्श अमंगल व अशुचि म्हणून टाळण्याची जी वृत्ति तिचें नांव सोवळेपणा. माणसाच्या संसर्गापासून, व्यवहारापासून, स्पर्शापासून फार काय सान्निध्यापासून देखील जो जितका लांब राहील तो तितका जास्त पवित्र मानला जातो. स्वतःच्या जातीखेरीज इतर जातींच्या माणसांच्या

हातचें पाणी देखील न पिणारा मोठा कर्मनिष्ठ, कट्टा धर्माचरणी माणूस म्हणून आदरास पात्र होतो. जो स्वतःच्या जातींत देखील परान्न घेत नसेल, तो आणखी सोवळा. जो स्वतःच्या कुटुंबांतहि आई व बायको यांच्या खेरीज इतरांच्या हातचें अन्न ग्रहण करीत नसेल तो त्याच्याहि पेक्षा एक पायरी वर आणि जो स्वतः सिद्ध केलेलेंच अन्न खात असेल असा 'स्वयंपाकी' सर्वांत पवित्र, सर्वांत श्रेष्ठ. अशीहि हिंदु समजांतील पावित्र्यवादाची चढती भांजणी आहे. हिंदु समाजांतील पावित्र्याला मानव-स्पर्शाचें वावडें आहे. 'अस्पर्श भावनेवर आधारलेलें पावित्र्य म्हणजे पावित्र्य नसून व्यवच्छेदकता आहे, तुटकपणा आहे, माणूसघाणेपणा आहे. अस्पृश्यतेच्या असामाजिक तत्वावरच ज्या समाजांतील शुचिता व धार्मिकता अवलंबून असेल तो समाज कसा बरें टिकावा ? समाजाच्या धारणेचें व स्थैर्याचें प्राणभूत तत्त्वच त्यानें झुगारून दिलेलें आहे. इतर समाजांशीं संघर्ष किंवा स्पर्श प्राप्त झाली असतां त्या समाजाचा टिकाव लागला तरच आश्चर्य.

सारांश, हिंदु समाजाचें व्यवहारनियमनाचें तत्त्व असामाजिक आहे, माणूस वगळण्याचें आहे. दुसरा जन्म घेतल्यावाचून म्हणजे शरीर बदलल्यावाचून जात बदलण्याची पात्रताच प्राप्त होत नाहीं. त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा व पावित्र्य जन्मावर अवलंबून रहातात पुरुषार्थावर राहात नाहींत. मी अमक्याच्या पोटीं जन्माला आलों म्हणून मोठा, तूं अमक्याच्या पोटीं जन्माला आलास म्हणून लहान, दुसरा जन्म घेतल्याशिवाय तुला माझी बरोबरी करतां येणें शक्य नाहीं—हें जातिभावनेचें थोड-क्यांत स्वरूप आहे. उच्चनीचतेची भावना ती हीच. 'तुला या जन्मीं माझ्या बरोबरीचें होतां येणार नाहीं, या भावनेंत अनाक्रमणशीलता असली तरी औदार्य किंवा सहिष्णुता खास नाही.

परिणाम असा झाला कीं, हिंदु समाजांत ज्या जातींना जन्मतःच प्रतिष्ठा किंवा सत्ता प्राप्त झाली नाही, त्या जातीमध्यें, हिन्दुसमाजाविषयीं अभिमान व जिव्हाळा उत्पन्न होण्याऐवजीं, तिटकारा व द्वेष निर्माण झाला. ज्या घरांत आपणांस मानाचें स्थान नाहीं, एवढेंच नव्हे, तर निवाऱ्याकरितां आंतल्या भागांत आश्रय देखील घेतां येत नाही, त्या घराला जर आग लागली तर आपल्याला दुःख होईल कां समाधानच वाटेल ? हिंदु समाजांतील प्रतिष्ठाहीन व अधिकारहीन जातींची मनोवृत्ति देखील अशीच बनली. त्यामुळे या देशांत मुसलमानांची संख्या सहज वाढली. ख्रिस्ति, फारशी किंवा यहुदी यांच्यातून फारसे लोक मुसलमान झालेले नाहीत. यांतील रहस्य आपण ओळखलें पाहिजे.

माणूस वैतागून किंवा टेकीला येऊन ज्या घराचा त्याग करतो, त्या घराबद्दल त्याला विशेष तिरस्कार व वैर वाटत असतें. तीच स्थिति या मुसलमान झालेल्या

हिंदूंची झाली. म्हणून आपल्या देशांत हिंदु-मुसलमानांचा प्रश्न ज्या भयंकर स्वरूपाचा आहे, तसा इतर देशांत मुसलमान व मुसलमानेतर यांचा प्रश्न नाही. अरबस्तानांतील ज्यू लोकांचा प्रश्न कांही अंशीं तशा स्वरूपाचा म्हणतां येईल. पण त्याचेंहि कारण ज्यू लोकांच्या ' अहं ' पावित्र्य वादांतच सांपडण्याचा संभव आहे.

या सर्व विवेचनांतील मुख्य मुद्दा असा कीं, यापुढे पाकिस्तानचा प्रतिकार करायचा असल्यास त्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे हिंदुस्थानांतून पाकिस्तानी मनोवृत्तींचा नायनाट करणें. ज्या जातिसंस्थेमुळें हिंदु समाजांत उच्चनीचतेच्या भावनेचा प्रादुर्भाव झाला, आणि मुसलमान समाजाचें संख्याबल व संगठन शक्ति वाढूं शकली त्या जातिसंस्थेचा अंत झाल्याखेरीज केवळ शस्त्रशक्तीनें किंवा सौम्य-बलानें हिंद राज्य कायम टिकणार नाही. जातिसंस्था कायम राहिली तर हिंदुसमाजाचें सामाजिक दौर्बल्य नाहीसें होणार नाही आणि हिंदुस्थानांतून सारे मुसलमान जरी हद्दपार केले तरी पुन्हा कोट्यावधी नवीन मुसलमान निर्माण झाल्यावाचून राहणार नाहींत. कारण समाजांतील बहुसंख्य वर्ग अनुकूल असल्याखेरीज नुसत्या कायद्याने धर्मांतर बंद होणें शक्य नाही. समाजाची आंतरिक शक्ति वाढल्याखेरीज केवळ बाह्य उपचारानें त्याला पुष्टि कशी लाभेल ! औषधांची देखील अनुकूल प्रतिक्रिया होण्याइतका कस शरीरांत असला तरच तें लागतें व सशक्त होतें.

गांधी व कॉंग्रेस यांनी परिस्थितींल हा मूलभूत दोष ओळखून हिंदुसमाजाच्या कमजोरीचें बिनचूक निदान केलें. हिन्दुसमाजांतील ज्या प्रतिष्ठाविहिन व अधिकार-विहीन जातीच्या लोकांनी धर्मांतर केलें त्यांच्या मनांत हिंदुधर्म व हिंदु संस्कृति यांच्याविषयीं तिरस्काराची व द्वेषाची भावना उत्पन्न झाली. हिन्दु समाजांत ज्यांना मानाचें व सुखाचें जिणें अशक्य वाटलें त्यांनी साहजिकच समाजान्तर करण्याचा मार्ग पत्करला. हिंदुस्थानांतील बहुसंख्य मुसलमान अशा हिंदुंचा बनलेला असल्या-मुळें हिंदी मुसलमानाची मनोवृत्ती व धोरण इतर देशांतील मुसलमानांपेक्षां अग-दींच निराळें आहे.

मुसलमानांचा प्रश्न आपल्या देशांत ज्या प्रकारचा आहे तसा तो जगांत इतर कोठेंहि नाहीं याचें एक करण वर सांगितलेंच आहे. दुसरेंहि एक कारण आहे. ज्याला जात सोडायची असेल किंवा जातीविरुद्ध बंड करायचें असेल त्याला हिंदु-समाजांत थारा नाहीं. जात सोडतांच येत नाहीं. मी ब्राम्हणत्व सोडलें, मी मराठापण सोडलें, असें कोणी कितीहि सांगितलें तरी जात सुटत नाहीं. त्याचप्रमाणें जात मोडतांहि येत नाहीं. मिश्रविवाह करावा तर एक नवीनच ' संकर ' जात निर्माण होते. अशी कुचंबणा झाल्यामुळें जात सोडण्याचे दोनच मार्ग उरतात. एक नवीन धर्म स्थापन करणें किंवा तितकें कर्तृत्व अंगीं नसल्यास, दोन विद्यमान धर्मांपैकीं

एखाद्या धर्माचा स्वीकार करणें. जाति-संस्थेच्या गुलामगिरीला व जाचाला कंटाळून ज्यांना जातीचा त्याग करावासा वाटला किंवा त्या संस्थेविरुद्ध बंड उभारण्याची इच्छा झाली त्यांना धर्मांतराखेरीज दुसरा मार्गच उरला नाहीं. बुद्ध, महावीर व नानक यांनी नवीन धर्मांची स्थापना केली आणि राममोहनराय, दयानन्द इ. सुधारकांनी नवीन पंथ काढले. नवीन धर्मपंथ स्थापन करण्याची शक्ति विशेष पुरुषार्थवान् व्यक्तींच्याच अंगीं असते. सामान्य जनांना तो मार्ग साध्य नसतो. म्हणून त्यांना जातीचा त्याग करायचा झाल्यास समाजान्तरच करावें लागलें. अशा रीतीनें ज्यांना जात सुसह्य वाटली नाहीं त्यांनी हिन्दुसमाजाचाच त्याग केला. या दृष्टीनें हिन्दुस्थानांतील मुस्लीम प्रश्न हिन्दु समाजाच्या जातीय प्रकृतीची नैसर्गिक प्रतिक्रिया आहे ही गोष्ट लक्षांत घेणें आवश्यक आहे.

अर्थात् ज्यांना ज्यांना जातिसंस्था अहितकारक व असामाजिक वाटली त्यांनी धर्मान्तर अथवा समाजान्तर केलें. त्याचप्रमाणें ज्यांना ती परवडली नाहीं किंवा असह्य झाली त्यांनी हिन्दुसमाजाचा त्याग केला. यावरून हें ध्यानांत येईल कीं, 'जात' व 'जातीयता' हें हिन्दुसमाजाचें वैशिष्ट्य आहे. हिन्दूंची संस्कृति 'जातिनिष्ठ'च आहे. त्या जातीयतेचा परिपाक हिन्द्वेतरांच्या सांप्रदायिकतेंत झाला आणि अशा-रीतीनें या देशांत विशिष्ट स्वरूपाचा हिन्दु-मुस्लीम प्रश्न उत्पन्न झाला. जगांतील इतर देशांतहि मुसलमान व मुसलमानेतर जमाती एकत्र किंवा शेजारी शेजारी रहातात, पण हिन्दुस्थानांत जसा हिन्दु-मुस्लिम प्रश्न आहे तशा स्वरूपाचा प्रश्न इतर कोठेंहि नाहीं.

पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर तेथें हिन्दूंना राहतां येणें अशक्य झालें. तें तत्त्वतः व व्यवहारतः मुस्लिम राज्य व मुस्लिम राष्ट्र झालें. याची प्रतिक्रिया हिन्दवासियांवर अशी झाली कीं त्यांचेवर मुस्लिम राज्य झालें, तर मग आमचेंच तेवढें हिन्दुराज्य कां नसावें? म्हणून हिन्दुस्थानांतून मुसलमानांना घालवून द्यावें अशी मागणी करण्यास त्यांनी सुरवात केली. घटकाभर असें समजूं या कीं त्यांची ती मागणी मान्य करण्यांत येऊन पाकिस्तान ज्याप्रमाणें निर्हिन्दु करण्यांत आलें त्याचप्रमाणें हिन्दुस्थान देखील निर्यवन अशी पुण्यभूमि झाली, तरी या देशांतून जातीयतेचा नायनाट होणार नाहीं. कारण जोंपर्यंत जात कायम राहील तोंपर्यंत 'जातीयता'हि राहणार आणि जोंपर्यंत जातीयता राहील तोंपर्यंत जातिनिग्रहहि राहील आणि त्याचप्रमाणें धर्मान्तर व समाजान्तर करण्याची प्रेरणा व प्रवृत्तीहि कायम राहील.

हिन्दुस्थानचा विशिष्ट प्रश्न 'जातिवाद' हाच आहे. जमातवाद हें जातिवादाचें अगदीं औरस अपत्य आहे. इतर देशांत 'वर्ग' आहेत पण 'जात' नाहीं. आमच्या

देशांत वर्गनिराकरणाबरोबरच जातिनिराकरणाची योजनाहि करणें जरूरीचें आहे. जोंपर्यन्त जात आहे तोंपर्यन्त हिन्दुस्थानांतील राज्य व समाज बलवान् व सुसंघटित होण्याची आशाच नको. हिन्दुस्थानांतून हत्याराचा कायदा रद्द केला; सर्वांना शस्त्रें बाळगण्याची मोकळीक ठेवली आणि लष्करी शिक्षण सक्तीचें केलें म्हणजे हिन्दी राज्य बलवान् होईल असा भोळा विश्वास कित्येकांना वाटतो. पण त्यांत फारसें तथ्य नाहीं. जातिभेद व जातिभावना कायम राहिली तर निरनिराळ्या जातींतील भेद-भावना अनपेक्षितपणें प्रबल होऊन 'यादवी'ची परिस्थिति उत्पन्न होईल.

यावर असा प्रश्न विचारण्यांत येतो कीं, "पूर्वी ज्यावेळीं भारतवर्ष हा बलाढ्य व समृद्ध देश होता त्याहिवेळीं जाती होत्याचना? मग त्यावेळीं 'यादवी' माजली नाहीं तर आतांच कां माजावी?" याचें उत्तर स्पष्ट आहे. जातिविशिष्ट समाजाची गोम आपल्या पूर्वजांना पूर्णपणें माहित होती. जेथें जात असेल तेथें खाणें–पिणें, उठणें–बसणें, धंदा करणें, इ. सर्व व्यवहार जातवारीनेंच झाले पाहिजेत. म्हणून त्यांनीं हत्यारें बाळगण्याचें व वापरण्याचें कर्तव्य एका जातीकडे सोंपविलें. त्यामुळें जातिविग्रहामुळें अन्तर्जातीय युद्ध होण्याचा संभव नाहींसा झाला. आणि शस्त्रें वापरण्याच्या बाबतींत असा प्रतिबन्ध घालून दिल्यामुळेंच यादवी टाळतां आली. आज आपण शस्त्रधारणाचा व शस्त्रप्रयोगाचा हक्क सार्वजनिक करूं इच्छितों. म्हणजे शस्त्रें बाळगण्याच्या बाबतींतील जुने जातीय निर्बन्ध नाहींसे करूं इच्छितों. म्हणूनच आपल्याला 'जाती'च नाहींशा केल्या पाहिजेत. तरच सुरक्षितता आहे, एरव्ही धोका आहे. 'जात' हेंच जातिवादाचें मूळ कारण आहे. जमातवादांतून द्विराष्ट्रवाद जन्म पावला आणि द्विराष्ट्रवादाची परिणति पाकिस्तानांत झाली. त्याच न्यायानें जाति-वादांतून '**अनंतराष्ट्रवाद**' उत्पन्न होईल आणि त्याची परिणति '**अनंतस्तानांत**' झाल्यावांचून रहाणार नाहीं. 'जातिवाद' व 'जमातवाद' आणि 'पाकिस्तान' व 'जातिस्तान' यांच्यांत हा असा अभेद्य व निकटचा संबंध आहे.

मुसलमानांनीं हिन्दुबरोबर रहावयाचेंच नाकारल्यामुळें त्यांना बळजबरीनें एकत्र ठेवणें दोघांच्याहि दृष्टीनें अहितकारक झालें असतें. दोघांत सारखें भांडण चालू राहिलें असतें आणि देशांत अशांतता उत्पन्न होण्याची भीति नेहमीं तशीच राहिली असती. एकदांचें मुसलमानांना निराळें राज्य तोडून दिल्यानें हिन्दु मुसलमानांचा प्रश्न एका रीतीनें सुटला. आतां हिंदुस्थानांत हिन्दूंना मुसलमानांचें भय वाटेनासें झालें आणि सरकारलाहि मुद्दाम लोकशाहीच्या व नागरिकत्वाच्या तत्वांना मुरड घालून मुसलमानांचें समाधान करण्याचें कारण उरलें नाहीं. पण प्रश्न सोडविण्याचीही युक्ति सर्वत्र अमलांत आणल्यास चांगलीच अंगाशी येण्याचा संभव आहे. हिन्दु मुसलमान हे भेद इतिहासप्रसिद्ध असले तरी जन्मसिद्ध किंवा निसर्गप्राप्त नाहींत. निदान

हिन्दूला तरी मुसलमान होतां येतें. पण हिन्दू-हिन्दूंतील भेद जन्मसिद्ध असल्यामुळें त्यांचा संबंध रक्ताशींच येतो. ते आपल्या रक्तांतच भिनलेले आहेत. ते कृत्रिम असले तरी त्यांचें निराकरण करणें सोपें नाहीं. पाकिस्तानची निर्मिति धर्मगत भेदामुळें झाली-धर्मान्तरानें धर्मगतभेद नाहींसा तरी करतां येतो. पण वंशगत भेदांचें निराकरण कसें करायचें ? 'जात्यंतर' हें जन्मांतरावाचून होत नाहीं. तेव्हां पाकिस्तान देऊन ज्याप्रमाणें मुसलमानांचा प्रश्न सोडविला त्याच पद्धतीनें हिन्दुसमाजांतील अन्तर्गत भेदांचा प्रश्न सोडवितों म्हटल्यास तीं 'जातीस्तानें' वज्रलेप होतील कारण आजच्या प्रमाणें पाकिस्तानांतील मुसलमानांना किंवा हिंदुस्थानांतील हिन्दूंना धर्मांतर करून दोन्ही 'स्थानां'चें एकच 'स्तान' किंवा 'स्थान' करतां येण्याची शक्यता आहे. तशा प्रकारची शक्यता जातिपरिवर्तनाचा मार्गच मोकळा नसल्यामुळें 'जाति-स्ताना'च्या बाबतींत उरणार नाहीं. त्यामुळें पाकिस्तानी वृत्तीचा उन्माद झाला इतका पुरे झाला, आतां यापुढें तिला मूठमातीच दिली पाहिजे, असाच दृढ निश्चय आपण करायला हवा. एरव्ही घडगत नाहीं.

आम्हीं पुन्हां पाकिस्तान व हिन्दुस्थान यांचें एकीकरण करून एक संघ भारतीय राज्याची पुनः स्थापना करूं, असा निश्चय मोठ्या हिरीरीनें जाहिर करण्यांत येतो. पण याचा अर्थ जर असा असेल कीं आम्ही लष्करी शक्ति संपादन करून पाकिस्तान-वर स्वारी करूं व तें काबीज करूं, तर पुन्हां राज्य एक झालें तरी द्विराष्ट्रवादाचा अन्त होणार नाहीं. एकराष्ट्रीयत्व हा भावनेचा प्रश्न आहे. भावना बळजबरीनें लादतां येत नाहीं. म्हणून पाकिस्तानवर ताबा मिळविण्याचे मनसुबे करण्यांत अर्थ नाहीं. उलट, आतां पाकिस्तान झालेलेंच आहे तर तें राज्य भरभराटावें, तेथें सुबत्ता व शांतता नांदावी अशीच वृत्ति आपण ठेवावी. आपण पाकिस्तानापेक्षां हिन्दुस्थानचीच काळजी अधिक करावी हेंच योग्य व हिताचें आहे. पाकिस्तानांत यादवी माजली किंवा आर्थिक दृष्टीनें पाकिस्तानची स्थिति हलाखीची झाली म्हणजे हिन्दुस्थानची शक्ति व वजन वाढेल अशा निषेधात्मक वृत्तीनें कल्याण होणार नाहीं. हिन्दुस्थानचें राज्य स्वयंपूर्ण, बळकट व प्रगतिशील कसें होईल याचाच ध्यास आपणास लागणें युक्त होईल.

ज्या वृत्तींतून व सामाजिक वैगुण्यांतून पाकिस्तानचा जन्म झाला त्या वृत्तीचा व वैगुण्याचा संपूर्ण बीमोड करण्याकडे आपलें सारें लक्ष एकवटलें पाहिजे. आपण द्विराष्ट्रवादाचा स्वीकार केलेला नाहीं. पाकिस्तानचा पायाच द्विराष्ट्रवादावर रचलेला आहे. म्हणून पाकिस्तानचें बाह्यस्वरूप व वृत्ति आणि आपल्या राज्याचें बाह्यस्वरूप व वृत्ति समान किंवा एक असूंच शकत नाहीं. हिन्दुस्थान म्हणजे पाकिस्तानची नक्कल किंवा अनुवृत्ति नव्हे. म्हणून पाकिस्तानांत जरी हिन्दूंना रहातां येणें अशक्य असलें तरी मुसलमानांना हिन्दुस्थानांत मात्र सुखासमाधानानें रहातां आलेंच पाहिजे. जे

मुसलमान किंवा इतर लोक द्विराष्ट्रवादी असतील त्यांना अर्थातच हिन्दुस्थानांत यारा राहू नये. ते राज्यद्रोही, फितूर किंवा पंचमस्तंभी आहेत. पण केवळ धर्मामुळें किंवा जमातीमुळें कोणालाहि नागरिकत्वाच्या हक्कांना मुकावें लागूं नये. पाकिस्तानांतहि हिन्दूंना संरक्षणाचें तोंडभर आश्वासन पाकिस्तान सरकारनें अनेकदां दिलें, पण तें त्यांना केव्हांच खरें करून दाखवितां आलें नाहीं. याचीं दोनच कारणें असूं शकतात. एकतर हें आश्वासन वरकरणी दिलेलें असलें पाहिजे आणि त्यांच्या मनींचा भाव निराळाच असला पाहिजे, किंवा दिलेलें आश्वासन अमलांत आणण्याची धमक व ताकद त्या राज्यांत नसली पाहिजे. म्हणजे कमजोरी किंवा लबाडी, राज्य करण्याला सामर्थ्याची उणीव किंवा अप्रामाणिकपणा यांपैकीं कुठला तरी एक आरोप पाकिस्ताननें कबूल केला पाहिजे.

उलटपक्षीं हिन्दी सरकारनें मुसलमानांना दिलेलें आश्वासन पूर्ण करण्याच्या कामी कोणचीहि कसूर केलेली नाहीं. बापूंनी तर मुसलमानांच्या सुरक्षिततेकरितां आपले अनमोल प्राण अनेकदां पणाला लावले आणि शेवटीं प्राणांचें मोलहि दिलें. बिहारांत मुसलमानांचें शिरकाण एक तर्जनी उगारून थांबविलें, कलकत्त्यांत मुसलमानांचें जीवित सुरक्षित केलें आणि दिल्लींत त्यांचें नागरिक जीवन पुन्हां शक्य करून दाखविलें. एकदां पाकिस्तान मान्य केल्यानंतर आतां आमच्या मनांत मळमळ किंवा जळजळ राहिलेली नाहीं, तुमचें राज्य तुम्हांला लखलाभ होवो, तुम्ही सुखानें नांदा व भरभराटा, अशी दिलदारीची वृत्तीच त्यांनी हिन्दुस्थानला शिकविली. आम्हांला द्विराष्ट्रवाद मंजूर नसल्यामुळें आम्ही त्याचा वास आमच्या नागरिक जीवनाला लागूं देणार नाहीं आणि जो कोणी द्विराष्ट्रवादाचें जहर आमच्या येथें आणण्याचा प्रयत्न करील त्याला तसें करूं देणार नाहीं. हिन्दराज्याची उभारणी निर्भेळ व व्यापक लोकशाहीच्या भक्कम पायावर झाली तर त्याच्या सामर्थ्याची व तेजाची प्रभा जगभर फांकेल. आम्ही ज्याला आश्वासन देऊं त्याचें रक्षणहि करूं शकूं ही गोष्ट जर जगाच्या प्रत्ययाला येऊं लागली तर आमची इभ्रत वाढेल व स्वराज्याची आमची शक्ति सिद्ध होईल. म्हणून हिन्दराज्यांत धर्मभेदामुळें किंवा जमातभेदामुळें कोणाच्याहि नागरिकत्वाच्या हक्कांना बाध येणार नाहीं. येथें सर्वांना बरोबरीचे हक्क रहातील अशा निर्भेळ लोकशाहीच्या तत्त्वावरच आपण आपल्या राज्यसंस्थेची उभारणी करणें श्रेयस्कर आहे. आमचें राज्य जर बलवान्, एकजिनसी व शुद्ध लोकसत्तात्मक झालें तरच कदाचित् पाकिस्तानचें व हिन्दुस्थानचें एकीकरण होण्याचा संभव राहील.

पाकिस्तान व हिन्दुस्थानच्या दोन राज्यांतील श्रमजीवी वर्गाची, म्हणजे किसान-मजुरांची, एक संयुक्त फळी उभारून त्या दोन देशांत ऐक्य स्थापन कर-

ष्ट्राची कल्पनाहि बोलून दाखविण्यांत येतें. ' जगांतील कामगारांनो एक व्हा, ' ही हांक परिचितच आहे. पण शेवटीं अनुभवानें ' एकाच देशांत समाजवाद, ' या तत्त्वाचा अंगीकार करावा लागला. त्याच न्यायानें हिन्दुस्थानांत आर्थिक भूमिकेवरून संघटन करणें इष्ट व आवश्यकहि आहे. आर्थिक पायावर संघटन केल्यास धर्मभेदांची व जातिभेदांची तीव्रता बरीच कमी होईल. पण वर्गविशिष्ट समाज व जातिविशिष्ट समाज यांच्यांतील भेदामुळें आपल्या देशांत वर्गविग्रहाला देखील धनिक जातीविरुद्ध प्रतिकारापासूनच आरंभ होण्याचा संभव दिसतो. त्यामुळें आपल्या देशांतील चळवळीचें स्वरूप द्विविध राहील. एकतर श्रमजीवी वर्गाची संघटना करणें आणि दुसरें जातिभेदांच्या निर्मूलनाकरितां उपाययोजना करणें. अशा रीतीनें हिन्दुस्थान हें सामाजिक व आर्थिक दृष्टीनें एकजिनसी राष्ट्र बनविणें हाच भावी उत्कर्षाचा व सामर्थ्याचा खरा मार्ग आहे.

जमातवाद, जातिवाद व बहुराज्यवाद हे तीन महाभयानक ग्रह आपल्या स्वराज्याला ग्रासूं पहात आहेत. ' धर्म निराळा म्हणून राष्ट्र निराळें ' हें द्विराष्ट्रवादाचें किंवा ' जमातवादा '-चें सूत्र आहे. आपल्या देशांत ज्या प्रमाणें पुरोहितांची व धर्मगुरूंची जात आहे त्याच प्रमाणें लष्करी जातीहि आहेत आणि राज्य करणाऱ्याहि जाती आहेत. या ' राजन्य ' जाती अनेक आहेत. धर्मवादी म्हणतो ' जितके धर्म तितकीं राज्यें ', जातिवादी म्हणतो, ' जाती तितकीं राज्यें ', भाषावादी म्हणतो, ' भाषा तितकीं राज्यें. ' भाषावार प्रान्तांची मागणी मोठ्या जोरानें करण्यांत येत आहे. पण नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेशांत ब्राह्मणांना वाटतें भाषावार राज्यें झालीं तर आपली मोठी कमबख्ती येईल. इतरांना वाटतें आजपर्यन्त या ब्राह्मणांनीं प्रमाणाबाहेर वर्चस्व गाजविलें, यांना आतां अजिबात वाळींत टाकलें पाहिजे. हीच वृत्ति बळावत गेली तर भाषावार राज्यांत पुन्हां जातवार राज्यें निर्माण होतील. सनातनी जातिवादी म्हणतो, राज्य करण्याचा ताम्रपट परमेश्वरानें फक्त एकाच जातीला दिलेला आहे. आधुनिक जातिवादी म्हणतो, राज्य करण्याचा मक्ता कुठल्याहि एका जातीचा नाहीं. तो सर्व जातींचा हक्क आहे. पण सर्व जातींना सारखे हक्क व सारखीच संधि दिल्यास पुढारलेल्या जातींना चांगलेंच फावेल. म्हणून जाती तेवढे ' सांस्कृतिकघटक ' (Cultural units) करून ' जाति तितकीं राज्यें ' करा. द्विराष्ट्रवादाचें ब्रीद ' नवी विटी नवें राज ' च्या चालीवर ' दुजा धर्म दुजें राज्य ' हें आहे. त्याच धर्तीवर ' भाषावार राज्यें, ' ' जातवार राज्यें ' निर्माण होऊन ' अनंतराष्ट्रवादाच्या व ' अनंतराज्यवादाच्या भुतांचें थैमान सुरू होण्याची भीति आहे. जातवारी आली कीं जमातवारी आली आणि जमातवारीच्या तत्त्वाचें मूर्तस्वरूप म्हणजेच पाकिस्तान.

हा फक्त कल्पनेचा खेळ नव्हे. १९०५ सालीं बंगालच्या फाळणीविरुद्ध प्रचण्ड चळवळ झाली. बंगाली मायबोलीच्या लेकरांची ताटातूट होऊं नये म्हणून त्यावेळीं

साऱ्या देशानें जिवापाड प्रयत्न केले. १९४७ साली त्याच बंगालचीं दोन शकलें होऊन त्यांची गणना निरनिराळया राज्यांत होऊं लागली पंजाबी बोलणारांचीं दोन राज्यें झालींच. जमातवादाचा प्रश्न अशा रीतीनें 'द्विराज्यवाद' स्वीकारून सोडविला. यालाच 'Cutting the Gordian knot' चें 'निगांठ कापून निगांठ सोडविण्याचें' तंत्र म्हणतात. जातिवादाचा प्रश्नहि याच तंत्रानें सोडवायचा झाल्यास अनवस्थाच उत्पन्न होईल, दुसरें काय. एकच भाषा बोलणारे भिन्न जमातींचे लोक एकत्र राहूं शकत नाहींत हें बंगालच्या व पंजाबच्या फाळणीवरून सिद्ध झालेंच आहे. महाराष्ट्रांत गेलीं कांहीं वर्षें जी प्रवृत्ति बळावत आहे तिचा जोर वाढत गेल्यास एकच भाषा बोलणाऱ्या भिन्न जातींचेंहि एकच राज्य होऊं शकेल कीं नाहीं याचीहि शंका वाटते. मुंबई-पुण्याकडील व नागपूर-वऱ्हाडकडील मराठी लोकांत अगदीं अलीकडे पर्यन्त हवा तितका परस्पर-विश्वास व आत्मीयता नव्हती. त्यामुळें त्यांचीं दोन वेगवेगळीं राज्यें किंवा उपराज्यें निर्माण होण्याचेंहि घाटत होतें. हा इतिहास अगदीं ताजा आहे. पण अशा रीतीनें एकच भाषा बोलणारांचीं दोन किंवा अनेक राज्यें झालीं तरी तीं दोन राष्ट्रें होत नाहींत ही भावनाच काय तें त्यांतलें 'संरक्षक तत्त्व' आहे. हेंच 'संरक्षक तत्त्व' पाकिस्तानच्याहि बाबतींत तारक ठरेल. पण त्यासाठीं धर्माधिष्ठित राष्ट्रीयत्वाचा विचारपूर्वक व निश्चयपूर्वक त्याग करावा लागेल हें उघड आहे.

गांधींच्या हत्येची जी प्रतिक्रिया मराठी प्रान्तांत झाली तिचीं बीजें महाराष्ट्राच्या भूमींत तशींच दडून राहिली तर जातवारीच्या राष्ट्रीयत्वाचा धुडगूस सुरू झाल्यावांचून रहाणार नाहीं. कराचीहून किंवा लाहोराहून पळून आलेल्या मराठी ब्राह्मणाला जर वाईंत किंवा मिरजेंत थारा मिळाला नाहीं तर त्याच्या दृष्टीनें पाकिस्तान व भाविस्तान सारखेंच ठरून अस्पृश्यांना जशी 'अछूतिस्ताना'ची गरज वाटूं लागली तशी त्याला 'जातिस्ताना'ची गरज भासूं लागेल. सांस्कृतिक स्वायत्ततेच्या गोंडस नांवाखालीं अहंभावाच्या भावनेवर आधारलेल्या या फुटीर प्रवृत्तींच्या हैदोसाला वेळींच आळा घालणें किती जरूरीचें आहे हें यावरून दिसून येईल.

संख्याबलाच्या उणेपणामुळें किंवा धन, शिक्षण, सत्ता इ. सामाजिक अधिकाराच्या साधनांच्या अभावामुळें ज्यांना खास संरक्षणाची गरज वाटते ते रक्षणकांक्षी गट 'अल्पसंख्य' किंवा 'मागासलेले' या सदराखालीं मोडतात आणि शुद्ध तात्त्विक दृष्टीनें त्यांची भूमिका प्रतिगामी स्वरूपाची बनूं लागते. कोठल्याहि समाजाच्या जितक्या ज्यास्त गटांवर ही पाळी येईल तितकाच तो समाज ज्यास्त विस्कळित व असंघटित. हिन्दूसमाज अल्पसंख्यांकाची कन्था आहे. तिच्यांत बहुसंख्य कोणीच नाहीं. सर्वच अल्पसंख्य—कोणी संख्याबलाच्या अभावीं, कोणी मागसलेले म्हणून. सर्वच रक्षणाकांक्षी. सर्वांनाच एकमेकांविरुद्ध रक्षण हवें. यांतच 'अनंतराष्ट्रवादा'चें

बीज आहे. हें विषबीज जाळून खाक केलें पाहिजे. एरवीं तरणोपाय नाहीं. कोणाला विशिष्ट संरक्षक सवलतींची किंवा निर्बंधांची गरजच उरणार नाही अशी परिस्थिति निर्माण करणें हाच अल्पसंख्यांकाचा प्रश्न सोडविण्याचा एकमात्र शास्त्रशुद्ध उपाय आहे.

या गुंतागुंतीच्या परिस्थितीचें बिनचूक निदान बापूंनीं केलें होतें. सम्प्रदायवादांतून पाकिस्तान जन्म पावलें. स्वधर्मप्रेमांतून संप्रदायवाद निर्माण होण्याचें कारण नव्हतें. त्याचप्रमाणें मातृभाषाप्रेमांतून प्रान्तवाद उत्पन्न होण्याचीं अशुभ लक्षणें दिसत आहेत. प्रान्तवादांत पुन्हां सम्प्रदायवाद आहेच. एक भाषा बोलणारांचा एकच प्रान्त झालेला दिसत नाहीं. प्रान्तार्गत सम्प्रदायवादाखेरीज हिन्दूंत पुन्हां जातिवाद आहे. ही अनर्थपरंपरा कोठें थांबेल हें सांगतां येणें शक्य नाहीं. म्हणून बापूंनी 'मूलेकुठारः'च्या वज्रमायेचा प्रयोग केला.

निर्भेळ व संग्राहक लोकशाहीचा पाया भारतीय लोकराज्याच्या राजधानींतच रचण्याकरितां त्यांनी आपला प्राण पणाला लावला. लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा त्यांनीं आपल्या प्राणांची कुरवंडी करून केली. कुठल्याहि भूमीवर पुण्यकार्याकरितां आसन मांडण्यापूर्वी भूमिशुद्धीकरितां तिचें प्रोक्षण करण्याची पद्धत आहे. अनेक सम्राटांच्या व राजांच्या राज्यलोभानें धर्मराजाचें हस्तिनापूरहि भ्रष्ट झालेलें आहे. तेथील भूमि लोकराज्याच्या 'आसना' करितां शुद्ध करायची होती. 'ये भूता विघ्न कर्तारः ते गच्छन्तु शिवाज्ञया,' असें वातावरण तेथें निर्माण करून राज्यवादाचीं, सम्प्रदायवादाचीं व जातिवादाचीं सारीं भुतें काढून टाकायचीं होतीं. म्हणून बापूंनीं आधीं उपवासाचें सात्त्विक व सर्वतः कल्याणकारी तप केलें. त्या तपानें दिल्ली पुनीत झाली व बापूहि धन्य झाले.

विशुद्ध व व्यापक लोकशाहीच्या स्वरूपलक्षणाचें द्योतक असे चार अर्थपूर्ण शब्द त्यांनी आपल्याला दिलेले आहेत. ( १ ) सर्वधर्मसमानत्व ( २ ) स्पर्शभावना ( ३ ) शरीरश्रम, आणि ( ४ ) दरिद्रनारायण.

( १ ) सर्वधर्मसमानत्व हा संप्रदायवादावर किंवा पाकिस्तानी वृत्तीवर तोडगा आहे. ( २ ) स्पर्शभावना हा जातिभेदावर रामबाण उपाय आहे. ( ३ ) शरीरश्रमाचें व्रत हा वर्गभावनेवर प्रयोग आणि 'दरिद्रनारायण' हा शब्द धनाढ्यतेच्या व आत्मसंभावितपणाच्या भावनेवर उतार आहे. या भावनाचतुष्टयाच्या आधार जनतेंतील 'सम्पन्न' व 'विपन्न', 'हरिजन' व 'परिजन', 'पाक' व 'काफिर' या भेदांचा नायनाट करण्याकरितां समाजव्यापी हृदयपरिवर्तन घडवून आणण्याच्या महायज्ञाचा आरंभ बापूंनी केलेला होता. हिन्दी लोकराज्य हें सर्व धर्मांच्या, सव जमातींच्या, सर्व जातींच्या–जात–जमात–वर्णनिरपेक्ष-श्रमजीवी सामान्य जनांचें राज्य

होईल असा त्यांचा संकल्प होता. ' रामराज्य ' म्हणजे सर्व धर्मांतील सत्यांशाचें राज्य. रामराज्य म्हणजे माणसामाणसांतील स्नेहयुक्त सहकार्याचें राज्य. हरामराज्य म्हणजे धर्मभेदांचें राज्य, हरामराज्य म्हणजे वर्गभेदांचें राज्य. हरामराज्य म्हणजे जातिभेदांचें राज्य. माणसांतील ' हरामा ' च्या भावनेचा नायनाट करून त्याच्या अंत:करणांतील ' रामा ' ला हिन्दी लोकराज्याच्या सिंहासनावर राज्याभिषेक करावयाची उत्कंठा त्यांना लागलेली होती. उपवासानें पुनीत केलेल्या त्रिभुवन मोलाच्या देहांतील गंगाजलापेक्षांहि पवित्र रक्तानें त्यांनी त्या रामराज्याच्या राजधानीचें प्रोक्षण केलें. भारतीय लोकशाहीचें दिल्ली हें पुण्यक्षेत्र झालें. आमचें भव्य राऊळ आमचें पवित्र देऊळहि झालें. तेथील भूमीचा स्पर्श ज्याला घडेल त्याची काया सोन्याची होईल.

होईल. सामाजिक व नागरिक जीवन आपापल्या संप्रदायावर आधारल्यास मानवतेचा कोंडमारा होईल व बंधुत्वाचें नांवहि राहणार नाही. सबब धर्म आणि व्यवहार यांचा समन्वय हाच मानवतेच्या रक्षणाचा आणि खरी लोकसत्ता प्रस्थापित करण्याचा एकमात्र उपाय होय. खऱ्या धार्मिकतेवर आधारभूत असलेली नागरिकताच खऱ्या-खुऱ्या लोकसत्तेची सखी किंवा अग्रदूतिका बनूं शकेल. सांप्रदायिक ऐक्य आणि त्याचें साधन-रूप म्हणून सर्वधर्मसमभावाला गांधीजी लोकसत्तात्मक स्वराज्याची किंवा लोकराज्याची पहिली शर्त जी मानतात ती येवढ्या साठींच !

जातीय संघर्षांची कारणमीमांसा करून त्याच्या मुळावरच घाव घालण्याचा उपाय काय, याचें दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न हाच प्रस्तुत लेखाचा उद्देश !

हिंदी "सर्वोदय"
डिसेंबर १९४०

११-११-४०

• • •

# अ-हिंदु आणि गोवध बंदी

★ ★ ★

"मी हिंदु आहें. पक्का शाकाहारी आहें. माझी माता आज जिवंत नाही ही दुःखाची गोष्ट आहे. पण गायीला मी आपल्या आई-प्रमाणे पूज्य मानतों. इतकें असूनहि मुसलमानांना हवें असल्यास गायीला मारण्याचा अधिकार असला पाहिजे, असें माझें ठाम मत आहे. स्वच्छतेचा नियम पाळून हिंदूंच्या भावना दुखावणार नाहीत अशा प्रकारें मात्र हें काम त्यांना करावें लागेल. आपसांत मित्र भावाने जर आपल्यास राहावयाचें असेल तर हा अधिकार मुसलमानांसाठी आवश्यक आहे. गाईला आम्ही अखेर याच मार्गानें वाचवूं, असें मला वाटतें. १९२१ मध्ये हजारों गायींचा जीव प्रत्यक्ष मुसलमान बांधवांच्या प्रयत्नांनीच वाचलेला आहे."

—मो. क. गांधी

हरिजन सेवक, २७ एप्रिल १९४०

गोवधाबाबत एका मुसलमान सज्जन गृहस्थांच्या प्रश्नाला गांधीजींनी दिलेल्या उत्तरांतून वरील वाक्यें उध्दृत केलीं आहेत. गांधीजींनी कित्येक प्रसंगीं असले विचार व्यक्त केले आहेत. तथापि त्यांतील अर्थाचें पूर्णतः आकलन फार थोड्यांना झालें आहे. त्यावर इथें थोडें विस्तृत विवेचन करण्याचा विचार आहे.

निरामिष आहाराची प्रतिष्ठा आणि गोपूजा हीं संस्कृतीच्या परमोच्च अवस्थेचीं लक्षणें म्हणून गांधीजी मानतात. गोपूजा हें हिंदुधर्माचें अनन्य वैशिष्ट्य होय, असें त्यांचें मत आहे. गाईला मातेसमान पूज्य मानणारे गांधीजी भिन्नधर्मियांचा

गोवधाचा अधिकार जेव्हा मान्य करतात, तेव्हा साधारण मनुष्याला अचंबा वाटतो. म्हातारा काय हवें तें बोलतो, असें त्यांना वाटतें. आणि तो त्यांच्यावर नाही नाही ते आरोप करूं लागतो. त्याला वाटतें " कसेंहि करून गांधीजी मुसलमानाला राजी राखूं इच्छितात. त्यांचें तेंच अधिदैवत आहे. त्यांच्या खुशामतीपुढे गांधीजींना न्यायाची व धर्माचीहि पर्वा नाही. "

हा आरोप कितपत खरा आणि न्याय्य आहे हें पाहूं. याच दृष्टीने प्रस्तुत प्रश्नाची मीमांसा येथे कर्तव्य आहे.

चौदा पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. राष्ट्रपति मौलाना अबुल कलाम आजाद यांचें नागपूरला एक मोठें मार्मिक व वैशिष्ट्यपूर्ण असें भाषण झालें होतें. नागपूरच्या मुसल्मानांना उद्देशून मौलाना साहेबांनी सांगितलें कीं " इस्लामांत मशिदीसमोर वाजंत्री वाजविण्याची मनाई आहे; म्हणजे मुसलमानांच्या धर्मपुस्तकांत आडकाठी आहे. जे त्या धर्मग्रंथांना पूज्य मानतात त्यांच्या पुरत्या त्या आज्ञा सीमित आहेत. त्या ग्रंथांवर ज्यांची श्रद्धा नाही त्यांच्यासाठी त्या धर्माज्ञा नव्हत. मशिदीसमोर वाजंत्री न वाजविण्याची आज्ञा मुसलमानासाठीं आहे. सबब त्यासंबंधी अन्य धर्मियांवर जबरदस्ती करणें गुन्हा आहे. "

मौलानासाहेबांचें या आशयाचें भाषण ऐकून नागपूरच्या हिंदूंना मोठा आनंद झाला. हिंदु-महासभेच्या एका प्रमुख कार्यकर्त्यांनी तर मला इथवर कबुली दिली कीं, " अहो, आजवर एकाहि मुसलमानाला इतक्या समजूतदारपणें बोलतांना ऐकलें नाही. "

माझ्या डोक्यांत मात्र विचारांचें काहूर माजलें. मी अस्वस्थ झालों. मौलानासाहेबांच्या कथनांतून काय काय अर्थ निघतो याची मी छाननी करूं लागलों.

एक सभ्य मुसलमान या नात्याने मौलानासाहेब वाजंत्री वाजविण्याच्या बाबत नागपूरच्या मुसलमानांना जर असें सांगू शकतात कीं मुसलमानेतरांवर यासंबंधी जबरदस्ती करतां कामा नये, तर मग गोहत्येच्या बाबतींत एका उदारचित्त हिंदूचें धोरण कसें असावें ? ह्या विचाराने मला अस्वस्थ केलें.

" गोवधनिषेधाची आज्ञा हिंदू धर्मग्रंथांची असल्यामुळे इतरांना ती शिरोधार्य नाही. आमच्या धर्मग्रंथांचें मूल्य त्यांना सदाचारासंबंधींचा एक ग्रंथ यापेक्षा जास्त नाही आणि म्हणून गोहत्येचा निषेध त्यांना बंधनकारक असूं शकत नाही. "

ह्या विचाराने मी बेजार झालों. माझ्या हृदयांत परंपरेने वसत असलेला गोभक्त हिंदु प्रक्षुब्ध झाला. तो हृदयस्थ गोभक्त हिंदु, माझ्या डोक्यांतील बुद्धिवादी हिंदूंशीं वाद घालूं लागला. त्यांच्यांतील वादाचें संक्षिप्त वृत्त खालीं दिलें आहे.

गोभक्त हिंदु— गोवध-निषेधाची आज्ञा फक्त हिंदूकरितांच आहे हें कबूल. परंतु दया-धर्म हा तर सर्वच धर्मांचा पाया आहे ना ? मग दया-धर्म म्हणूनच आम्ही अ-हिंदूंना गोरक्षण करण्यास कां सांगूं नये ? गायीला ते पूज्य मानीत नसले तरी जीवहिंसा हें तर सर्व धर्मांनी निषेध केलेलें पाप आहे. कोणताहि खरा धर्म जीवहिंसेचें समर्थन कसें करील ?

बुद्धिवादी हिंदु—बरोबर आहे तुमचें म्हणणें. 'दया धरम का मूल है' पण आपण या प्रश्नाचा आधारच बदलून टाकतां ! प्राणि-हिंसा निषिद्ध आहे म्हणतां तर यज्ञांत होणाऱ्या पशुहिंसेविरुद्धहि तुम्ही जोराची चळवळ नको कां करायला ? भूतदयेची दृष्टि लावल्यानंतर तुम्हांला गाय व इतर प्राणी यांत भेद करतां येणार नाही.

गोभक्त—यज्ञांतील धर्म-संमत हिंसेने बळी दिल्या जाणाऱ्या पशूंना मुक्ति मिळते. म्हणून ती हिंसा क्षम्य आहे.

बुद्धिवादी—मग ह्याच मुक्तीचा मार्ग तुम्ही गायीसाठी कां बंद करतां ? मुक्तीचें हें इतकें सुलभ साधन हातांशी असतांना आम्ही आमच्या प्रिय सग्यासोयऱ्यांना आणि गोमातेला त्या पासून वंचित कां ठेवावें ? गरीब बिचाऱ्या 'अजापुत्राला' बळि देण्याऐवजीं आम्ही आप्त स्वकीयांना व गोमातेला बळि देणें हें परम धार्मिकतेचें लक्षण ठरेल कीं ! यज्ञार्थ पशु-हिंसा करणें जर धर्म्य, न्याय्य व उचित आहे, तर मुसलमानांनी कुर्बानीसाठी केलेली गोहत्या अधर्म्य, अन्याय्य, अनुचित कशी ? ते गाय किंवा इतर जनावरांत भेद करीत नाहीत.

गोभक्तः—मुद्दाम हिंदूंना चिडविण्यासाठी म्हणून ते गायींची कत्तल करतात. गाय कापण्याची आज्ञा त्यांच्या धर्मांत थोडीच आहे ?

**बुद्धिवादी:**—आतां तर आपण वादाची दिशाच बदलून टाकली. तुमच्या खातर गायीऐवजी अन्य जनावराची कत्तल मुसलमानांनी करावी असें तुम्ही त्यांना समूं इच्छितां. याचा अर्थ तुम्ही दयाधर्माच्या आधाराने गोहत्त्येचा निषेध करीत नाही. मग मुसलमानदेखील तुम्हाला म्हणूं शकेल की, " तुमचाच आग्रह तुम्ही सोडून द्या. जें जनावर मला स्वस्त मिळतें त्याची मी कत्तल करतों. " कुर्बानीची आज्ञा मुसलमानी धर्मांत आहे किंवा नाही हें ठरविणें मुसलमानांचें काम आहे. हिंदूमध्ये देखील या मुद्यावर मतभेद आहेतच. कांही विद्वानांच्या मतें पूर्वीच्या काळीं भारतांत गवालंब ( गोमेध ) होत असे. हिंदुधर्मांत पशु–हिंसा विहित आहे असें कांही पंडित म्हणतात. आणि धर्मांत पशुहिंसेला स्थान असूंच शकत नाही, असें प्रतिपादन करणारेहि पंडित आहेत. या वीस बावीस वर्षांत महाराष्ट्रांत दोन सोमयज्ञ झाले. त्यावेळीं महाराष्ट्राचे धुरंधर पंडित ' ऋत्विक् ' आणि ' होता ' बनून त्यांत सामिल झाले होते. मांसाकडे डोळे वर करून पाहणेंहि त्यांना शक्य नव्हतें. परंतु उपरोक्त यज्ञांत त्यांनी आपल्या हातांनी बकऱ्याच्या मांसाची आहुति दिली आणि मांसाची एक एक गोळी प्रसाद म्हणून मोठ्या धर्मभावनेने घशाखाली उतरविली. सारांश, कोणत्या धर्मांत काय विहित आहे, याचा निर्णय तर त्या धर्माचे अनुयायीच करूं शकतात.

**गोभक्त**—पण अहिंदु कुर्बानीसाठीच केवळ गाई मारीत नाहीत. हजारो गाई खायला म्हणूनहि ते मारतात. ही क्रूरतेची पराकाष्ठा नव्हे काय ?

**बुद्धिवादी**—आहे खरी. हिंदुमध्येहि पुष्कळ मांसाहारी आहेत की ! कांही पुरातत्त्ववेत्त्यांच्या मतें प्राचीन काळीं गोमांस भक्षण केलें जात असे. मांसाहारांत जर क्रूरता असेल तर तो दोष दोघांचाहि आहे. फक्त अहिंदूवरच त्यासाठी आम्ही क्रौर्याचा आरोप करूं शकत नाही.

**गोभक्त**—परंतु ते लोक पशूंच्या बाबतींत कांही विवेक ठेवीत नाहीत. हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशांत गाय आणि बैल ही अत्यंत उपयोगी अशीं जनावरें आहेत. म्हणून यज्ञ व आहार यांसाठी त्यांचा उपयोग निषिद्ध मानला पाहिजे.

**बुद्धिवादी**—आतां आपण दयाधर्माचा सिद्धांत सोडून उपयुक्ततावादावर आलां आहांत. हा सिद्धांत फार भयंकर आहे. सांप्रत ' गोधन ' हा शब्द ' गोमाते '

पेक्षां तुमचें म्हणणें स्पष्ट करायला तुम्हांला अधिक उपयुक्त वाटेल. आतां आपण केवळ आर्थिक दृष्टीनेच गाईचा विचार करीत आहांत. या दृष्टीने गाय फक्त राष्ट्रीय संपत्ति ठरते. आपापल्या संपत्तीची जोपासना प्रत्येकाने करायलाच हवी. आपल्या कुत्र्यासाठी किंवा घोड्यासाठी हिंदु असो वा अ-हिंदु असो प्रसंगीं माणसांना मारायला देखील तयार होतो. हेंच काय पण स्वतःच्या जड संपत्तीसाठीदेखील एक दुसऱ्याची कत्तल करायला तो मागेपुढे पाहात नाही. गोभक्तीचा किंवा दया-धर्माचा प्रश्नच इथे उरत नाही. केवळ राष्ट्रीय अर्थशास्त्राच्या दृष्टीने इथे विचार केला पाहिजे व म्हणून सर्वच हिंदुस्थानी लोकांनी गोपालन करायला हवें. गायीला पवित्र मानून तिची सेवा करणें हा हिंदु आपला धर्म मानील आणि अ-हिंदु तिला अधिक उपयोगी प्राणी समजून तिचें पालनपोषण करील. गोवधाचा आत्यंतिक निषेध मात्र अहिंदुसाठी असणार नाही.

गोभक्तः—गांधीजी स्वतःला हिंदु म्हणवितात पण त्यांची गोभक्ति पोकळ आहे. केवळ उपयुक्ततावादाच्या दृष्टीने कुणीहि हिंदु गोरक्षणाचा विचार तरी कसा करूं शकतो? तुमचा बुद्धिवादी दृष्टिकोण अ-हिंदू आहे.

बुद्धिवादीः—हा बुद्धिवादी दृष्टिकोण केवळ माझ्यासारख्या कॉंग्रेसवाल्याचाच नाही. हिंदुमहासभेचे मूर्धाभिषिक्त नेते वीरवर सावरकर यांनीहि या विषयासंबंधी जें काय लिहिलें आहे तें उदाहरणादाखल देत आहें.

"गोठ्यांत उभ्या उभ्या गवतकडबा खात असलेल्या, एकीकडे खातांखातांच उभ्या उभ्या दुसरीकडे मलमूत्रोत्सर्ग निःसंकोचपणें करणाऱ्या, थकवा येतांच रवंथ करीत त्याच मलमूत्रोत्सर्गात स्वेच्छया बैठक मारून बसणाऱ्या, शेंपटीच्या फटकाऱ्यानें स्वतःच्या शेणमूत्राचा तो चिखल अंगभर उडवून घेणाऱ्या, दावें सुटून थोडी फेरफटका करण्याची संधि मिळतांच अनेक समयीं कोठेंतरी जाऊन घाणींत तोंड घालणाऱ्या नी तसेंच ओंठ चाटीत गोठ्यांत आणून बांधल्या जागाऱ्या त्या गायीस शुद्ध नी निर्मल वसनें नेसलेल्या सोज्वल ब्राम्हणानें वा महिलेनें हातीं पूजापात्र घेऊन गोठ्यांत पूजावयास जावें नी तिच्या शेपटीस स्पर्शून आपलें सोवळें न विटाळतां उलट अधिक सोवळलें आणि तिचें तें शेण नी मूत्र चांदीच्या पेल्यांत घोळून पितांना आपलें जीवन अधिक निर्मळलें असें मानावें? तें सोवळें की जें आंबेडकर महाशयासारख्या महनीय स्वधर्मबंधूच्या श्रेष्ठ मनुष्याची सावली पडतांच विटाळावें!

तें ब्राम्हक्षात्र जीवन की जें तुकारामासारख्या संताच्या नुसत्या पंक्तीस बसून सत्त्वस्थ दहीभात खाल्ला असतांहि भ्रष्टावें! तें सोवळें नी तें ब्राम्हक्षात्र जीवन त्या गोठ्यां-तल्या अमंगळखाऊ गाईच्या मलमूत्रांत लडबडलेल्या शेपटीस शिवतां सोज्वळावें, गोमय-गोमूत्र पितां निर्मळावें, पवित्रावें! पशु तो देव, देवासारखा माणूस तो पशु!" (" सावरकर साहित्य " भा. १ पृ. ८६-८७)

" मनुष्याला अधिकाधिक उपयोग ज्यायोगें होईल अशा प्रकारेंच गाईची जोपासना करावयाची असेल तर तो हेतु साधण्यास गोपालन हें राष्ट्राचें कर्तव्य होय असेंच सूत्र राष्ट्रापुढें ठेवलें पाहिजे. गोरक्षण हा धर्म आहे, तें ऐहिक आणि पारलौकिक पुण्य आहे, गाय ही देवता आहे इतकेंच नव्हे, तर तिच्यांत एक सोडून तीस कोटी देवता राहतात प्रभृति बाष्कळ कल्पनांवर अनुष्टुपें रचून गोपूजन हाच हिंदु धर्म आहे हें सूत्र राष्ट्रापुढें ठेवल्याने गाईचें रक्षण तर हवें तसें होत नाहीच, पण भाबडेपणाची प्रवृत्ति राष्ट्रांत वाढून गोभक्तिपायीं राष्ट्रभक्तीचेंच खोबरें होतें. मनुष्याच्या हिताचाच बळी गायीपुढें देण्यांत येऊन गोरक्षणांतील मूळ हेतूलाच धक्का पोहोचतो. कितीहि उपयुक्त असला तरी तो एक पशु, त्या गाईला देवता मानल्याने सामान्य लोक तिची जोपासना उत्कृष्टपणें करतील म्हणून तिला देवता मानावी, गोपूजन हा धर्म मानावा, ही समजूत अशी खुळचट ठरते. समाजाच्या बुद्धिहत्येस कारणीभूत होते.

" कारण उपयुक्ततेच्या दृष्टीनें देखील गाईचें इतकें स्तोम माजविणें चुकीचे आहे. घोडा आणि कुत्रें हे दोन पशु तरी गाईहून आधी, निदान गाईबरोबरच मनु-ष्याचे प्राचीन काळापासून अत्यंत एकनिष्ठ सेवक झालेले आढळतात. कृषीयुगाच्या नी गोपालन युगाच्या आधींच्या मृगयायुगांत मनुष्य भटकत होता तेव्हा देखील गाईपेक्षां कुत्रें नी घोडा हेच त्याच्या जिवास जीव देणारे संवगडी असत. मृगयेंत सावज पकडतांना आपल्या धन्याच्या जीवासाठीं हिंस्र पशुंवरहि चाल करून जाणारा, घरादाराचें चोरांचिलटांपासून रात्रंदिवस रक्षण करणारा, धनी निजला तरी आपण जागें राहून मध्यरात्रींहि आलोचन पाहारा देत राहणारा, ज्या गाईस आम्ही देवता म्हणून गौरवतों तिच्या खिल्लारांसहि अनेक प्रसंगीं ज्याच्या तिखटपणामुळेंच निर्भयपणें रानावनांत चरतां येतें, आजवर जो प्राणी पोलीसांची सुबुद्ध कर्तव्येंहि युरोपसारख्या देशांत करूं लागून मनुष्य समाजाची जवळ जवळ माणसासारखी सेवा करीत आहे, त्या कुत्र्याचा उपयोग मनुष्य जातीस काय थोडा थोडका झालेला

आहे ? गाईने दूध दिलें तर कुत्र्यानें अनेक प्रसंगीं मनुष्यास जीवदान दिलेलें आहे. मुलांचा मित्र, मृगयेची बंदूक, घराचें कुलूप, पडतों दाराशीं, खातों भाकरीचे तुकडे, करून घेतों साऱ्याची हडहड, नुसतें यू म्हटलें कीं चटकन त्यानें पाय चाटूं लागावें इतका विनम्र, संकटांत जिवास जीव देण्याइतका कृतज्ञ, शिवाय शेतकऱ्यांपासून शाहूसम्राटापर्यंत ज्याचा त्याचा एकनिष्ठ चाकर! त्या कुत्र्यास सन्मान कोणता, वेतन काय ? तर त्याचें नांव ही एक शिवी; जात अस्पृश्य ! उपयुक्ततेंत घोड्याची योग्यताहि तशीच निस्सीम. " ( वरील ग्रंथ पृ. ९३-९५ )

" मग गाय हा उपयुक्त पशु आहे, यास्तवच त्याला देवता कल्पून आपण हे सारे वेडेचार, जे गायीच्या प्रकरणीं करतों, तेहि निव्वळ बाष्कळपणाच, मूर्ख-पणाच म्हणावयास नको काय ? घोडा, कुत्रा, गाढव ह्या उपयुक्त पशूंत, गायींत आहेत ते वांच्छनीय गुण नसले तर त्यांच्यांत जे मनुष्यांस अत्यंत आवश्यक गुण आहेत ते गायींत नाहींत. " ( वरील ग्रंथ पृ. ९७ )

**गोभक्त**–सावरकरांनी मांडलेले विचार हे उपयुक्ततावादी अर्थशास्त्र्याचे होते. परंतु गांधीजी तर स्वतःला गोभक्त आणि गो-सेवक म्हणवितात. या विचारांचें समर्थन तें कसें बरें करूं शकतात ?

**बुद्धीवादी**–भूतमात्राच्या ठिकाणीं प्रेम हाच गांधींच्या गोभक्तीचा आधार आहे. मनुष्येतर प्राण्याबद्दलच्या बंधुभावनेचें उपलक्षण म्हणून ते गोभक्ति मानतात. ' माझे पशुबंधु ' म्हणून त्यांनी एका ठिकाणीं उल्लेख केला आहे. " माझ्या दृष्टीने गाय म्हणजे जिवंत कविता, " असें उद्गार त्यांनी गायीसंबंधी काढले आहेत. परंतु गोभक्ति आणि गोपूजा शिकविणारी त्यांची अहिंसा त्यांना मानवपूजा आणि मानवभक्तीहि शिकविते. गोहत्त्येपेक्षा मनुष्यहत्त्या ते कमी निषिद्ध मानीत नाहीत. हीच कल्पना सावरकरांनी आपल्या पद्धतीने " पशु देव होतो आणि देवतुल्य मनुष्य पशु होतो " या शद्बांत मांडली आहे. म्हणून गोरक्षणासाठी मनुष्यहत्त्या करण्याने गोरक्षणाचा मूळ उद्देशच मुळीं ठार होतो असें गांधी म्हणतात. केव्हा केव्हा अंध दयावाद हा अहिंसा धर्माच्या मुळावर कुठाराघात करतो. याचें एक विचित्र उदाहरण बर्ट्रांड रसलेने " वीच् वे टू पीस "नांवाच्या पुस्तकांत दिलें आहे. तें असें—

" इटली देशांत कोण्या एके काळीं धर्मसुधारकांचा एक छोटासा संप्रदाय स्थापन झालेला होता. मांस खाणें हें दुष्टतेचें लक्षण आहे असें तो मानीत असे.

सामान्यत: निरामिष आहाराला तशी कोणाकडूनच आडकाठी केली जात नाही. पण जेव्हा तो धार्मिक सिद्धांताच्या रूपानें मांडला जाऊं लागला तेव्हा धार्मिक न्यायालयासमोर त्यांच्यावर खटला चालला. त्या संप्रदायांतील लोकांवर अत्याचार करण्यांत आले. त्यांनी पळून डोंगरदऱ्यांचा आसरा घेतला. तेथे त्यांना खाण्या-पिण्याला मिळत नसे. तेव्हा त्यांनी खालीं उतरून लूटमार सुरू करण्याचा उपक्रम केला. अखेर सशस्त्र शिपायांनी त्यांची लूटमार बंद केली. परंतु तरीहि रात्रीं ते वेढा घालणाऱ्या पहाऱ्यावरील कांही शिपायांना लुटून पळवून नेत आणि फस्त करीत. त्यांच्या धर्मांत फक्त जनावरांच्या मांसाचा निषेध होता. नरमांसाविषयीं कांहीसुद्धा आज्ञा दिलेली नव्हती. म्हणून ते शत्रूच्या मांसावर जगूं लागले......
......ही एक ऐतिहासिक घटना आणि नीतिकथा पण आहे. ”

यास्तव गोहत्त्या बंद करण्याकरितां आपण कोणावर बळजबरी करतां कामा नये असें गांधी म्हणतात. गोवधबंदीचा कायद्यानें प्रयत्न करूं नये, कारण कायद्यानें गोहत्येला आम्हीं मनाई केली तर ‘मांसाहार व पशु–बलि बेकायदेशीर करा’ या जैन लोकांच्या मागणीलाहि मान्यता द्यावी लागेल.

शिवाय देशाच्या आजच्या स्थितींत आमच्या जातीय बखेड्याचा परिणाम म्हणून हिंदु–मुसलमान शेवटी परस्परांविरुद्ध इंग्रज सरकारची मदत घेतील हें आपल्याला विसरतां कामा नये. आपली वाजंत्री पोलिसांच्या पहाऱ्यांत मशीदी-समोरून वाजत जाईल तर त्यांनी कत्तल केलेल्या गायींच्या मिरवणुकीहि पोलीसच्या पहाऱ्यांत निघतील. आम्हीं अशानें गायीलाहि वाचवूं शकणार नाही आणि हिंदु-धर्माची प्रतिष्ठाहि वाढवूं शकणार नाही.

गोभक्त—तर मग या देशांत गोरक्षण किंवा गोपालन अशक्यच म्हणावयाचें?

बुद्धिवादी—असें नव्हे. हिंदुस्थानांत गोपालन आवश्यक आणि संभवनीयहि आहे. आम्ही योग्य मार्गाचा अवलंब मात्र केला पाहिजे. गाईची सेवा करून तिची आर्थिक उपयोगिता वाढविणें हा गोरक्षणाचा सर्वांत प्रभावशाली आणि टिकाऊ असा उपाय आहे. अहिंदूंच्या मनांत गाईबद्दल तिरस्कार उत्पन्न होणार नाही असेंहि धोरण त्याचबरोबर आम्हांला आंखलें पाहिजे.

अधिकांश हिंदूंच्या मनांत मशीदीसंबंधी प्रतिकूल भाव कां असतात याचा आपण अंमळ विचार करूं. आपल्या मशीदीजवळ मुसलमान वाजंत्री वाजवूं देत

नाहीत म्हणून, “ या मशीदी नसलेल्याच बऱ्या ” अशी भावना हिंदूंच्या मनांत उत्पन्न होते. त्याच प्रमाणे गायीचा प्रश्न वाजंत्रीच्या प्रश्नासारखा मानून आणि तिच्या प्रतिष्ठेसाठी अ–हिंदूंशी लढण्याला तयार होऊन आम्हीं त्यांच्या मनांत गोमातेच्या द्रोहाची भावना जागृत करतों. गांधीसारख्या खऱ्या गोभक्ताला ही पद्धत नापसंत आहे. त्यांनी म्हटलें आहे, “ मशीदी समोर वाजंत्री वाजविण्याचा प्रश्न आणि गो–वधाचा प्रश्न हे सर्वस्वी भिन्न आहेत. . . .आहार अगर कुरबानीसाठी मुसलमान जेव्हा गायींची कत्तल करणें सोडून देतील तेव्हाच हिंदूंना पूर्ण संतोष होईल. एखाद्या धीट, बेडर राजाने शस्त्रबलाने गाईला हत्येपासून वाचविलें तर हिंदू धर्माला संतोष होणार नाही. ”

( यंग इंडिया, ५ जानेवारी, १९२८ )

म्हणूनच गांधींच्या गोसेवेच्या आणि गोरक्षणाच्या तऱ्हा अभिनव आहेत. येथे त्यावर लिहिणें अप्रस्तुत होईल. गोवधबंदीच्या प्रश्नासंबंधी त्यांची नीति स्पष्ट करण्याचाच केवळ येथे हेतु होता.

हिंदी
“ सर्वोदय ”
जून, १९४०

• • •

# हिंदुत्ववाद कीं शबल राष्ट्रवाद ?

• • •

## हिंदुसभेवर निर्बंध

अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या येत्या अधिवेशनांत त्याचे नियोजित अध्यक्ष वीर सावरकर जें मुख्य भाषण देणार आहेत, तें वर्तमान पत्रांत प्रकाशित झालेलें आहे. हिंदुमहासभेचें धोरण, तिची वृत्ति आणि तिची कार्यप्रणाली या बाबत आमचा तीव्र मतभेद आहे. तथापि आपले विचार प्रकट करण्याच्या तिच्या मूलभूत अधिकारावर घाला घालून बिहार सरकारने हिंदुमहासभेवर जो अन्याय केला आहे त्याबद्दल प्रत्येक स्वातंत्र्य प्रेमी नागरिक सरकारचा निषेधच करील. हिंदुमहासभेच्या अधिवेशनावर आपण बंदी कां लाविली, यासंबंधी सरकारचें समर्थन अगदीच लंगडें आहे. अशा वेळीं हिंदुमहासभेने आपल्या इभ्रतीच्या आणि स्वत्वाच्या रक्षणासाठी जें काय करणें आवश्यक आणि उचित होतें तेंच केलें. यासंबंधी वीर सावरकरांनी आपल्या अभिभाषणांत जे उद्गार काढले ते प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी नागरिकाला बऱ्याच अंशाने मान्य होतील.

## व्यावहारिक प्रतिकार

प्रतिकाराचा प्रयोग करण्याचा प्रसंग जेव्हा प्रत्यक्ष येऊन ठेपतो, तेव्हा काँग्रेसच्या कट्टर विरोधकांनाहि काँग्रेसच्याच नीतीचें आणि तिच्याच परिभाषेचें कसें अनुसरण करावें लागतें हें सावरकरांच्या या भाषणावरून प्रत्ययास येईल. वीर सावरकर म्हणतात, “सरकारने आमच्यावर कायदा चालविला किंवा शरीर-बलाचा प्रयोग केला तरी आम्ही आमच्या कडून सरकारी अधिकाऱ्यावर कोणताहि

शरीरबलाचा प्रयोग करणार नाही; आणि कसलेंहि प्रदर्शन न करतां गिरफ्तारी किंवा त्याहिपेक्षा जास्त सक्त शिक्षा भोगायला आम्ही तयार असूं."

आम्ही हिंदुमहासभेच्या या दृढतेबद्दल शुभ कामना व्यक्त करतों.

## सावरकरप्रणीत राष्ट्रवाद

असो; हें विषयांतर झालें. प्रस्तुत लेखांत विशेषेंकरून सावरकरप्रणीत राष्ट्रवादाची आपल्याला थोडी छाननी करावयाची आहे. हिंदुमहासभेच्या अध्यक्षांना जेव्हा केव्हा संधि मिळते किंवा मिळतहि नाही, तेव्हा तेव्हा म्हणजे वेळींअवेळीं ते गांधीजींच्या अहिंसेवर आणि कॉंग्रेसच्या राष्ट्रीयतेवर टीका करीत सुटतात. आपल्या या भाषणांत देखील कॉंग्रेसच्या राष्ट्रीयतेचा धिक्कार करतांना त्यांनी खालील उद्गार काढले आहेत:—

"गांधी– संप्रदायाच्या मिथ्या राष्ट्रवादाच्या घातक नशेच्या परिणामामुळे"* ......इ. इ. अर्थात् सावरकरांच्या मतें कॉंग्रेसचें आणि गांधीजींचें राष्ट्रीयत्व ही मिथ्या व मादक अशी वस्तु आहे. म्हणजे लोकांना भ्रम, आत्मविस्मृति उत्पन्न करणारी वस्तु असून हिंदुमहासभेचें राष्ट्रीयत्व मात्र शुद्ध आणि प्रबुद्ध असें राष्ट्रीयत्व आहे. सावरकरांच्या राष्ट्रीयत्वाचें थोडेसें समीक्षण आम्ही "सर्वोदया" च्या मार्च १९४१ च्या अंकांत × आणि त्यापूर्वी फेब्रुवारी १९४१ च्या अंकांत † केलेलें आहे. तसेंच "सर्वोदया" च्या दुसऱ्या कांही अंकांतूनहि त्याचा समाचार घेतला गेला आहे. सावरकरांनी आपल्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेकडे या खेपेलाहि संकेत केलेला आहे. 'हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व' अशी त्यांची निश्चिती आहे. आपल्या भाषणांत त्यांनी म्हटलें आहे कीं, "हिंदुसभेच्या प्रयत्नांनी हिंदुसमाजांत एक मानसिक क्रांति झाली असून 'हिंदुस्थान हिंदूंचा' ही त्या क्रांतीची द्योतक अशी युद्ध घोषणा आहे." सावरकर म्हणतात, "ही मानसिक क्रांति आपल्या अस्मितेच्या

*"The baneful influence of the pseudo--nationalistic opiates of the Gandhist school of thought......etc...etc"

× प्रस्तुत लेखकांचा "प्रस्तुत प्रश्न" मधील "थोडीशी हिंदुत्व मीमांसा हा लेख पहावा.

† उक्त पुस्तकांतील "राष्ट्रसभा आणि जातीवादी संस्था" पहा.

अभिव्यक्तीसाठी 'हिंदुस्थान हिंदूंचा' या उद्घोषापेक्षा अधिक उपयुक्त शब्द-प्रयोगाची निवड करूं शकली नसती.*"

## एक प्रश्न

याला सावरकर 'शुद्ध राष्ट्रीयत्व' म्हणतात. आणि गांधी व कॉंग्रेसच्या राष्ट्रीयत्वाला मिथ्या अथवा शबल असल्या विशेषणांनी विभूषित करतात.

प्रश्न असा आहे की, वीर सावरकरांचें राष्ट्रीयत्व कोणत्या तत्त्वावर अधिष्ठित आहे ?

१. तें रक्ताश्रित आहे काय ?

२. कीं तें धर्माश्रित आहे ?

३. अथवा तें क्षेत्राश्रित वा देशाश्रित आहे ?

१. तें राष्ट्रीयत्व जर रक्ताश्रित असेल तर त्यावर आमचें म्हणणें असें कीं, मुसलमान हे भिन्न धर्मीय असले तरी आमच्याच वंशाचे आणि रक्ताचे आहेत. सबब त्यांनाहि राष्ट्राचे घटकावयव मानणें योग्य आहे.

२. जर राष्ट्रीयत्व धर्माश्रित असेल तर जपान, चीन व बौद्ध धर्मीय देशांतील रहिवाशांनाहि हिंदु राष्ट्रांत दाखल करून घ्यावें लागेल आणि त्यांना त्यांची प्रचलित राष्ट्रीयत्वाची कल्पना सोडणें भाग पडेल. या देशांतहि जितके धर्म तितकींच राष्ट्रें कल्पावीं लागतील.

३. आणि जर तें देशाश्रित असेल तर या देशांत राष्ट्रीय केवळ हिंदूच आहेत, राष्ट्र केवळ त्यांचेंच आहे आणि इतर सर्व अल्पसंख्यांक हे संप्रदाय किंवा पक्ष आहेत हा सिध्दान्त सोडून द्यावा लागेल.

## विभिन्न व्याख्या

"हिंदु" शब्दाला "हिंदुस्थानी" शब्दाचा समानार्थक आणि समव्याप्त पर्यायवाची शब्द ठरविण्याचा प्रयास केल्यामुळे विरोध किंवा विसंगति उत्पन्न होते.

---

*This mental revolution could not have found a better expression to voice forth its significance than that "Hindusthan Hinduonka"

म्हणून हिंदुस्थानांतील अनेक विद्वानांनी " हिंदुत्त्व " शब्दाच्या भिन्न भिन्न व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांपैकी कांही व्याख्यांची छाननी " सर्वोदया " च्या मार्च १९४१ च्या अंकांत येऊन गेलेली आहे. येथे इतर कांही व्याख्यांचें संक्षिप्त परीक्षण करण्याचा विचार आहे.

## तुळजापूरकरांची व्याख्या

मराठीचे एक प्रसिध्द लेखक श्री. दत्तो आप्पाजी तुळजापूरकर यांनी आपल्या " माझें रामायण " नामक पुस्तकांत हिंदुत्वाची व्याख्या अशी केली आहे:–

" सृष्टयादि कारणं ब्रह्म सच्चिदानन्दमेवहि
गृह्णात्या पुनर्जन्म विपाकात् कर्मणस्तथा "

( पृ. २४५ " माझें रामायण " )

ही त्यांची हिंदुत्वाची व्याख्या आहे. आता " हिंदु " शब्दाची व्याख्या पहा. " जन्मत: हिंदु असून ज्यांनी हिंदुधर्म त्यागला नाही आणि जन्मत: हिंदु नसूनहि ज्यांनी हिंदुधर्मतत्वांचा स्वीकार केला आहे अशी प्रत्येक व्यक्ति हिंदु आहे. हिंदु शब्दाची हीच व्याख्या होय "

या व्याख्येंतहि हिंदुत्वाचें लक्षण धार्मिकतेच्या आधारानेच निरूपित आहे.

केवळ धार्मिक दृष्टीने श्री. तुळजापूरकरांच्या व्याख्या सदोष व अपूर्ण आहेत. त्यांच्या व्याख्येनुसार जे लोक सृष्टीचें आदिकारण ब्रह्म आणि कर्मविपाकाचा सिध्दांत मानत नाहीत, ते जातीने हिंदु असूनहि धर्मत: हिंदु नाहीत. श्री. तुळजापूरकर हिंदु शब्दाला हिंदुस्थानी शब्दाचा समानार्थिक शब्द मानतात किंवा नाही याबद्दल निश्चित सांगता येत नाही. आणि म्हणून धर्मत: जातित: अथवा तत्त्वत: जो हिंदु आहे तोच राष्ट्रत: हिंदु आहे किंवा नाही या प्रश्नाचें संतोषजनक उत्तर त्यांच्या विवेचनांत नाही.

## गौडजींचा " हिंदु विश्वकोष "

काशीच्या श्री. शिवप्रसाद गुप्त यांच्या प्रेरणेने स्वर्गीय रामदास गौड यांनी श्री. बाबुराव पराडकरांच्या शब्दांत ' हिंदुत्व ' नामक जो विश्वकोष लिहिला आहे

त्यांत देखिल "आर्य" व "हिंदुत्व" शब्दांच्या व्याख्या व मिमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्य शब्दाच्या व्युत्पत्तीचें आणि अर्थाचें परीक्षण करून श्री. गौडजी लिहितात: —

"भारतीय वैदिक "ऋ" धातू आणि "ण्यत्" प्रत्ययापासून आर्य शब्दाची व्युत्पत्ति सिद्ध होते. "ऋ" धातूचा अर्थ चालणें, पसरणें असा आहे. मानव जाति गमनशील आहे आणि ती जेथे जाते तेथेच पसरून जाते. सुसंस्कृत मानल्या गेलेल्या प्रत्येक जमातीची अशी प्रथा आहे कीं, ती स्वत:लाच श्रेष्ठ आणि मानवता परिपूर्ण अशी मानून इतर भाषा–भाषी लोकांना मनुष्येतर, रानटी, पशु, राक्षस इत्यादि समजते. आपल्या जातीचें आणि भाषेचें विशिष्ठ नांव प्राय: ठेवीत नाही. आर्यावर्ताचा अर्थ मनुष्याचें निवासस्थान असा आहे आणि येथूनच मनुष्यजाति जगांत सर्वत्र पसरली. सबब येथील माणसांना 'आर्य' म्हणतात. याच यौगिक अर्थावरून लाक्षणिक आणि रूढ अर्थ श्रेष्ठ, सभ्य, कुलीन, साधु, पूज्य, मान्य, उदारचरित, विद्वान्, मित्र, वैश्य आणि देशभक्त या प्रकारें झालेला आहे. यौगिक अर्थावरूनच या जातीला 'भटकी जात' भलेहि म्हणोत !"

……………हिंदुत्व पृ. ७७१.

हिंदु जातीचें वैशिष्ठ्य दाखविण्याच्या दृष्टीने ही व्याख्या किती निरुपयोगी आहे हें सांगण्याची गरज नाही.

आता गौडजींची हिंदुत्वाची व्याख्या पहा. हिंदु शब्दाचा इतिहास आणि अर्वाचिनता यांचें विवेचन केल्यानंतर ते लिहितात:—"हिंदु शब्दाचा वाच्यार्थ प्रथम कदाचित् आर्य एवढाच राहिला असेल; तथापि आर्यांना अनुकूल असा धर्म मानणारे अनार्यहि हिंदु मानले जात. या गोष्टीची साक्ष इतिहास देतो. गोव्यांत अजूनहि असे ख्रिस्ती आहेत की, जे हिंदु शब्द स्वत:च्या बाबतींत लावीत नाहीत. तथापि येशूख्रिस्ताबरोबरच हिंदूंच्या जवळजवळ सर्व देवदेवतांची ते पूजा करतात. असे मुसलमानहि आहेत की, जे गोमांसाला स्पर्श करीत नाहीत, हिंदूंचे सण पाळतात आणि देवदेवतांचे महात्म्य असलेल्या ठिकाणीं जाऊन मुंडनादि व्यवहार करतात. बरें, असेहि हिंदु आढळतील की, ज्यांना गोमांसच काय, पण नरमांसहि चालेल. प्रेतें भक्षण करणाऱ्या अघोरपंथी लोकांपासून तों श्रीसांप्रदायांच्या ब्राह्मण आचाऱ्यापर्यंत असेहि हिंदु आहेत की, ज्यांच्या येथे मांजर दिसलें तरी सर्व स्वयंपाक विटाळतो. डुकरांच्या हाडांची मेखला

करून मुसलमानाच्या हातची रोटी घेणारे आणि "अमृत पिऊन" तर होणारे गुरु गोविंदसिंग देखील हिंदूच नव्हे, हिंदूंचे मुकुटमणी आहेत; आणि आपल्या हातानेच भोजन तयार करणाऱ्या – स्वयंपाकी – हिंदूंची संख्याहि थोडीथोडकी नाही......वर्णाश्रमधर्मी हिंदु आहेत आणि वर्णाश्रम न मानणारेहि हिंदु आहेत. कंदाहार आणि बुखारा येथून येऊन त्रिवेणीमध्ये आंघोळ करून आणि अक्षय्यवटाच्या पूजेने कृतकृत्य होणारेहि हिंदु आहेत. आणि काशी, प्रयाग सारख्या तीर्थक्षेत्रांत कायम वास्तव्य करून स्वतःला हिंदु म्हणवूनहि वरील कृतींना विरोध करणारे हिंदुसुद्धा कमी नाहीत. कांही विद्वानांचें असें मत आहे की, भारतवर्षांतून उगम पावलेले सर्व धर्म, सर्व संप्रदाय हिंदूच मानले गेलें पाहिजेत. ...... ही परिभाषा अतिव्याप्त ठरते. या व्याख्येनुसार जगांत पसरलेले कमीतकमी चाळीस कोटी बौद्धधर्मीहि समाविष्ट होतात. म्हणजे चीनी, तिबेटी, जपानी, मोंगल, तार्तरी, सिंहली, आणि बर्मीहि संनिविष्ट होतात. धार्मिक दृष्टीने हिंदूंना या गोष्टींचा अभिमान देखील वाटूं शकतो की, आजहि जगामध्ये साठ कोटी हिंदुधर्मानुयायी असे आहेत की, ज्यांचा पुनर्जन्म, अहिंसा, कर्म, सत्य इत्यादि मौलिक सिद्धान्तावर विश्वास आहे. हा अभिमान अस्थानी नाही. कारण भारतीय हिंदु बुद्ध भगवानांना देखील परमात्म्याचा नववा अवतार मानतात; परंतु इतके असूनहि तिबेटी, तार्तरी किंवा जपानी लोकांना समाजशास्त्रज्ञ हिंदु संस्कृतीचीं राष्ट्रें मानूं शकत नाहीत.

"हिंदु शब्दांमध्ये आभिधाशक्ति किती प्रमाणांत आहे, यावर पुष्कळ वाद-विवाद होऊन देखील सर्व-वादी-संमत अशी एकहि परिभाषा निश्चित झालेली नाही. कमीत कमी या भारत देशांत तरी हिंदु शब्दाचा अतिप्रयोग केला जात असतो. तेथे हिंदु शब्द उच्चारल्याबरोबर एका विशेष धर्माचा, एका विशिष्ट संप्रदायाचा, एका विशिष्ट जातीचा किंवा एका विशिष्ट राष्ट्राचा बोध होत नाही."

—हिंदुत्व

यानंतर श्री. गौडजी यांनी वीर सावरकरांच्या व्याख्येची (जी त्यांनी चुकून लोकमान्यप्रणीत मानली आहे) छाननी केली आहे आणि असेंहि म्हणून टाकलें आहे की, "या श्लोकानें हिंदु शब्दाची इतकी उपयुक्त परिभाषा निश्चित होते की, जिला स्वीकारतांना कोणालाच हरकत वाटूं नये."

—हिंदुत्व पृ. ७ (टिपणी)

# धार्मिक कलह

* * *

'धर्म' आणि 'कलह' यांचा शाश्वत आणि अपरिहार्य असा विरोध आहे. धर्मात कलह संभवताच नाहीं. 'कलह' आणि 'कलि' हे दोन परस्परांचे पर्याय होत. जेथें धर्म असतो तेथे सत्ययुग असतें. कलह असला म्हणजे तें कलियुग म्हणावयाचें! इंग्रजींत कलियुग या अर्थी Iron Age असा शब्द आहे. 'आयर्न एज' म्हणजे लोहयुग, 'लोहनिनाद करणाऱ्यांचे' तरवारवाल्यांचे युग!

तथापि धर्माबरोबर कलह आणि युद्ध हीं जोडून दिलेलींच आपल्याला आढळतात. हा भाषेवर अत्याचार तर खराच पण मानवतेवर-मनुष्याच्या आत्म्यावर देखील हा अत्याचारच होय. वरील दोन शब्दांचा आम्ही कितीहि जिकिरीनें समास सांधण्याचा प्रयत्न केला तरी त्यांतील विरोधी भावांचा समास सांधणें शक्य नाहीं. कारण 'धर्म' आणि 'कलह' यांच्यांत केवळ शाब्दिक विरोधाभासच नव्हे तर वस्तुगत विरोध आहे. विरोधाचें स्वरूप केवळ अलंकारिक नाही, ती वस्तुस्थिति आहे. "तिमिरमय प्रकाश" "क्रोधपूर्ण शांति" "चारित्र्यहीन साधुता" या शब्दसमुहांतून हवा तर एक वेळ अर्थ काढतां येईल पण धार्मिक कलह या शब्दांतून अर्थच निघूं शकत नाही. हा तर "वदतो व्याघात" आहे.

धर्म एकच आहे आणि तो सार्वदेशिक, सार्वत्रिक आणि सार्वजनिक आहे. धर्माचा उद्देश धारण करण्याचा--मानवांना एकत्रित, परस्पर--संबद्ध करून त्यांची धारणा करण्याचा आहे. मानवी समाजांत इश्वरी प्रेमाचा साक्षात्कार तो हाच. येशूचें इश्वरी राज्य तें हेंच. गांधींचे "रामराज्य" आणि आदर्शवाद्यांचा "आदर्श समाज" हि

हाच. जो मानवांचा संयोग करतो तो धर्म. ज्यामुळे मानवांत विभाग उत्पन्न होतो तो अ-धर्म. धर्म म्हणजे योगाचे शास्त्र नि कला. वियोगाचे नव्हे. धर्म जोडतो. अधर्म तोडतो. 'समत्वाच्या' विद्येचें आणि 'संयोगाच्या' कलेचें नांवच धर्म आहे. तो आम्हांला भेदांतून अभेदाकडे, विग्रहांतून संधीकडे आणि विद्वेषांतून प्रेमाकडे नेत असतो. सबब असा धर्म हा एकच होऊं शकतो हें उघड आहे. आणि वस्तुस्थिति पण तशीच आहे. अशा स्थितींत 'धर्म' आणि 'कलह' यांचा मेळ घालणें कसें शक्य आहे? धर्माचा उदय होतांच कलह तमवत् नाहीसा होतो.

असें असतां मानवांच्या इतिहास-ग्रंथाचीं कितीतरी पानें धर्मयुद्धाच्या वर्णनांनी रंगलेलीं आढळून येतात. धर्मांच्या नांवावर जितका रक्तपात आणि मानवद्रोह घडलेला इतिहासांत सांपडतो तितका कशानेंहि घडलेला नाहीं. या कारणामुळेंच मानवतेच्या उपासकांचा असा एक सत्प्रवृत्त वर्ग निर्माण झाला आहे की, ज्याला धर्मांचा उबग आला आहे आणि त्यांची अशी धारणा होऊन बसली आहे की, या जगांतून जोपर्यंत धर्माचा नायनाट होत नाही तोपर्यंत खऱ्या मानव-धर्माचा आविर्भाव अशक्य आहे. धर्मनिष्ठांचा आणि स्वतःला धर्मध्वजी समजणाऱ्यांचा आजच्या सारखाच प्रघात पुढेंहि चालू राहिला तर सर्वच मानवप्रेमी लोकांना धर्मांचा कदाचित् विरोध करावा लागेल आणि त्यांचें दुनियेंतून उच्चाटन घडवून आणावें लागेल!

आणि नवल असें कीं, जे लोक इतर क्षेत्रांतून केवळ व्यापक दृष्टीच्या मुद्यावर राष्ट्रीयतेचा विरोध करतात, तेच धार्मिक क्षेत्रांत अत्यंत संकुचित वृत्ति दाखवितात. १९२०-२१ सालीं जेव्हां आमच्या लोकांनीं राष्ट्रीय शाळा उघडल्या तेव्हां याच मंडळीपैकी कांहीं आम्हांला खोचून विचारीत असत कीं, "काय हो, गणित देखील राष्ट्रीय आणि अराष्ट्रीय असें असतें कीं काय? विज्ञानाचेहि पाश्चिमात्य आणि पौर्वात्य असे विभाग पडतात काय? सरकारी शाळांतून दोन आणि दोन यांची बेरीज चार होते आणि तुमच्या इथे मात्र साडेचार किंवा पावणेपांच होते असें कांहीं आहे का? सरकारी शाळेंत जर दोन विशिष्ट वायूंच्या संयोगाने पाणी बनूं शकत असेल तर तुमच्या येथें सवादोन किंवा अडीच वायू लागणार कीं काय! वस्तूचे धर्म देखील तुम्ही बदलवायला निघालांत काय? तुमच्या राष्ट्रीय शाळांतून साखर खारट व मीठ गोड लागणार आहे वाटतें?"

असले आक्षेपगर्भ प्रश्न ज्या मंडळीकडून विचारण्यांत येत तीच मंडळी निकृष्ट जातीय क्षुद्रतेचें समर्थन करीत आणि आपण तिचे रक्षक आहोंत म्हणून मिरवीत. आपल्या देशाचें वैशिष्टय आणि वैचित्र्य तें हेंच! आपल्या येथें एकीकडे अद्वैत आणि 'आत्मवत् सर्वभूतेषु' च्या उच्चतम सिद्धांताचें प्रतिपादन चालतें तर दुसरीकडे "हिंदुपाणी" "इस्लामियापाणी" आणि "बामणीयापाणी" ची ललकारी ऐकूं येते.

विज्ञान किंवा गणित हें जसें राष्ट्रीय किंवा अराष्ट्रीय असूं शकत नाहींत तद्वत ईश्वर, धर्म व सदाचार हींहि राष्ट्रीय अथवा अराष्ट्रीय असूं शकत नाहीत, हें तत्त्व धर्माचा उद्‌घोष करणाऱ्यांना अजून शिकावयाचें आहे. केवळ नांवें वेगवेगळीं असलीं म्हणून वस्तू कांहीं बदलत नाहीं, किंवा शब्द वेगळे असले म्हणून अर्थामध्यें कांही फरक पडत नाहीं. पण तथाकथित धर्मनिष्ठांच्या मनाला ही गोष्ट अजून पटलेली नाहीं. सबब कित्येक प्रमुख राष्ट्रीय पुढाऱ्यांनाहि आपण असें म्हणतांना ऐकतों कीं —"मानवप्रेम आणि चारित्र्याच्या दृष्टीनें जगांतील सर्वश्रेष्ठ व्यक्तिपेक्षांहि धार्मिक दृष्टीनें एक साधारण मुसलमान किंवा हिंदू श्रेष्ठ आहे."

हे उद्‌गार जर कशाचे द्योतक असतील तर ते विचार स्पष्ट नसल्याचे! हें धार्मिक विकृति आणि तर्कदुष्टता यांचें लक्षण होय.

एखाद्या धर्मांतून ईश्वरनिष्ठा, सत्यप्रियता, अहिंसापरायणता, सदाचार आणि सौजन्य इ. तत्त्वें काढून टाकलीं तर त्या धर्मांत काय राहील? जें राहील तें फक्त कर्मकांडाचें निष्प्राण, निरर्थक, निष्क्रीय कलेवर असेल! सत्यनिष्ठा, ईश्वरनिष्ठा, चारित्र्य यांच्या परिपालनांत जर धार्मिकता नसेल, तर ती दाढींत आणि शेंडींत सांपडेल असें कां समजावयाचें? जानव्यांत किंवा कृपाणांत ती सांपडण्याची आशा करावयाची? जटांजुटांत किंवा मुंडनांत ती दृग्गोचर होईल असें म्हणावयाचें कीं धोतर किंवा पायजामासारख्या क्षुद्र कर्मकांडाशीं तिचा संबंध जोडावयाचा?

ज्या आंतरिक गुणांच्या विकासासाठीं कर्मकांड आणि बाह्यप्रतीकें अस्तित्वांत येतात त्या गुणांना जर गौण समजण्यांत येऊं लागलें तर खरा धर्म जगांत फळाफुलाला येण्याची आशाच नको.

खरा प्रकार असा आहे कीं, आम्हाला धर्माधर्माची मोठीशी पर्वाच नाही. आम्हाला जगांत स्वतःची प्रतिष्ठा आणि गौरव वाढवावयाचा आहे आणि तदर्थ

आम्ही " आमच्या ईश्वराची " पूजा करून " दुसऱ्याच्या देवाची " निंदा करतों, हेटाळणी करतों. त्यासाठींच आमची 'भगवान' 'परमपिता' 'महादेव' 'जगन्माता' यांच्याबद्दल पूज्यबुद्धी आणि 'खुदा' 'अल्ला हो अकबर' 'आकाशस्थ पिता' यांच्याबद्दल अनादर, तिरस्कार! याचा अर्थ हाच कीं, आम्हाला धर्मापेक्षां अहंभावाची जास्त तळमळ आहे. आमच्याकडून धर्माचा पुरस्कार जो होतो तो केवळ 'आमचा' धर्म म्हणून! ईश्वरभक्ति जी आम्ही करतो ती आमच्या ईश्वराची म्हणून! यांत आत्मीयता आणि उत्कट भाव असले तर ते भक्तीच्या लक्षणांत गणले जातात आणि त्यांचें पर्यवसान आत्मनिवेदनात होतें. पण तत्त्वत: हा निकृष्ट कोटीचा अहंकार असतो व यास्तव 'माझ्या आणि तुझ्या' देवांत व 'माझ्या आणि तुझ्या' धर्मात संघर्ष निर्माण होतो.

—हाच तो नलराजाचा आंगठा, कीं ज्यांतून धर्माच्या शरीरांत कलीचा प्रवेश होत असतो!

मुसलमान म्हणतो, सर्वश्रेष्ठ धर्म माझा. कारण काय, तर तो लोकतंत्रावर आधारलेला आहे. तो मुसलमानांत आपपर असा भेद करीत नाही. तथापि हाच लोकतंत्रवादी मुसलमान मुस्लिमेतर सत्पुरुषांना काफीर मानतो, नापाक समजतो, जीवनाच्या परमश्रेष्ठ गतीला तो पात्र नाही असें मानतो.

खिस्ति म्हणतो, धर्म श्रेष्ठ जर असेल तर तो माझाच. कारण त्याचें अधिष्ठान दया, क्षमा, शांति, करुणा आहे; पण याच खिस्त भक्ताची इतर धर्मियासंबंधी अशी भावना असते कीं, ती वाट चुकलेली मेंढरें आहेत. त्यांना कळपांत आणण्यासाठीं तो बरें वाईट प्रयत्न करीत असतो.

हिंदु म्हणतो, अहो सर्व धर्मांत धर्म जर श्रेष्ठ असेल तर तो माझाच. कारण त्यांत व्यक्तिवैशिष्ठ्याचा समष्टिगत ऐक्याशीं सुंदर समन्वय साधला आहे. भेदांत अभेद पाहण्याची कला तो शिकवितो. कुणाला लालूच दाखवून, धाकदपटशा करून किंवा मारून झोडून तो हिंदु बनवीत नाहीं. सहिष्णुता हा त्याचा पाया आहे. इतरांना तो धर्मभ्रष्ट करूं इच्छित नाहीं. प्रत्येकासाठीं स्वधर्म श्रेष्ठ आणि मुक्तिदायक आहे असा हिंदु धर्माचा सिद्धांत आहे.

हें सर्व बोलतांना किंवा ऐकतांना फार बरें वाटतें. एका दृष्टीनें त्यांत वावगेंहि कांहीं नाहीं. जगांतील विद्यमान सर्व जातींमध्यें हिंदु जाति सर्वांत अधिक सहिष्णु

किंवा इतरांच्या तुलनेनें कमींत कमी असहिष्णु आहे; यासाठीं शेकडों पुरावे देतां येतील.

पण या प्रश्नाचाहि एका वेगळ्या दृष्टीने विचार करतां येतो. व्यक्तिसाठीं तिच जो स्वधर्म तो पर्याप्त आणि आचरणीय आहे असें हिंदु मानतो खरा; पण याचा अर्थ तो सर्वच धर्मांना सारखाच प्रामाणिक आणि श्रेष्ठ समजतो असा लावता येईल का ? उलट तो भिन्न भिन्न धर्मांची उत्पत्ति भिन्न भिन्न अधिकाऱ्यांसाठीं मानतो. त्याच्या दृष्टीनें हिंदुधर्मच श्रेष्ठ, परम श्रेयसाधक आहे. पण अन्यधर्मीय त्याचे अधिकारी नाहींत आणि म्हणून हिंदुधर्मात येण्याची त्यांची पात्रता नाहीं. जे लोक परधर्मीयांना आपल्या धर्मात आणण्यासाठीं जुल्म, जबरदस्ती, लाच-लुचपत देतात ते कमीतकमी विधर्मीयांना आपल्या धर्माचे अधिकारी तरी मानतात. अन्य धर्मीय लोकांबद्दल ते अशी भावना बाळगतात कीं, ते सद्धर्मवंचित आहेत, पतित आहेत. आणि म्हणून त्यांना येनकेन प्रकारेण सन्मार्ग दाखविण्याची त्यांची इच्छा. परंतु जे लोक इतरांना इतके पतित मानतात कीं, 'याच देही याच जन्मीं' त्यांना आपल्या धर्माचे अधिकारी मानीत नाहींत त्यांना सहिष्णुतेवर आपला अधिकार सांगण्याचा हक्क तरी आहे का ? जन्मगत अपवित्रता जे मानतात ते संसारगत पवित्रता मानणाऱ्या पेक्षां अधिक सहिष्णु कसे ? या दृष्टीने विचार केला तर हिंदूंनाहि आपल्या धर्माबद्दल जास्त विनय आणि नम्रता धारण करावी लागेल.

हल्ली हिंदुधर्मसुधारकांनी जन्मजात अपवित्रतेचा सिद्धांत सोडून इतर धर्मीयांच्या एतद्विषयक धोरणाचा अवलंब केला आहे. ज्याप्रमाणें ख्रिस्ती पाद्री भोळ्या भाबड्या वाट चुकलेल्यांना सन्मार्गावर आणण्यासाठी लालुच किंवा आमिष दाखवितात आणि स्वतःला कृतार्थ मानतात किंवा ज्याप्रमाणें तन्ज़ीम ( संघटन ) तब्लीग़ ( धर्मप्रचार ) चे प्रवर्तक काफीर लोकांना बळजबरीनें पाक ( पुनीत ) करून घेतांना सवाब ( पुण्य ) जोडण्याची उमेद बाळगतात त्याचप्रमाणे हिंदु देखील आता शुद्धीचा बिगुल वाजवून म्लेच्छांना आर्य बनविण्यांत धन्यता मानूं लागले आहेत. 'शुद्धि' या शब्दाच्या मागें अशी भावना आहे कीं, जे हिंदु नाहींत ते अशुद्ध किंवा भ्रष्ट आहेत. मुसलमान बनविण्यांत किंवा खिस्ति करून घेण्यांतहि हीच भावना आहे. मुसल्मानेतर किंवा गैर खिस्ती सर्व अपवित्र आहेत, ईश्वरी साक्षात्काराला अधिकारी नाहींत हाच तदंतर्गत भाव आहे.

अशा प्रकारें धार्मिकतेच्या नांवावर ईश्वरद्रोही आणि मनुष्यघातिनी असहिष्णुता आणि पाखंड थैमान घालीत आहे.

याला दुसरेंहि कारण आहे. प्रस्तुत युगांत गुणापेक्षां संख्येवर जास्त भर आहे. आजच्या दुनियेंत देहपूजेला जास्त महत्त्व प्राप्त झालें आहे. विद्वानांचीहि दृष्टी स्थूल आणि ढोबळ अशी बनून गेली आहे. त्यांनी याच दृष्टीनें प्रजातंत्र किंवा लोकशाहीचा विचार केलेला आहे. संख्या हें समाजाचें शरीर होय; आत्मा किंवा प्राण नव्हे. असें असतां देहपूजक विद्वान हे संख्येचे गुलाम बनले आहेत. शरीर हें धर्माचें केवळ एक साधन आहे, मग ते आद्यसाधन कां असेना, याचा या विद्वानांना विसर पडतो. शरीर जें रक्षणीय आणि पोषणीयहि आहे तें साध्य साफल्यासाठींच. साध्याच्या प्राप्तीचें सामर्थ्य उत्तरोत्तर संपादन करण्यांत साधनांची सार्थकता आहे. हें तत्त्व दृष्टीआड झाल्यामुळेंच धर्मनिष्ठेपेक्षां संख्यानिष्ठा जास्त महत्त्वाची व आवश्यक अशी मानली जाते. धर्मनिष्ठेचें स्थान संख्यानिष्ठेनें घेतलें आहे. आज धर्मपरिवर्तनाचें अनिवार्य पर्यवसान समाजपरिवर्तनांतच होतें.

समाज आणि धर्म यांचा घनिष्ठ संबंध असूं नये असें म्हणण्याचा माझा हेतु नाहीं. उलट मी तर असेंच म्हणतों आणि मानतों कीं, जीवनाचे सर्वच लहानमोठे व्यवहार धर्ममय व्हायला हवेत. खाणें, पिणें, राहणें, नांदणें. वेषभूषा इ. सर्व गोष्टींशी धर्माचा संबंध असणें जरूर आहे. थोडक्यांत म्हणजे देवळापासून शौचकूपापर्यंत आणि यज्ञशाळेपासून तर बाजारापर्यंत आमचे सर्व दैनंदिन कार्यक्रम धर्माच्या योगेंच नियंत्रित झाले पाहिजेत; पण हें सर्व साधतांना ह्या सर्व आचारांचा आणि बाह्य विधींचा हेतु चित्तशुद्धीचा आहे हें मात्र कधीहि दृष्टीआड होऊं देतां कामा नये!

या दृष्टीनें धर्माचे दोन विभाग करतां येतील. एक मुख्य आणि दुसरा गौण धर्म. दुसऱ्या भाषेंत यम आणि नियम. मुख्य धर्म देशकालातीत असतात. मनूने त्यांना "सार्व–वार्णिक–धर्म" असें म्हटलें आहे. त्यांना आपण "सार्वजनिक" धर्म असें म्हटलें तर अधिक अन्वर्थक होईल. सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य इत्यादि सार्वजनिक आणि मुख्य धर्म आहेत. संध्या, पूजा, नमाज, चर्च-मधील सामुदायिक प्रार्थना इ. आचार; सुन्ता, मौजीबंधन, इ. संस्कार आणि शेंडी, दाढी, रुद्राक्षमाला, गंध, पायजामा, धोतर इ. बाह्य चिन्हें गौण आहेत. यांपैकी ज्या योगें बंधुत्वाच्या भावनेचा परिपोष होईल ते आचरणीय आणि ग्राह्य आहेत. खरेपणा, इमानदारी, ईश्वरनिष्ठा, बंधुभाव, इ. धर्मच सर्वगामी आणि जीवनव्यापी होऊं शकतात. हेंच आमच्या समाजरचनेचे आधार होऊं शकत असल्यामुळें, याच सिद्धांताच्या पायावर आमच्या नागरिकतेची इमारत उभारली गेली पाहिजे.

आज देखील कायदा आणि न्यायदानाचा प्रश्न येतो तेव्हां समाजाचे व्यवहार वरील तत्त्वांना प्रमाण मानूनच चालतात. चोरीबद्दल जेव्हां शिक्षा फर्माविली जाते तेव्हां तेथें हिंदु चोर अथवा मुसल्मान चोर, ब्राह्मण चोर अथवा ब्राह्मणेत्तर चोर, असा भेदभाव केला जात नाहीं. आणि यांत अस्वाभाविक असें काय आहे? चोरी करणारा हिंदु, मुसलमान, शीख, किंवा खिस्ती आहे म्हणून तो चोरी करतो असें थोडेंच आहे? चोरीचा सर्वच धर्मांनी निषेध केला आहे. चोरी करणारा तेवढ्या प्रमाणांत आपल्या धर्मापासून पतित होतो. पंधरा सोळा वर्षांपूर्वी जेव्हा ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांचे दंगे होऊं लागले होते तेव्हा मोठमोठ्या मुसल्मान पुढाऱ्यांनी एक जाहीरनामा काढला होता. त्यांत असें म्हटलें होतें कीं " दंगेखोर आणि गुंड यांना मुळीं धर्मच नसतो. " तथापि आमचे कट्टर पंथीय धर्मध्वजी तर म्हणतील की—" ते गुंड कां असेनात! पण ते हिंदु किंवा मुसलमान आहेत म्हणून परधर्मीय साधुसज्जनापेक्षा श्रेष्ठच आहेत. " यालाच खरी धार्मिकता म्हणायची का? गुंडांना जसा कोणताच धर्म नसतो तद्वत् दुर्जन देखील अधर्मीच असतात. सत्यनिष्ठ, अहिंसक, सेवापरायण, ईश्वरनिष्ठ, " रामभजन, मनमें दया, तन सेवामें लीन " हें ज्याचें शील तोच साधू—मग त्याच्या गळ्यांत माळ असली काय किंवा नसली काय, त्याच्या कपाळी भस्मलेप असो किंवा नसो; त्याच्या डोक्यावर जटा वाढल्या असतील किंवा छातीवर लांब दाढी रुळत असेल!

उलट जो चारित्र्यहीन, स्वैर, अत्याचारी बेलगाम आहे तो दुर्जन, अधर्म करणारा होय—मग त्याच्या अंगावर भगवें वस्त्र असो किंवा पायजामा असो!

हीच खरी धार्मिकता आहे. हिच्यांत आणि सामाजिकता किंवा नागरिकता यांत विरोध नाहीं. आणि तिचें पालन करण्यासाठीं शंकराचार्यांचा अनुयायी, महंमदी किंवा खिस्ती होतांच आजवर त्याने मांसभक्षण केलें नसेल तर तें त्यानें करावें, रामदत्त असेल तर त्याचा रहीमबक्ष व्हावा, धोतर वापरीत असेल तर त्याने चोळणा वापरावयास लागावें, आणि आपल्या घरांतील स्त्रियांना बुरख्यांत बंद करावें किंवा सूटबूट घालून गोमांस भक्षण करावें, हें सर्व करण्याची तादृश गरज नाहीं. मरमॅडयूक पिक्थॉल हे केवळ मरमॅडयूक पिक्थॉल राहूनहि जर मुसलमान होऊं शकतात, किंवा नारायण वामन टिळक यांना आपलें नांव, आपली राहणी, किंवा भाषा न बदलताहि जर खिस्ती होता येतें तर मग धर्मांतराबरोबर नामांतर, भाषांतर, वेषांतर, आहारव्यवहारांतर कां व्हावें? सांप्रदायिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना ही गोष्ट विचारणीय अशी आहे.

याचप्रमाणें नागरिकता व धार्मिकता यांत विरोध नाहीं. आमचें नागरिकत्वच जर आमच्या धर्मविशेषावर आधारलेलें असेल तर तें " मूले कुठारः " असेंच समजावयाचें. जातीयता आणि धार्मिकता यांत फरक करायचा तो हा कीं, आमच्या नागरिकतेच्या अधिकाराचें अधिष्ठान जात किंवा संप्रदाय न ठेवतां त्याची उभारणी सार्वजनिक धर्मावरच झाली पाहिजे. तरच जातीयता नाहींशी करून नागरिकता आणि धार्मिकता यांत आपल्याला मेळ साधतां येईल.

आतां प्रश्न राहिला तो हा कीं, जातीय अधिकार आणि उपासनाविधि यांच्या स्वातंत्र्याचें कसें व्हायचें ? यावर मला असें वाटतें कीं जे आचार संस्कार विधि, सार्वजनिक धर्म आणि नागरिकत्व यांच्याशी अविरोधी असतील त्यांचें यथारुचि पालन करतां येण्याची मोकळीक असावी. आणि जे प्रतिकूल असतील त्यांचें पालन निषिद्ध मानलें जावें. उदाहरणार्थ ब्राह्मण चोर आणि शूद्र चोर यांना शिक्षा देतांना भेद केला जावा असें जर एखाद्या धर्माचें अनुशासन असेल तर तें अधार्मिक मानलें पाहिजे आणि परधर्मीय लोक केवळ मुसलमान नाहींत म्हणून एखाद्या धर्मान्वयें त्यांच्यावर जिझिया कर लादला जाऊं लागला तर तो अनुचित, अधर्मी, हराम समजला जावा.

अशा प्रकारच्या शुद्ध बुद्धिग्राह्य सिद्धान्ताच्या पायावर आमच्या धार्मिकतेची जेव्हा उभारणी होईल तेव्हा जातीय बखेडे नाहीसे होतील आणि धार्मिक कलह देखील माजणार नाहीत. धर्माची व्यावर्तक दृष्टि निषिद्ध मानली पाहिजे. 'मी हिंदु आहें.' म्हणजे 'मी हिन्द्वेतर नव्हे' 'मी भारतीय आहें' म्हणजे 'मी विश्व नागरिक किंवा भारतीयेतर नव्हे' असें होणार नाही.

धार्मिकता ही नेहमी विधायक असते, संग्रहक, व्यापक असते. कलहाला वावच नसतो तिथे! " मी माझ्या आईचा आहें, " याचा अर्थ इतर माझ्या माता नव्हत असा कधीच होणार नाही आणि असा अर्थ नाही म्हणूनच मी माझ्या आईवर प्रेम करीत असतांहि सर्व स्त्रियांना मातेसमान मानूं शकतों. याच प्रमाणें माझ्या धर्मावर माझें माझ्या जावापेक्षा जास्त प्रेम असूनहि अन्य धर्मांना 'स्वधर्मवत्' मानायला मला शिकलें पाहिजे. " सर्वधर्मसमभाव " तो हाच !

व्यवहाराच्या क्षेत्रांतून धर्माचें उच्चाटण करून त्याला देवळांत, मशीदींत, चर्चमध्यें कोंडून ठेवल्याने धर्म निर्जीव होईल आणि व्यवहारांतील प्रतिष्ठाहि नाहीशी

श्री. गौडजींनी आपल्या सर्व मीमांसेचा निष्कर्ष खालील शब्दांत व्यक्त केला आहे. " आम्ही आतापर्यंत जें काय विवरण केलें, त्यावरून आम्ही असें म्हणूं शकतों की, भारताची प्राचीनतम आर्यपरंपरा ही आपली परंपरा स्वीकारणारा आणि भारतीय संस्कृति आणि भारतीय धर्माला पूर्णत: किंवा अंशत: अनुकूल असणारा हाच भारतीयांच्या दृष्टीने हिंदु होय. " —हिंदुत्व पृ. ७

## एक तर्कदोष

तर्कशास्त्रामध्ये ज्ञाताची व्याख्या अज्ञाताच्या द्वारे करणें हा एक महान् दोष मानला गेला आहे. तो दोष गौडजींच्या या व्याख्येमध्येहि आहे. ' हिंदुत्व ' या एका शब्दाचा अर्थ समजाविण्यासाठी त्यांनी ' आर्यपरंपरा, ' ' भारतीय संस्कृति, ' आणि ' भारतीय धर्म, ' यासारख्या तीन दुर्बोध आणि अव्याख्येय संज्ञांचा प्रयोग केला आहे. या संज्ञा क्लिष्ट आणि अव्याख्येय कशा आहेत याबद्दल त्यांनीच आपल्या पुस्तकांत निरनिराळीं प्रमाणें सर्वत्र उधृत केलीं आहेत. उदाहरणार्थ, श्रीयुत गौडजी उपसंहारांत लिहितात:—

" हिंदूंचें धार्मिक साहित्य तर मतभेदांचा एक विशाल संग्रहच आहे. या परस्पर विरोधी मतांना पाहून लोक गोंधळतात व समजतात की, हिंदूंच्या धार्मिक साहित्याचें हें मोठें दूषण आहे. परंतु ज्याला तें दूषण समजतात, तीच वस्तुत: त्याची प्राकृत महत्ता आहे, व्यापकता आहे, उदारता आहे नी भूषण पण आहे. म्हणूनच हिंदुधर्म इतर धर्मापेक्षा अधिक व्यापक असून सार्वभौम आहे, सर्व मतांना व संप्रदायांना जोडणारा असा आहे. अन्य धर्मीय लोक स्वधर्माचा प्रचार करतात व इतरांना हांकून लावतात. हिंदु धर्म स्वत:चा प्रचारहि करीत नाही, व कुणाला हांकूनहि लावीत नाही. हिंदु धर्माशी मैत्री करण्याची केवळ एकच अट आहे; आणि ती म्हणजे भारतीय संस्कृति अक्षुण्ण राहिली पाहिजे. एखाद्या व्यक्तीचे विचार कसेहि असोत, ती कोणत्याहि मताचा प्रचार करीत असो, पण तिचें आचरण मात्र हिंदुचेंच असलें पाहिजे. तिचें चरित्र आपादमस्तक हिंदुचेंच असलें पाहिजे. असा मनुष्य खिस्ती अगर मुसलमानी विचारांचा असला तरी हिंदु समाज त्याचा बहिष्कार करीत नाही. उलट हिंदु संस्कृतीचा ज्याने त्याग केला आहे, असा मनुष्य कितीहि आस्तिक असला तरी त्याला भेटतांना हिंदूंना संकोच वाटतो आणि समाजसुद्धा त्याच्यावर बहिष्कार टाकायला तयार असतो. म्हणून हिंदु व्हावयाला हिंदु संस्कृतीच मुख्य आहे. " ( " हिंदुत्व " पृ. ७९९-८८० )

येथे गौडजींनी हिंदु संस्कृतीची व्याख्या अप्रत्यक्ष रीत्या हिंदु-आचरण व हिंदु चरित्र केली आहे. पांचव्या पृष्ठावर ते लिहितातः—

"आदि द्रविड अब्राह्मणांत अधिकांश लोक स्वतःला अनार्य समजतात. परंतु त्यांना हिंदु म्हणवून घेण्यांत मुळीच संकोच वाटत नाही. उलट कित्येक आर्य-समाजी, शीख आणि ब्राह्मसमाजी लोकांना स्वतःला हिंदु म्हणवून घेण्यांत संकोच वाटतो." अर्थात् गौडांच्या अवलोकनानुसारच या देशामध्ये असे कित्येक लोक आहेत की, जे आर्य परंपरा व हिंदु-संस्कृति मानावयाला तयार नसूनहि हिंदुत्वाच्या कक्षेत येतात. हिंदु शब्दाच्या इयत्तेचें निरूपण करतांना उपसंहारांत त्यांनी हिंदु-आचार आणि हिंदु-चरित्र याचा जो उल्लेख केला आहे, त्याचेंहि खंडन त्यांच्याच पृष्ठ ५ व ६ वरील विवेचनानें होतें. आणि विशेषतः गौडजी तर कांहीं अटीवर मुसलमान व ख्रिस्ती यांनाहि हिंदु मानावयाला तयार आहेत. एवढें खरें की धर्मतः ख्रिस्ती अगर मुसलमान असलेल्या माणसाची हिंदुस्थान ही पुण्यभू असूं शकत नाही. हिंदु चरित्र आणि हिंदु आचार हे देखिल सर्वच देशकालांत एकसारखे व अपरिवर्तनीय राहिले असतील असेंहि नाही. सबब, हिंदुत्व शब्दाची व्यवहारोपयोगी अथवा तात्विक दृष्टीने शुद्ध व्याख्या करण्यांत श्री. गौड यांचा विश्व-कोष आम्हांला तिळमात्र मदत करीत नाही.

डॉ. पटवर्धनः—

कां तर कुणास ठाऊक पण हिंदु शब्दाच्या अव्याख्येयपणाला हिंदुधर्माचें दूषण समजून त्या शब्दाला परिमित करण्याचा प्रयत्न अलीकडे कांहीं वर्षांपासून हिंदुधर्मप्रेमी पंडित करीत आहेत. वऱ्हाडचे सुप्रसिद्ध कॉंग्रेस पुढारी डॉ. शिवाजी गणेश पटवर्धन यांनी " ईश्वरस्य स्वरूपं हि ॐ कारे व्यक्तलां गतम् " असें हिंदुत्वाचें सामान्य लक्षण सांगितलें आहे. म्हणजे जो 'ॐ कारा'ला ईश्वराचा विग्रह अगर मूर्त स्वरूप मानीत नाही, तो हिंदु होऊं शकत नाही. ॐ कार शब्दाचा अथवा प्रतीकाचा प्रयोग हिंदुस्थानांतील अधिकांश संप्रदाय करीत असले तरी ब्रह्म समाजासारखे सुधारक संप्रदाय त्याला ईश्वराचें व्यक्त रूप अथवा मूर्ति मानीत नाहीत. शिवाय स्वतःला हिंदु म्हणविणारी आणि ॐकाराला मान्यता न देणारी मंडळीहि आज आढळून येऊं शकतील. वीर सावरकर आणि कलंकी संप्रदायातील मंडळी स्वतःला हिंदुधर्माचे संरक्षक म्हणवून घेऊन देखील गाईला पवित्र किंवा अवध्य मानीत नाहींत अशीं उदाहरणें पुष्कळ आढळून येतील.

## कठीण कार्य

हिंदुत्वाची व्याख्या करतांना वस्तुस्थिति दृष्टिआड करून चालणार नाहीं. हल्लीच्या काळाप्रमाणें हिंदुत्वाची व्याख्या करणें किती कठीण काम आहे, हें वरील पंडितांच्या असफल प्रयत्नावरून स्पष्ट होतें. हिंदुत्वाचीं लक्षणें काय असावींत, हा प्रश्न नसून हिंदुत्वाचीं वर्तमान लक्षणें काय आहेत, हा मुद्याचा सवाल आहे. आणि दुसरा अधिक महत्त्वाचा प्रश्न असा की, जी हिंदुत्वाचीं म्हणून लक्षणें सांगितलीं जातात, तींच भारतीय राष्ट्रीयतेचीं लक्षणें मानतां येतील काय ?

## प्रा. शं. ल. गोखले

हिंदुत्वाचीं व राष्ट्रीयत्वाचीं वरीचशीं लक्षणें अविरोधी असूं शकतात. तथापि तीं समान अगर एकरूप मात्र असूं शकत नाहीत. ही अडचण जाणून अमेरिकेंत वास्तव्य करीत असलेले प्रा. शंकर लक्ष्मण गोखले यांनी मे १९३८ च्या 'पुरुषार्थां'त हिंदुत्वाच्या दोन वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत. पहिली धार्मिक दृष्टीने व दुसरी राष्ट्रीय दृष्टीने.

त्यांपैकी पहिली व्याख्या अशीः—

> अविभक्तं विभक्तेषु धर्मे यो वेत्ति तत्त्वतः ।
> निर्वैरः सर्वधर्मेषु स हिन्दुः इति शंकरः ॥

म्हणजे धार्मिक भेदांत जो अभेद पाहतो व कोणत्याहि धर्माबाबत वैरभाव ठेवित नाही तो हिंदु. प्रा. गोखल्यांची व्याख्या हिंदुत्वाचें वैशिष्ट्य कथन करीत नाही. आपण कोणत्याहि धर्माच्या सभ्य व विवेकशील अनुयायाला जर त्याच्या धर्माच्या बाबतींत विचारलें तर तोहि असेंच म्हणेल. सबब गोखल्यांची ही व्याख्या हिंदुधर्माची नसून धर्मसहिष्णुतेची किंवा धार्मिक औदार्याची आहे.

त्यांची दुसरी व्याख्या अशी आहेः—

> राष्ट्रस्य भूत्यर्थं अहिन्दुः धर्मतोऽपिसन्
> कायेन मनसा वाचा यतते हिन्दुरेव सः ।

याचा अर्थ असा की, धर्माने हिंदु नसूनहि जो काया, वाचा, मनाने राष्ट्राच्या अभ्युदयासाठी प्रयत्नशील असेल तो हिंदु होय. आपल्या म्हणण्याचें स्पष्टीकरण

म्हणून प्रा. गोखले यांनी बाजीराव आणि मस्तानीचा पुत्र समशेर बहादुर यांचें उदाहरण दिलें. प्रा. गोखल्यांच्या मतें समशेर बहादुर हा धर्मतः मुसलमान असूनहि हिंदु-राष्ट्राचा घटक होता.

अशा स्थितींत प्रा. गोखल्यांना आमचें निवेदन इतकेंच की, त्यांनी हिंदु शब्दाला द्व्यर्थी बनविण्याचा आग्रह धरूं नये. हिंदु शब्द धर्म अगर जातिवाचक असा हवा आणि राष्ट्र वा देशभावना व्यक्त करण्यासाठी ' हिंदुस्थानी ', ' भारतीय ' अगर ' हिन्दी ' यांपैकी एखाद्या शब्दाची निवड व्हावी.

## श्री. ग. वि केतकर

हिंदु शब्दाला राष्ट्रवाचक बनविण्याचा व्यर्थ आग्रह सोडून दिल्यास ही असंगति आणि विप्रतिपत्ति उत्पन्न होत नाही, हें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें. अखिल भारतीय हिंदु महासभेचे मंत्री श्रीयुत ग. वि. केतकर यांच्याहि लक्षांत हा विरोध येऊन तत्परिहारार्थ त्यांनी २९ जुलै १९४१ च्या ' केसरी ' मध्ये ' हिंदुराष्ट्र म्हणजे हिंदुराज्य नव्हे ' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला. हिंदुराष्ट्र आणि हिंदु-राज्य यांच्या पृथक्करणाचें केतकरांचें निरूपण आमच्या दृष्टीने परस्परविरोधी व असंगत प्रमेयांनी परिपूर्ण असें आहे. श्री. केतकर लिहितातः—

" हिंदुसभेच्या ध्येय-धोरणाच्या बाबतींत तिचे प्रतिस्पर्धी व टीकाकार यांच्याकडून कळत न कळत बरेच गैरसमज निर्माण करण्यांत येतात, खोटे ग्रह निर्माण केले जातात. यापैकी पहिला ग्रह असा की, हिंदुसभा हिंदुराज्य प्रस्थापित करूं इच्छिते, या बाबतींत जाणत्याकडूनहि ही चूक होते, हें विशेष होय. हिंदु-महासभेने आपल्यासमोर हिंदुराष्ट्राचीच कल्पना ठेवली आहे, पण हिंदुराष्ट्र म्हणजे हिंदुराज्य नव्हे, हें पूर्णपणे लक्षांत ठेवलें पाहिजे. वरील दोन शब्दांचें पृथक्करण केतकर खालीलप्रमाणे करतातः—

हिंदुसभेच्या घटनेंत हिंदुराष्ट्राचीं तीन मूलतत्त्वें समाविष्ट आहेत. तीं (१) हिंदु-जाति. (२) हिंदु संस्कृति. (३) हिंदुराष्ट्र. या तीन मूलतत्त्वांत हिंदुराज्याचा समा-वेष केलेला नाही. या तिन्हींचें एकत्रीकरण म्हणजे संस्कृति, परंपरा, जाति, सामाजिक चालीरीति यांनी एकरूप झालेला समाज! हिंदु सभेच्या नीतिप्रमाणे हिंदुस्थानच्या भावी सरकारचें स्वरूप पूर्ण जनतंत्रात्मक जाति-धर्म-पंथ-निरपेक्ष आणि समान नागरिकत्वाच्या अधिकाराने परिपूर्ण असें राहील. हिंदुमहासभेच्या घटनेमध्ये याच्या साध्याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहेः—

" हिंदुस्थानांतील हिंदु आणि अहिंदु जातींमध्ये परस्पर सद्भावना वाढविणें आणि जाति, पंथनिरपेक्ष विचार करून नागरिकत्वाचे अधिकार आणि कर्तव्यें यावर अधिष्ठित अशा स्वायत्त व संघटित भारतीय राष्ट्राच्या उन्नतीचा प्रयत्न करणें."

श्रीयुत केतकरांनी 'हिंदुराष्ट्र', 'हिंदुराज्य' आणि 'भारतीय राष्ट्र' या तीन संज्ञांचा प्रयोग केलेला आहे. आणि त्यांचें असें शपथेवर सांगणें आहे की, या तीनहि संज्ञा परस्पर अविरोधी आहे. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा होतो की, भारतीय राष्ट्र हिंदुराष्ट्रापेक्षा अधिक व्यापक आणि जाति-पंथातीत राहील. त्याचप्रमाणे भारतीय राज्य भारतीय राष्ट्राचें होईल, हिंदुराष्ट्राचें नव्हे! म्हणजे हिंदुत्व हा भारतीयत्वाचा पर्यायवाची शब्द होणार नाही. यांतून फलित होणारा अर्थ म्हणजे राष्ट्रीयतेसाठी हिंदुत्व अनिवार्य नाही; आणि म्हणून 'हिंदुस्थान हिंदूंचा' ही घोषणा चूक आहे.

हिंदुराष्ट्राच्या लक्षणांत केतकरांनी हिंदु राज्यशास्त्राचा पण अंतर्भाव केला होता. प्रश्न असा आहे की, भारतीय राज्य हिंदुराज्यशास्त्रानुसार असेल की, अर्वाचीन राज्यशास्त्रानुसार असेल? जातिधर्म=पंथनिरपेक्ष लोकसत्तेचा हिंदु-राज्यशास्त्राशीं कितपत मेळ बसेल? भारताची आगामी काळची राज्यप्रणाली अन्यधर्मावलंबी भारतवासीयांच्या राज्यशास्त्रांशीं कुठपर्यंत मिळते घेईल याचाहि विचार केला जाईल काय? जर केला जाणार नसेल तर भारतीय राज्य वस्तुतः आणि परिणामतः हिंदु-राज्यच होणार नाही काय?

## अनेक-राष्ट्रवाद

श्री. केतकरांच्या मीमांसेतून दुसरा असा प्रश्न निर्माण होतो की, एकाच देशांत अनेक राष्ट्रें निर्माण होतील काय? हिंदुस्थानांतील सर्व धर्मांगणिक भिन्नभिन्न राष्ट्रें निर्माण होतील काय? जे हिंदु-जाति, हिंदु-संस्कृति आणि हिंदु राज्य-शास्त्रांत समाविष्ट होऊं शकत नाही अशा भिन्न जातीय आणि भिन्न संस्कृतीवाल्या, आणि भिन्न राज्यशास्त्रांवर विश्वास ठेवणाऱ्या अनेक राष्ट्रांना एकत्र व एकाच राज्याचे घटक बनावें लागेल काय? तर मग श्री. महंमदअली जीनांचा 'अनेक-राष्ट्रवाद' मानावा लागेल. भारतीय राज्य अनेक उपराष्ट्रांचा समुच्चय होईल असें तर केतकरांना म्हणावयाचें नाही? तसें असल्यास त्या समुच्चयाचें आधारभूत तत्त्व सामान्य देश अथवा भौगोलिक राष्ट्रीयता याशिवाय आणखी कोणतें असूं शकेल?

## भौगोलिकतेचा आरोप

स्वा. सावरकरांनी आपल्या भागलपूरच्या मुख्य भाषणांत कॉंग्रेस आणि तत्सदृश दुसऱ्या संस्थांना खालीलप्रमाणे दूषण लावलें आहे:-

The Congress, the Forward Block and all such organisations in India, have sinned against this conception of real nationality under a false notion of geographical nationality."

(कॉंग्रेस, फॉरवर्ड ब्लॉक किंवा तत्सदृश इतर संस्था यांनी भौगोलिक राष्ट्रीयतेच्या मिथ्या कल्पनेच्या भरांत पडून खऱ्या राष्ट्रीयतेच्या या कल्पनेला विरोध करण्याचें पाप जोडलें आहे.)

## समान दोष

स्वा. सावरकर जेव्हा स्वतः धर्म-जातिनिरपेक्ष भारतीय नागरिकतेचें प्रतिपादन करतात तेव्हा ते भौगोलिक तत्त्वाचा आश्रय करीत नाहीत काय? नाही तर "जो भारताच्या चतुःसीमेंत येऊन राहिला असेल त्याला नागरिकतेचे सर्व अधिकार राहतील, असें ते कसें म्हणूं शकतात? मुस्लिम सत्तावाद्यांना प्रत्युत्तर म्हणून ते एकदां अगदी स्पष्ट असें म्हणाले होते की, 'तुर्कस्थानपासून अफगाणिस्थानपर्यंत जर तुमचा एक अखंड प्रदेश आहे तर आमचेंहि हिंदुकुशपासून टोकिओपर्यंत एक अखंड क्षेत्र आहे.' तथापि जपान युद्धामध्ये सामील होतांच 'तो स्वार्थ भावनेने प्रेरित झाला आहे, सबब आम्हांला त्याचा निःशंकपणें विरोध केला पाहिजे' असें त्यांनी म्हटलें. जपान आणि हिंदुस्थानबद्दलची हितविरोधी कल्पना देखील देशाश्रित राष्ट्रीयतेवरच अवलंबून नाही काय?

## पाकिस्तानवादांतून समानता

तात्पर्य, जर आमचें राष्ट्रीयत्व जाति-धर्मनिरपेक्ष असेल तर हिंदुत्व हें राष्ट्रीयत्वाचें एक अविरोधी आणि महत्त्वपूर्ण अंग असून देखील तें राष्ट्रीयत्व असूं शकत नाही. हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व असेल तर जाति-धर्मनिरपेक्ष राज्य देखील

वस्तुतः हिंदुराज्यच होईल, त्यांत आहिंदु अल्पसंख्यांक नागरिकांना नागरिकतेचे संपूर्ण अधिकार राहतील. अर्थात राष्ट्रीयत्व धर्माश्रितच राहील; आणि मग पाकिस्तान-वादाचेंहि आम्हाला तत्त्वतः समर्थन करावें लागेल. श्री. रामानंद चटर्जी आपल्या खालील शब्दांत आमच्या या विधानाला दुजोरा देतात.

" त्यांच्या ( सावरकरांच्या ) या मताने, जे मुसलमान स्वतःचें स्वतंत्र राष्ट्र मानतात, त्यांचें अप्रत्यक्ष समर्थन होतें. ( मॉडर्न रेव्ह्यू फेब्रुवारी १९४० )

विशुद्ध जनतंत्र आणि धर्माश्रित राष्ट्रीयता हीं दोन विसंवादी प्रमेयें आहेत.

## बहुमतवाल्यांचा संप्रदायवाद

या दृष्टीने हिंदुत्ववाद हा बहुसंख्यवाल्याचा जातीयवाद आहे. बहुसंख्यांकाचा तो जातिवाद असल्यामुळे त्याचें स्वरूप राष्ट्रीयतेसारखें भासतें तथापि त्यांत आणि पाकिस्तानवादांत कांहीच तात्त्विक फरक नाही. हिंदुत्वाला राष्ट्रीयत्व सिद्ध करण्याच्या दृष्टीने आतापर्यंत ज्या व्याख्या केल्या गेल्या आहेत त्यांच्या समालोचनावरून हा मुद्दा स्पष्ट होतो.

आपल्या भाषणांत वीर सावरकरांनी देखील म्हटलें आहे:—

It ( the Hindu Mahasabha ) realises that the best interests of the Hindus them-selves demand under the present circumstances that the Indian nation and the Indian state should be based on these fundamental foundations.

( हिंदूंच्या परमहिताच्या दृष्टीने आजच्या स्थितींत भारतीय राष्ट्र आणि भारतीय राज्य हीं याच मूलभूत सिद्धांतावर आधारलीं गेलीं पाहिजेत असें हिंदुसभेला वाटतें. )

The conception of any genuine nationality also, that takes no account of any communal or credal super-arrogations into consideration, can go no further.

( कसल्याहि अनुचित सांप्रदायिक किंवा जातीय विचारांची अथवा विरोधाची हरकत न बाळगणारी यथार्थ राष्ट्रीयत्वाची कल्पना देखील यापेक्षा अधिक पुढे जाऊं शकत नाही. )

म्हणजे आजच्या परिस्थितींत हिंदु–हित आणि राष्ट्र–हित यांत विरोध नसल्यामुळे हिंदुत्वनिष्ठ व्यक्तीला विशुद्ध राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करण्यांत अडचण नाही. ऑक्स्फर्डमध्ये एका प्रश्नाला उत्तर देतांना गांधीजींनी खालीलप्रमाणे आपलें मत प्रकट केलें होतें.

' They will have a national solution of the question, not because they are nationalists; but because it suits them ! '

( हा प्रश्न राष्ट्रीय दृष्टीने विचार करून ते सोडवूं शकतात, तो त्यांची दृष्टि राष्ट्रीय आहे म्हणून नव्हे, पण तें त्यांना परवडतें म्हणून. )

या आक्षेपाचें निरसन फक्त एका गोष्टीनें होऊं शकतें, आणि ती म्हणजे आम्ही हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व यांना एक किंवा पर्यायवाची सिद्ध करावयाचा प्रयास सोडून दिला पाहिजे. हे दोन्ही भाव अन्योन्य व्यावर्तक किंवा विरोधी नाहीत; त्याचप्रमाणे समवर्ग किंवा समान भूमिका असलेलेहि नाहीत.

## यथार्थ राष्ट्रधर्म

हिंदुत्व व्यापक व सर्वसंग्राहक आहे म्हणून तें अव्याख्येय आहे. हिंदुत्वाची व्यावर्तक व्याख्या होऊं शकत नाही. हें हिंदुत्वाचें दूषण नसून भूषण आहे. सबब " जो स्वतःला हिंदु समजेल किंवा हिंदु म्हणून घेईल किंवा हिंदुधर्माचा त्याग करणार नाही, " त्याला हिंदु म्हणावें. परंतु तेंच राष्ट्रीयत्व नव्हे ! हिंदुत्व राष्ट्रीयत्वाशीं अविरोधी आहे; तथापि राष्ट्रीयत्वाची अनिवार्य अट मात्र.ती नव्हे. " जो हिंदुस्थानला आपली मातृभूमि समजतो, इतर देशाबद्दल द्वेषभावना न ठेवतां हिंदुस्थानावर विशेष प्रेम ठेवतो आणि अन्यदेशीय स्वधर्मीयांपेक्षा एतद्देशीय परधर्मीयांना आपल्या प्रेमाचे व सेवेचे प्रथम व विशेष अधिकारी मानतो, तो या राष्ट्राचा घटक आहे— हिंदुस्थानी आहे. " एवढें राष्ट्रीयतेचें लक्षण आमच्यासाठी पुरें आहे. तें केवळ भौगोलिक नाही.

या लक्षणानुसार दादाभाई नौरोजी, जोसेफ बॅप्तिस्टा, नारायण वामन टिळक, मौलाना आझाद इत्यादि देशभक्त हिंदु नसले तरी हिंदुस्थानी आहेत. आणि जेम्स कझीन्स, सावित्रीदेवी, भगिनी निवेदिता हिंदुस्थानी नसून देखील हिंदु आहेत.

हीच शुद्ध राष्ट्रीयता होय असें मला नम्रपणें वाटतें. राष्ट्रवादाच्या नांवावर हिंदुसभानिष्ठ आणि मुस्लिमलिगनिष्ठ यांच्याकडून जे सिद्धांत उपस्थित केले जातात, ते सदोष आहेत. तार्किक दृष्टीने तो शबल राष्ट्रवाद असून ज्या राष्ट्रीयतेचें गांधीजी आणि कॉंग्रेसकडून प्रतिपादन केलें जात आहे आणि प्रत्यक्ष प्रयोगांनी जिचा विकास होत आहे, तीच यथार्थ राष्ट्रीयता होय.

( हिंदी, सर्वोदय, जाने. १९४२ )

# पाकिस्तानी प्रवृत्तीचा प्रतिकार

★ ★ ★

## पाकिस्तानचे विरोधी भक्त

पाकिस्तानची चळवळ सुरूं झाल्यापासून पाकिस्तानला विरोध करणारा आणि त्याचें समर्थन करणारा असे दोन पक्ष अस्तित्वांत आले आहेत. समर्थन करणाऱ्यांमध्ये फक्त मुसलमानच आहेत असें नाही. समाजक्रान्तीचे निष्ठावान् पुरस्कर्ते असे साम्यवादी लोकहि आज पाकिस्तानच्या मागणीचें समर्थन करतांना आढळून येतात. साम्यवादी पाकिस्तानचें जें समर्थन करतात तें सर्वांनाच पटण्यासारखें नसलें, तरी कळण्यासारखें खात्रीने आहे. पण कळून सवरून आणि विचारपूर्वक पाकिस्तानचें समर्थन करणाऱ्या साम्यवादी पक्षाहून निराळा असा एक पाकिस्तानचें समर्थन करणारा वर्ग आहे. आणि तो म्हणजे राष्ट्रीयत्वाच्या व धर्मनिष्ठेच्या चुकीच्या कल्पनांच्या आधारावर पाकिस्तानला निकराचा विरोध करून तद्द्वारें त्याचें समर्थन करणाऱ्या विरोधी भक्तांचा. पाकिस्तानच्या प्रश्नाचा विचार राजकीय व आर्थिक दृष्टींनीं बराच झालेला आहे. त्याचप्रमाणें सांस्कृतिक, धार्मिक व राष्ट्रीय दृष्टीनेहि त्याची पुष्कळच चर्चा झालेली आहे. यांत सर्व दृष्टींचा समावेश करणारी अशी जी मानवी सहजीवनाची दृष्टि, त्या दृष्टीने आज थोडासा विचार करण्याचें योजिलें आहे.

## राष्ट्रीयत्वाची व्याख्या कोणती ?

'राष्ट्र' शब्दाची व्याख्या सारखी बदलत व विकास पावत आलेली आहे. आणि आज राष्ट्रीयत्व व मानव्य हे शब्द जवळजवळ समानार्थक व समव्याप्त होण्याच्या बेतांत आले आहेत. राष्ट्रीयत्वाच्या साऱ्या जुन्या व्याख्या आजच्या

विकसित जीवनाला अपुऱ्या पडूं लागल्या आहेत. यामुळे राष्ट्रीयत्वाची शास्त्रीय व तर्कशुद्ध व्याख्या करणें आज जवळजवळ अशक्य होऊन बसलें आहे असें म्हटलें तरी चालेल. जुन्या ब्राह्मणांच्या घरण्यांत साधारणपणें कपडे वापरण्याची पद्धत कमीच. त्यामुळे तीन चार वस्तु नेहमीं कौटुंबिक मालकीच्या असायच्या. टोपी, छत्री आणि जोडा. ज्याला बाहेर जायचें असेल त्यानें ती टोपी वाटोळी नसली तरी उलटी, सुलटी, आडवी, उभी हवी तशी घालावी; आणि जोडाहि पुणेरी नसला तरी वाटेल त्या पायांत वाटेल तो जोडा घालावा. या वापराचा परिणाम असा होत असे कीं, त्या टोपीला आणि त्या जोड्याला आकार म्हणून उरत नसे. अलीकडे अतिशय वापरांत आलेल्या कांही शब्दांची अशी गमतीदार स्थिति झालेली आहे. त्यापैकींच राष्ट्रीयत्व हाहि एक शब्द आहे. तो इतक्या निरनिराळ्या लोकांनी इतक्या निरनिराळ्या अर्थांनी वापरलेला आहे की, त्याचा आकारच समूळ नाहीसा झालेला आहे आणि तो नुसता गोलमाल शब्द होऊन बसला आहे.

## तीन धुरीणांच्या तीन तऱ्हा

त्यामुळे कशी गंमत झालेली आहे पहा. पंडित जवाहरलाल नेहरू हे आपल्या आत्मचरित्रांत हिंदुस्थानांतील द्विराष्ट्रवादाविषयीं म्हणतात,× "राजकीय दृष्टया ही कल्पना निर्बुद्धपणाची व आर्थिक दृष्टया शेखमहंमदी आहे. ती मुळीं विचारांत घेण्यासारखीहि नाही." याच्या उलट राष्ट्रीयत्वाचे सुप्रसिद्ध भाष्यकार स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी १९३७ सालीं अहमदाबाद येथे हिंदु सभेच्या अध्यक्ष-पदावरून असें जाहीर केलें कीं,* "आज हिन्दुस्थान हें एकविध आणि एकजिनसी राष्ट्र आहे असें म्हणतां येणार नाही. उलटपक्षीं हिन्दुस्थानांत हिन्दु व मुसलमान अशीं दोन प्रमुख राष्ट्रें आहेत." मुस्लीम लीगचे एकमेव नेते कायदे आझम मुहम्मद अली जिनासाहेब यांनीहि असे, याच आशयाचे उद्गार काढले आहेत. त्यांचें

× "Politically the idea is absurd; economically it is fantastic, it is hardly worth considering"

* "India cannot be assumed today to be a unitarian and homogeneous nation; but on the contrary there are two nations in the main; the Hindus and Muslims, in India"

म्हणणें,★ " इस्लाम आणि हिन्दुधर्म हे खऱ्या अर्थाने धर्म या संज्ञेला पात्र नाहीत. वस्तुतः हीं दोन भिन्न व एकमेकांहून अगदीं वेगळ्या स्वरूपाचीं अशीं समाजविधानें आहेत. हिन्दु व मुसलमान मिळून कधीं काळीं संयुक्त राष्ट्रीयत्वाचा विकास करूं शकतील ही आशा बाळगणें हें केवळ एक स्वप्न आहे. "

## विरोधांतला अभेद

पं. जवाहरलाल, वीर सावरकर आणि श्री. जिना यांनी राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवरून केलेलीं हीं विधानें सूचक आहेत. वीर सावरकर आणि श्री. जिना यांच्या भूमिकेंत विलक्षण साम्यच नव्हे तर अभेद आहे, हें त्यांच्या विधानांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. त्या दोघांच्या भूमिकेंत आणि पं. जवाहरलालांच्या भूमिकेंत जो मूलभूत फरक आहे, तोहि स्पष्ट आहे.

द्विराष्ट्रवाद आधीं कुणी उपस्थित केला हा प्रश्न इतर दृष्टीनीं कितीहि महत्त्वाचा असला, तरी प्रस्तुत लेखांतील विवेचनाला त्याचें तादृश महत्त्व नाहीं. तो वाद कुणीहि सुरू केला असो, त्याचा पुरस्कार आज दोन्ही जातिवादी पक्ष करीत आहेत एवढें मात्र खरें. 'मुसलमान हें एक स्वतंत्र राष्ट्र आहे,' याला उत्तर म्हणून 'हिंदु हेंच राष्ट्र आहे,' असें म्हणणें म्हणजे त्या विधानाला विरोध करणें नसून त्याचें समर्थन करणें आहे. कारण, हिन्दु हें जर एक राष्ट्र असेल, तर मुसलमान हें एक राष्ट्र आहे असें म्हणणें क्रमप्राप्तच आहे.

## पण हे मुद्दे गौण आहेत

त्याचप्रमाणें पाकिस्तानच्या कल्पनेचा जनक किंवा मंत्रद्रष्टा रहमत अलीखां होते, सर मुहम्मद इकबाल होते कीं डॉ. लतीफ आहेत, पाकिस्तानची व्याख्या काय, मुस्लिम लीगने पाकिस्तानची एखादी अधिकृत योजना मांडली आहे काय, मांडली असल्यास ती कितपत व्यवहार्य आहे, आर्थिक दृष्टीनें कितपत परवडण्याचा संभव

★ " Islam and Hinduism are not religions in the strict sense of the word, but are in fact different and distinct social orders and it is only a dream that Hindus and Muslims can ever evolve a common nationality. "

आहे, इ. प्रश्न फार महत्त्वाचे असले, तरी तत्त्वतः गौण आहेत. कारण पाकिस्तान जर मुसलमानांच्या हिताचें असेल, त्याने आपल्या देशाची उन्नति होणार असेल आणि जनतेचें कल्याण होणार असेल, तर तें आर्थिक दृष्टीने परवडण्यासारखें होईल अशी तरतूद आपण मोठ्या आस्थेने व अगत्याने करून दिली पाहिजे.

## मागणीचें मर्म हें आहे

मुसलमान हें एक राष्ट्र आहे, याला आधार काय, तर त्यांचा धर्म एक आहे म्हणून. याहून निराळें उत्तर या प्रश्नाला देतां येत नाही. ज्यांचा ज्यांचा धर्म एक असेल, ते सारे एका राष्ट्राचे घटक असाहि याचा अर्थ नाही. कारण, युरोपांतील तुर्कस्थान व आशियांतील अरबस्थान, इराण, अफगाणिस्थान वगैरे राष्ट्रें मुसलमान असूनहि भिन्न आहेत आणि भिन्न राहण्याकडेच त्यांचा कलहि आहे. अर्थात् पाकिस्तानच्या मागणीच्या मुळाशीं ' ज्यांचा धर्म एक त्यांचें राष्ट्र एक ' ही भावरूप कल्पना नसून, दोन भिन्न धर्मांचे लोक एकत्र राहूंच शकत नाहीत अशी निषेधात्मक व व्यवच्छेदक कल्पना आहे. जगांतील साऱ्या मुसलमानांचे कांही एक राष्ट्र नाही. तेव्हा मुसलमानांचें स्वतंत्र राष्ट्र हिंदुस्थानांत कशाला हवें ? या प्रश्नाला मुसलमानांचें अर्थात् पाकिस्तानवाद्याचें उत्तर असें की, साऱ्या मुसलमानांचें एक राष्ट्र असलेंच पाहिजे असें नाही. पण मुसलमान व मुसलमानेतर यांचें मिळून मात्र एक राष्ट्र राहूंच शकत नाही. सारांश असा की, दोन धर्मांचे लोक समान नागरिकत्वाच्या भूमिकेवर एकत्र नांदूं शकत नाहीत.

## संस्कृतीहि बदलते

कारण काय, तर त्यांच्या संस्कृतींत भेद आहे म्हणून. ' राष्ट्रीयत्व ' या शब्दाप्रमाणेंच हा ' संस्कृति ' शब्दहि फार प्रचलित, अतिशय लोकप्रिय, पण समजायला अत्यंत कठिण असा आहे. ' संस्कृति ' देखील बदलत असते, तिची प्रगति होत असते. सांस्कृतिक प्रगतीचीं लक्षणें सार्वभौम आहेत. सामाजिक मूल्यांच्या विकासाला आपण सांस्कृतिक प्रगति म्हणतों. जगांतील सगळ्याच देशांचीं सामाजिक मूल्यें हळुहळू सारखीं होऊं लागलीं आहेत. व्यक्तींच्या बाबतींत आपण सुसंस्कृत व असंस्कृत असा भेद करतांना कुठलें गमक वापरतों ? ज्या व्यक्तीला इतरांबरोबर राहण्याची कला साधली, ती संस्कृत; जिला हें साधत नाहीं ती असंस्कृत, अनार्य, असभ्य. या संस्कृतीलाच व्यक्तीच्या बाबतींत 'चारित्र्य' अशी संज्ञा आहे.★ "माणसाच्या

---

★ A talent may be cultivated in solitude but a character needs the whirl of world.

एखाद्या विशिष्ट गुणाचा विकास एकांतांत होऊं शकेल, पण चारित्र्याचा विकास मात्र संसाराच्या धुमश्चक्रींतच होऊं शकतो" असें शिक्षणशास्त्राचें एक महनीय तत्त्व आहे. चारचौघांबरोबर राहतां येणें, स्वतः सुखांत राहून इतरांना सुखी करतां येणें, ही चारित्र्याची किंवा सुसंस्कृतपणाची मुख्य कसोटी आहे. व्यक्तीला जो न्याय लागू आहे, तोच व्यक्तिसमूहांनाहि लागू आहे. दोन संस्कृती जर एकत्र नांदूं शकत नसतील, तर त्या संस्कृतीच नाहीत, असंस्कृती आहेत, असें म्हणावें लागेल. या पुढे जगाची प्रगति विश्वराष्ट्राकडे किंवा मानवराष्ट्राकडे व्हावयाची आहे. त्याला अनुकूल अशा आर्थिक व सामाजिक भूमिकेचा विकास करणें हा आपल्या सगळ्या सांस्कृतिक चळवळींचा उद्देश असायला पाहिजे. या दृष्टीने आमची संस्कृति वेगळी म्हणून आम्हीं इतरांबरोबर राहूं शकत नाही, हें म्हणणें संस्कृतीचें द्योतक नसून संस्कृतीच्या अभावाचें द्योतक आहे.

## मानव धर्म हाच मुख्य धर्म

धर्मांच्याहि बाबतींत असेंच म्हणतां येईल. माणसांना एकमेकांच्या जवळ आणून, एका देवाचीं लेंकरें म्हणून त्यांना गुण्यागोविंदानें एकत्र राहायला शिकविणारें जें धारणेचें तत्त्व त्याचें नांव धर्म. पण उपास्यें निरनिराळीं झालीं कीं उपासकांचें एकत्र राहणें अशक्य होऊन बसतें, असा अनुभव नेहमींच येतो. शैव व वैष्णव यांचे कलह तर इतिहासप्रसिद्धच आहेत. जो देव उपासकाला जुगुप्सा, तुटकपणा, मानवद्रोह शिकवितो, तो देव नव्हे, सैतान आहे; आणि जो धर्म आपल्या अनुयायांना अन्यधर्मीयांपासून दूर राहावयाला सांगतो तो धर्म नसून 'कली' आहे, ही गोष्ट धार्मिक लोकांच्या ध्यानांत अजून येऊं नये, हें धर्मांचें मोठेंच दुर्दैव होय. असा धर्म यापुढे, त्याच्या अनुयायांनी अगदी जंग जंग पछाडलें तरी, जगांत टिकणें शक्य नाही हें देवच बोलून चुकला आहे. म्हणून सांस्कृतिक समन्वयाच्या व धर्मसमन्वयाच्या दिशेने ज्या धर्मांचा विकास होईल, तेच जगांत टिकतील व हळुहळू मानवधर्माच्या पवित्र महासागरांत विलीन होऊन कृतार्थ होतील.

## पुण्यभूची एकांगी व भ्रामक कल्पना

अर्थात् पाकिस्तानी वृत्तीला विरोध करावयाचा असेल, तर समन्वयाच्या व व्यापक धर्मभावनेच्या विकासाचा प्रयत्न केला पाहिजे. पण अनेक पाकिस्तान-विरोधी शहाणीं माणसें सुद्धां पाकिस्तानाविरोधाच्या नांवावर त्याच वृत्तीला बळी

पडतांना दिसत आहेत. त्यांच्या प्रयत्नांनी पाकिस्तानला अगदीं व्यवस्थित प्रोत्साहन मिळत आहे. हिन्दुत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व या सूत्राचें प्रतिसूत्र मुसलमान हें एक स्वतंत्र राष्ट्र आहे हें आहे आणि 'पुण्यभूमी'चाच पर्यायवाचक शब्द 'पाकिस्तान' हा आहे. मुसलमानाला वाटतें, ज्या भूप्रदेशांत माझे सहधर्मी राहतात तो पवित्र प्रदेश आणि जेथे इतर राहतात तो अपवित्र देश—निदान पवित्र देश नव्हे. त्याचप्रमाणें हिन्दूला वाटतें, जेथें माझा धर्म जन्माला आला ती पुण्यभूमि. या दोन्ही कल्पना त्याज्य आहेत असें मला म्हणायचें नाही. पण त्या एकांगी व अव्याप्त आहेत आणि म्हणून व्यावर्तक आहेत. ज्यांत मुसलमान राहतात तो पुण्यदेश, या म्हणण्यांत वावगें असें कांहीच नाही. पण, ज्यांत इतर धर्मीय राहतात तोहि पुण्यदेश या भावनेची जोड त्याला दिली पाहिजे. त्याचप्रमाणें पुण्यभूची कल्पनाहि व्यापक व संग्राहक झाली पाहिजे. आणि जेथे दोन धर्मांचे किंवा अनेक धर्मांचे लोक एकत्र राहत असतील, तो परम पुण्य देश, तें मानव्याचें पावन तीर्थस्थान, ती अखिल जगताची काशी, अशा भावनेचें अधिष्ठान त्या भावनेला मिळालें पाहिजे.

## फाजील धर्माभिमानाचे दुष्परिणाम

व्यावर्तक राष्ट्रभावनेचे, व्यावर्तक धर्मभावनेचे व व्यावर्तक सांस्कृतिक भावनेचें रूपांतर आक्रमणशक्ति व जयिष्णु राष्ट्राभिमानांत, धर्माभिमानांत व संस्कृत्यभिमानांत होऊन शेवटीं त्याचें पर्यवसान पारस्परिक राष्ट्रद्वेषांत, धर्मद्वेषांत व सांस्कृतिक द्वेषभावनेंत कसें होतें याचा अनुभव आपल्याला भरपूर येऊन चुकलाच आहे. मग एकानें म्हटलें कीं दिल्लीपासून कस्तुनतुनियापर्यंत आमचें मुसलमानांचें अखंड अधिराज्य राहील, तर दुसरा उत्तर देतो हिंन्दकुशपासून टोकियोपर्यंत आम्हां हिंदूंचेंहि अखंड अधिराज्य राहील. एकानें म्हटलें कीं, निझाम आमच्या वैभवाचें व सामर्थ्याचें प्रतीक आहे, तर लागलीच दुसरा उत्तर देतो कीं, नेपाळेश्वर आमच्या बाणेदारपणाचें व ऐश्वर्याचें प्रतीक आहे. या अभिनिवेशाला सीमा नाहीं. याचें प्रत्यंतर हवें असल्यास एका प्रमुख मुसलमान पुढाऱ्याचे व एका प्रमुख हिन्दु पुढाऱ्याचे खालील उद्गार पहा. हे दोघेहि पुढारी त्यांतल्या त्यांत अगदीं कट्टर धर्मवेडे मानले जात नाहींत. त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या धर्माभिनिवेशाचा जालिमपणा राष्ट्रभावनेनें सौम्य झाला आहे, असें मानलें जातें.

## ही भाषणें काय दर्शवितात ?

श्री. फझलूल हक साहेब एकदां म्हणाले,* ( "…' मुहम्मद बिन कासिम हा आठ वर्षांचा पोर अठरा शिपायांसह जर सिंध जिंकूं शकला, तर नऊ कोटी मुसलमान सबंध हिंदुस्थान खात्रीनें जिंकूं शकतील. ) लाला हरदयाल यांची मजल याच्याहि पुढें गेली. ते म्हणाले, ╫ ( हिंदूंना जर आत्मसंरक्षण करायचें असेल तर त्यांनीं अफगाणिस्तान व सरहद्दी जिंकून तेथील लोकांना व पहाडी जातींना हिंदु बनाविलें पाहिजे ).

अशा रीतीनें व्यावर्तक राष्ट्रवादाचें पर्यवसान व्यावर्तक आंतरराष्ट्रीयवादांत, हिंदु व मुस्लीम आंतरराष्ट्रीयत्वांत झालेलें दिसून येते.

## सांस्कृतिक समन्वयाची आवश्यकता

हरेकाला वाटतें, माझाच धर्म व संस्कृति उत्कृष्ट आहे, इतरांचा धर्म व संस्कृति निकृष्ट आहे; किंबहुना माझाच काय तो धर्म व संस्कृति आणि इतरांचा तो अधर्म व असंस्कृति अशी उत्कट भावना असते. त्यामुळे दोन धर्मांचे किंवा दोन संस्कृतींचे सहजीवन अशक्य वाटतें. मग अर्थात् त्या दोन्हींपैकीं एकाला हद्दपार तरी केलें पाहिजे, निःशेष तरी केलें पाहिजे किंवा आत्मसात् तरी केलें पाहिजे. म्हणजे सगळ्या हिंदूंना मुसलमान करून उभा हिंदुस्थान पाकिस्तान तरी बनविला पाहिजे किंवा साऱ्या मुसलमानांना हिंदू बनवून त्यांची पुण्यभूमि तरी झाली पाहिजे. म्हणजे हिंदु व मुसलमान एकाच अटीवर एकत्र राहूं शकतात. ती

* " … Mohmmad bin Kasim, an eight year old boy with eighteen soldiers could conquer sind; then surely nine crores of Muslims could conquer the whole of India. ( Quoted from, 'Communal Triangle' by Asok Mehta and Achyut Patawardhan P. 156)

╫ If Hindus want to protect themselves, they must conquer Afganistan and the frontiers and convert them and all the Mountain tribes. ( Ibid P. 156 )

ही की, एक तर मुसलमानांनीं हिंदु व्हावें किंवा हिंदूनीं मुसलमान व्हावें म्हणजेच ते एकत्र राहूं शकत नाहीत. पाकिस्तानी वृत्ति ती हीच. पाकिस्तानविरोधी वृत्ति म्हणजे हिंदूंना हिंदु म्हणून व मुसलमानांना मुसलमान म्हणून एकत्र राहिलें पाहिजे ही भावना. त्या दिशेने पद्धतशीर व नेटाचा प्रयत्न करणें म्हणजे पाकिस्तानविरोधी चळवळ. आतापर्यंत ज्या चळवळी झाल्या, त्या सांस्कृतिक स्वाभिमानाला पोषक झाल्यामुळे त्यांचें पाऊल सांस्कृतिक संघर्षाकडे पडत गेलें. आता सांस्कृतिक समन्वयाच्या दृष्टीने प्रयत्न व प्रयोग होणें आवश्यक आहे.

## ' पाकिस्तान ' कां पोसले जाते ?

व्यावर्तक भावनेतून पाकिस्तानी वृत्तीचा परिपोष कसा होतो तें पाहण्यासारखें आहे. दोघेहि एकमेकांना म्हणअत, ' मी तुझी भाषा शिकणार नाही, तुझे साहित्य वाचणार नाहीं, तूं तयार केलेला माल वापरणार नाहीं, तुझ्या शाळेंत शिकणार नाहीं. अर्थात् तुझ्या प्रार्थनामंदिरांत तरी मग कसचा येतो ? ' म्हणजे काय कीं, दोघांच्या भाषा वेगळ्या, त्यामुळें दोघांच्या वसाहती वेगवेगळ्या, जातीय स्वदेशीमुळें दोघांच्या बाजारपेठाहि वेगवेगळ्या. भाषाभेदामुळें शाळा वेगळ्या झाल्याच. म्हणून विद्यापीठेंहि निरनिराळीं. देवळें वेगवेगळीं आहेतच. वसाहती वेगळ्या, बाजार वेगळे शिक्षणालयें वेगळीं, देवालयें वेगळीं !—आतां आणखी पाकिस्तानला काय शिंगें राहिलीं ! आणि हें पाकिस्तान विशिष्ट प्रांतापुरतेंच होणार नसून साऱ्या देशभरांत होईल.

## उत्तान स्वरूपाचें प्रदर्शन

पाकिस्तानी मनोवृत्तीचें अत्यंत उत्तान स्वरूप हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांच्या वेळीं दिसून येतें. मुसलमानांच्या आळींत राहणारे हिंदु, हिंदु आळींत निघून जातात; आणि हिंदूंच्या आळींतील मुसलमान, मुसलमान मोहल्ल्यांत निघून जातात. एकीकडे हिंदुस्तान असतें, दुसरीकडे पाकिस्तान असतें; दोघांचीहि वृत्ति एकमेकांविषयीं साशंकतेची असते. दोघांनाहि परस्पर नकोसे असतात, त्यामुळें दोघांनाहि मध्यें इंग्रज सरकारचा पहारा हवासा वाटतो. दंग्यानंतर खटले सुरू झाले म्हणजे या भावनेला आणखी व्यक्त स्वरूप येतें. हिंदु म्हणतो, मुसलमानाच्या कोर्टांत माझा खटला चालू नये. मुसलमान म्हणतो, मला हिंदु न्यायाधीश नको. अर्थात् परिणामत दोघेहि मिळून म्हणतात कीं, आम्हांला इंग्रज न्यायाधीश हवा.

## शास्त्रशुद्ध तोडगा हवा

परंतु आज सांस्कृतिक चळवळींच्या नांवावर ज्या प्रकारच्या चळवळी चालू आहेत, त्यांचा परिणाम ही परिस्थिति दंग्यापुरतीच मर्यादित न ठेवतां कायमची स्थिर करण्यांत होणार आहे. तसें होऊं नये ह्मणून पाकिस्तानच्या प्रवृत्तींचा प्रतिकार करण्याचा शास्त्रशुद्ध व प्रभावशाली मार्ग शोधून काढला पाहिजे. हल्लींचा हिंदु-मुस्लिम वाद हा जितका धार्मिक किंवा सांस्कृतिक आहे, त्यापेक्षां सामाजिक अधिक आहे. माझ्या ह्मणण्याचा अर्थ स्पष्ट करण्याकरितां एक उदाहरण देतों. खान–पाणंदी-कर विवाह जेव्हां झाला, तेव्हां उभ्या महाराष्ट्रांत संतापाची व विरोधाची एक प्रचंड लाट उसळली. त्या वेळीं आम्ही कांही मित्रांनीं त्या विरोधाची वास्तविक मीमांसा केली होती. तो विरोध धार्मिक भूमिकेवरून किंवा नैतिक भूमिकेवरून करण्यांत आला नव्हता असें आमचें मत होतें. कारण अनेक गोऱ्या बायांशीं हिंदी पुरुषांनीं लग्नें केलीं होतीं. त्यांचा विरोध म्हणण्यासारखा कोणीच केला नाहीं. याहि बाबतींत पाणंदीकर ही मुलगी असण्याऐवजीं जर मुलगा असती, तर निषेधा-ऐवजीं कदाचित् अभिनंदन झालें असतें. म्हणजे हा विरोध संख्यावादी भूमिकेवरून अर्थात् राजकीय भूमिकेवरून आणि अंशतः सामाजिक भूमिकेवरून करण्यांत आला होता. आणि त्याच्या मुळाशीं दोन्ही समाजांना एकमेकांविषयीं वाटणारा तिटकारा होता. साहेबी टोपीला विरोध नाहीं आणि फेज टोपीला मात्र आहे ही गोष्ट देखील याच परस्पर तिरस्काराची द्योतक आहे.

## अविश्वास खणून काढा

सारांश, या परस्पर द्वेषवृत्तीच्या मुळाशीं एकमेकांच्या विषयींचा अविश्वास व भीति आहे. हाच पाकिस्तानी वृत्तीचा पाया आहे. तो खणून काढावयाचा म्हणजे परस्परविश्वास आणि परस्परप्रेम उत्पन्न करण्याचे प्रयत्न निश्चयाने सुरू झाले पाहिजेत. धार्मिक व सांस्कृतिक सहजीवनाचा मार्ग प्रशस्त करण्याकरितां दोघांनाहि एकत्र राहतां येईल, अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे. आज तर अशी स्थिति आहे की, दोघांनाहि परस्परांना " मी तुझी भाषा शिकणार नाही ' किंवा ' मला तुझी भाषा कळत नाहीं ' असें सांगावयाचें झाल्यास इंग्रजीचाच उपयोग करण्याची पाळी यावी. दक्षिणेस प्रवास करतांना आगगाडींत तिकडील लोक बोलूं लागले म्हणजे ' मला तुमची भाषा कळत नाही ' एवढें तरी त्यांच्या भाषेंतील वाक्य शिकून

ठेवावें लागतें. जेथें हीहि तयारी नसेल, तेथें सहजीवनाविषयीं बोलणेंच खुंटलें म्हणावयाचें.

## गांधीजींचा अनुकरणीय कित्ता

या दृष्टीनें जर गांधींच्या भूमिकेचा विचार केला, तर आपल्याला असें दिसून येईल कीं, परस्परस्नेहाची व विश्वासाची परिस्थिति निर्माण करण्याचा प्रयत्न अत्यंत कळकळीनें आणि निर्भयतेनें त्यांनीच केलेला आहे. ते जणू प्रतिपक्षाला म्हणतात, "तूं माझी भाषा शिकणार नसलास, तरी मी तुझी भाषा शिकणार! कारण तुझा विश्वास विच्छेदावर आहे आणि माझा ऐक्यावर आहे. तुझें अनुकरण मी करूं लागलों तर मीहि विच्छेदवादी होईन. मी अखंड हिंदुस्थानवादी असल्यामुळें तुझी भाषा शिकेन, तुझ्या धर्माचें ज्ञान करून घेईन, तुझी सेवा करीन आणि तुझ्या हृदयांत स्थान मिळवीन. कुठलाहि धर्म विच्छेद शिकवूं शकतो, हें मानण्याइतका नास्तिक मी नाही. इस्लाम हा धर्म आहे असें मी मानतों. तेव्हां इस्लाम विच्छेद शिकवील असें मानून मी त्या धर्माचा उपमर्द कसा करूं? जो भावाची नफरत [घृणा] करील त्याला पाक म्हणावें काय? भावाशीं परहेज [सोवळें] करील त्याला पवित्र म्हणावें? काय पवित्रता जुगुप्सेचें नांव आहे? इस्लामाची अशी शिकवण असूं शकते कां? माझ्या मनांत इस्लामाविषयीं जी श्रद्धा आहे तीमुळें मला तसें मानतां येत नाही" असें म्हणून गांधीजी प्रेमाचे व विश्वासाचे इतके हिंमतीचे प्रयोग करतात कीं, कित्येक वेळां आम्हांला अगदीं भोंवळ येते. समर्पणाचें शास्त्र हें प्रेमाचें पहिलें कलम आहे, असें ते सांगतात. त्यामुळें त्यांच्या प्रयोगांत सौद्याला, बाजारधर्माला वाव राहात नाही.

## एकराष्ट्रीयत्वाचा मूल्यवान वारसा

हिंदुस्थानाचें एकराष्ट्रीयत्व आमच्या पूर्वजांनी अनेक शतकांच्या प्रयोगानंतर व प्रयत्नानंतर सिद्ध केलें आहे. तो आमचा सर्वांत मोठा मूल्यवान वारसा आहे. त्याचें संरक्षण आपला प्राण देऊनहि केलें पाहिजे, अशी गांधीजींची भावना आहे. म्हणून ते म्हणतात, "हिंदुस्थानचे तुकडे करण्यापेक्षा माझ्या शरीराचे तुकडे झालेले पुरवतील!" पण इतकी तीव्र पाकिस्तानविरोधी भावना असूनहि सांस्कृतिक सहजीवनाचा मार्ग सुकर करण्याकरिता त्याला परस्परविश्वासाचें व स्नेहाचें वातावरण

निर्माण करावयाला पोषक असेच उपाय योजावे लागतात. गांधीजींच्या एकंदर नीतीचें हेंच रहस्य आहे.

## 'कोऱ्या चेक'ची जन्मकथा

मुसलमानांशी सख्य करण्याच्या गांधीजींच्या उत्कट इच्छेमधून त्यांच्या कोऱ्या चेकच्या तत्त्वज्ञानाचा जन्म झालेला आहे. राजकीय भूमिकेवरून अशाच प्रकारच्या वृत्तींतून काँग्रेसच्या स्वयंनिर्णयाच्या धोरणाचा जन्म झालेला आहे आणि कम्यु-निस्टांच्या पाकिस्तानपुरस्काराचा जन्महि याच वृत्तींतून झालेला आहे. साम्यवादी पक्षाच्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं, हिंदुस्थान हें निरनिराळ्या स्वतंत्र उपराष्ट्रांचें बनलेलें असें एक अधिराष्ट्र राहील. त्याच्या ठरावांत त्या उपराष्ट्रांची यादी खालील-प्रमाणें दिली आहे. पठाण, पश्चिम पंजाबी ( मुसलमान ), शीख, सिंधी, हिंदुस्थानी राजस्थानी, गुजराथी, बंगाली, आसामी, बिहारी, उडिया, आंध्र, तामिळ, कर्नाटकी, महाराष्ट्रीय, केरळ इत्यादि. यावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, कम्युनिस्टांना अभिप्रेत असलेलें पाकिस्तान धर्माश्रित नाहीं, तें भाषेच्या पायावर उभारलेलें दिसतें. भाषावार स्वायत्त प्रांत झाले म्हणजे पाकिस्तानची मागणी आपोआप पूर्ण होईल, असा त्यांचा आशय दिसतो.

## हीच भूमिका कम्युनिष्टांचीहि

यावरून त्यांच्या पाकिस्तानवादांत आणि काँग्रेसच्या स्वयंनिर्णयाच्या धोरणांत मूलभूत भेद नाही हें स्पष्ट दिसून येईल. दोन भावांना राहणी व विचारसरणी यांतील भेदामुळें जर एकत्र राहतां येत नसेल, तर त्यांनी एकमेकांच्या संमतीने वेगळे राहण्याचा निश्चय करावा. म्हणजे त्यांच्यांत परस्पर प्रेम उत्पन्न होण्याचा संभव शिल्लक राहील. म्हणून त्यांनी आपल्या ठरावांत म्हटलें आहे कीं,* अशा प्रकारचा विभक्त होण्याचा हक्क मान्य केल्याचा परिणाम प्रत्यक्ष विभक्त होण्यांत झालाच

---

* The recognition of the right of separation in this form need not necessarily lead to seperation. On the other hand, by dispelling mutual suspition it brings about unity of action to-day, and lays basis for a greater unity in the free India of tomorrow.

पाहिजे असें नाही. उलटपक्षीं परस्पर संबंध नाहीसे झाल्यामुळें त्या एकात्म घटकाने एकजुटीनें कार्य होऊं शकेल आणि उद्यांच्या स्वतंत्र हिंदुस्थानांतील विशाल ऐक्याचा पाया रचला जाईल. ”

ही आशा फोल ठरूं नये म्हणून निरनिराळ्या राष्ट्रघटांतील जनतेंत ऐक्याची भावना निर्माण करण्याची तरतूदहि त्यांच्या योजनेंत आहे. कामगार संघ, किसान सभा यासारख्या आर्थिक भूमिकेवर काम करणाऱ्या संस्था निरनिराळ्या राष्ट्रगटांना जोडणाऱ्या दुव्याप्रमाणेंच राहतील.

कम्युनिस्टांचें पाकिस्तान आणि जिना साहेबांचें पाकिस्तान यांच्यांत स्वरूपतः व तत्त्वतः भेद आहे हें यावरून सहज लक्षांत येईल. म्हणून त्यांचा पाकिस्तानपुरस्कार समजण्यासारखा आहे, असें वर म्हटलें आहे.

## आंतरप्रांतीय सहजीवनाची जरूरी

एकत्वाची भावना निर्माण करण्याच्या योजनेंत आर्थिक संस्थांच्या जोडीला सांस्कृतिक प्रयत्नांचीहि भर घालावी, असें मला वाटतें. अशा प्रयत्नांनी आंतर-प्रांतीयतेची भावना वृद्धिंगत होईल. मुसल्मानांत प्रांतीय भाषांविषयींचें प्रेम जर उत्पन्न करतां आलें, तर आपण पाकिस्तानी वृत्तीचा सांस्कृतिक पायाच खणून काढल्यासारखें होणार आहे. आजहि बहुसंख्य मुसलमानांची स्वभाषा ही प्रांतीय भाषाच आहे. पण तिच्याविषयीं त्यांना आपुलकी किंवा जिव्हाळा वाटत नाहीं. उर्दूचें एक अक्षर न येणारे मुसलमानहि उर्दूची मागणी करतात. ही परिस्थिति बदलण्यास कुठले उपाय कार्यक्षम होतील, याचें संशोधन व्हावयास पाहिजे. आंतर-प्रांतीय सहजीवनाचा पूर्वीचा प्रवाह पुनः वाहूं लागला पाहिजे. बापूजी अणे, डॉक्टर हेडगेवार, तात्याजी वझलवार, बाबाजी चावजी, रा. कृ. पाटील, कर्मवीर पाठक, यांच्यासारखे अनेक महाराष्ट्रीय महानुभाव यापुढेंहि महाराष्ट्राला लाभले पाहिजेत. तसेंच अनेक कुटुंबें निरनिराळ्या प्रांतांत स्थायिक होऊन आंतरप्रांतीय जीवनाचें साहित्य कायम राहिलें पाहिजे. राजकीय व आर्थिक भूमिकेवरून पाकि-स्तानी वृत्तींचा प्रश्न सोडविण्याचे अनेक प्रयत्न होतील व होत आहेत.

## नेताजींच्या मागणीचें रहस्य

पाकिस्तानी प्रवृत्तीचा उच्छेद करण्याचा या सर्व प्रयत्नांहून अधिक उज्ज्वल, यशस्वी व स्फूर्तिदायक असा प्रयत्न आझाद हिंद फौजेच्या रूपानें नुकताच झालेला

आहे. या फौजेच्या रोमहर्षक इतिहासांत एक मोठाच हृदयंगम प्रसंग आहे. तो म्हणजे रंगूनच्या नगरभवनांत नेताजी सुभाषबाबू यांनीं जेव्हां रक्ताच्या शाईनें केलेल्या सह्यांची मागणी केली, तेव्हां अनेक लोकांनीं आपापल्या करंगळ्या कापून रक्तानें सह्या केल्या. इतक्यांत नेताजी म्हणाले, 'थांबा, मला असें एकेकाचें रक्त नको आहे सगळ्यांचें रक्त एकत्र करून त्या एकवटलेल्या रक्तानें सह्या करा.'

सरकारच्या अत्याचारांना बळी पडलेल्या हिंदु मुसलमानांचें रक्त जालियनवाला बागेसारख्या प्रसंगीं एकवटतें. पण या स्वयंस्फूर्तीनें एकवटलेल्या जीवंत रक्ताची सर त्याला कधीं तरी येईल कां? त्याचप्रमाणें इंग्रज सरकारच्या सैन्यांत हिंदु-मुसलमान शिपाई खांद्याला खांदा लावून लढतात, हेंहि ऐक्य परप्रत्ययजन्य आहे तें स्वायत्त नसतें. त्यापेक्षा आझाद हिंद फौजेचें स्वयंस्फूर्त ऐक्य व छावणींतील सहजीवन किती तरी दिव्य होतें.

## आझाद फौजेंतील निर्भेळ ऐक्य

असें स्वयंस्फूर्त ऐक्य १९२० सालीं खिलाफतीच्या चळवळीच्या वेळीं दिसून आलें होतें. पण त्यांत मुसलमानांत राष्ट्रभावनेपेक्षां धर्मभावना प्रबल होती. म्हणून 'वंदे मातरम्'चा घोष झाल्याबरोबर 'अल्लाहो अकबर'चा घोष होत असे. सुभाषबाबूंच्या फौजेंतील ऐक्य निर्भेळ राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवरील होतें. म्हणून तेथें 'वंदेमातरम्'हि नाहीं, 'अल्लाहो अकबर'हि नाहीं. तेथें दोन्हींची जागा 'जयहिंद' या सामान्य घोषानें घेतली 'आझाद हिंद फौज' हा शब्दप्रयोग हिंदी आहे का हिंदुस्थानी, याचीहि पर्वा कुणी केली नाहीं. एकमेकांच्या संपर्काच्या इच्छेंतून सामान्य भाषा आपोआप निर्माण झाली!

## फक्त दिशा सुचविली

या प्रयोगांतलि वृत्ती राष्ट्रव्यापी व जीवनव्यापी होणें आवश्यक आहे. त्याकरितां सांस्कृतिक संसर्गाची गरज आहे. पाकिस्तानच्या प्रवृत्तीचा खरा व यशस्वी प्रतिकार मानव्याच्या व सांस्कृतिक समन्वयाच्या शास्त्रशुद्ध व विशाल भूमिकेवरूनच होऊं शकतो. त्या प्रयत्नाची दिशा सुचविण्यापुरताच या लेखाचा उपयोग आहे.

"तरुण भारत" विशेषांक १९४६

★ ★ ★

# " मी हिंदुस्थानी नाहीं "

★

"मी हिंदुस्थानी नाहीं", अशी विलक्षण घोषणा जेव्हां कायदे आझम जीना यांनी केली तेव्हां या देशांतील देशनिष्ठ लोकांच्या आश्चर्याला व संतापाला सीमा राहिली नाहीं. ते म्हणायला लागले, तुम्ही हिंदुस्थानी नाहीं तर हिंदुस्थानांत राहतां कशाला? या देशांत राहण्याचा मुळीं तुम्हांला हक्कच नाहीं.

देशनिष्ठ लोकांचा हा संताप अनाठायीं नसला तरी जीनासाहेबांच्या घोषणेचा खरा आणि सगळा अर्थ लोकांच्या ध्यानांत आला नसावा असें दिसतें. मी हिंदुस्थानी नाहीं, ही घोषणा आज फक्त कांहीं मुसलमानांच्या तोंडून ऐकूं येत असली तरी वस्तुतः त्या घोषणेंत सर्वच धर्मांच्या धार्मिक लोकांची वृत्ति व्यक्त झालेली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. धार्मिकतेचा रूढ अर्थ परलोकवाद असा आहे. इहलोकाच्या ठिकाणीं ज्याची ममता कमी, तो त्या मानानें अधिक धार्मिक. शरीर नश्वर आहे म्हणून या लोकाचें नांवच मुळीं मर्त्यलोक आहे. ज्याला अमरत्व हवें असेल, त्यानें या मर्त्यलोकाकडे तितकें कमी लक्ष द्यावें आणि आपली परलोक साधण्याकडेच सारी शक्ति लावावी, असा धार्मिक पुरुषांचा सार्वत्रिक संकेत आहे. धर्माचें आचरण करतां यावें म्हणून एखाद्या भूमिभागाची आवश्यकता असते, इतकेंच.

पृथ्वीच्या त्या भागांत राहून शरीर आहे तोंपर्यंत धर्माचें आचरण करावयाचें पण तें ऐहिक सुखाकरितांच करावयाचें नसून पारलौकिक सुखाकरितां करावयाचें असतें. अर्थात् धार्मिक मनुष्य या पृथ्वीवर राहात असला तरी तो वृत्तीनें व मनानें या पृथ्वीवरचा नसतो; परलोकवासीच असतो.

धार्मिक माणसाच्या दृष्टीनें या पृथ्वीवरील जीवन म्हणजे प्रवास ' चिडिया रैन बसेरा;'–चिमणींचें रात्रीपुरतें राहण्याचें ठिकाण. म्हणून धार्मिकानें इहलोकाबद्दल कमीत कमी आसक्ति बाळगून आपला परलोक मात्र साधला पाहिजे. विलायतेंतून नोकरीच्या निमित्तानें हिंदुस्थानांत आलेल्या इंग्रजाच्या दृष्टीनें हिंदुस्थान हें घर नव्हे. त्याचें घर, ' होम ' म्हणजे विलायत. गंगा–यमुनांच्या अंतर्वेदींतून मुंबईप्रांतांत देवडीवाल्याचें काम करायला आलेल्या भैयाचा मुंबई हा 'देस' नव्हे. त्या प्रांतांत तो ' परदेसी ' म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणें धार्मिक माणसाच्या दृष्टीनें हें जग म्हणजे परदेश आहे. एखादें माणूस दिवंगत झालें म्हणजे तें निजधामास गेलें, असें म्हणण्याची वहिवाट आहे. स्टिव्हनसनच्या शब्दांत *जगाच्या रानांत मृगयेला गेलेला शिकारी घरीं आला, समुद्रावर दर्यावर्दीला गेलेला खलाशी घरीं परत आला, अशी धार्मिक माणसाची या मर्त्यलोकांतील आयुष्याबद्दल सार्वत्रिक समजूत आहे. याचा अर्थ असा कीं धार्मिक माणसाला देश नाहीं,–कुठलाहि देश नाहीं. तो निरंतर प्रवासी आहे. जिथें तो राहील तो त्याचा देश. त्याची मातृभूमि किंवा पितृभूमि कुठेंच नाहीं. जेथें त्याच्या धर्माचा जन्म झाला असेल किंवा त्याचीं तीर्थक्षेत्रें असतील, ती त्याची पुण्यभू. देवळांत आणि राऊळांत जो फरक तोच फरक मातृभूमींत आहे. राऊळाचें दान करतां येतें. राऊळ विकतां येतें, राऊळ बदलतांहि येतें. देऊळ विकतां येत नाहीं. देवळाचें कोणी दान करीत नाहीं. धार्मिक माणसाला फक्त देऊळच असतें, राऊळ नसतें. तो हस्तिनापुरांत राहात असो, पाटलीपुत्रांत राहात असो किंवा देवगिरीला राहात असो, त्याच्या अंतःकरणांत काशीला जाऊन राहण्याची नित्य तळमळ असते. काकासाहेबांनीं● आपल्या हिमालयाच्या प्रवासांत म्हटल्याप्रमाणें प्रत्येक हिंदूला हिमालय हेंच आपलें खरें माहेरघर वाटतें. धार्मिक हिंदूंची वास्तविक घरें म्हणजे काशी व हिमालय. त्याचप्रमाणें धार्मिक मुसलमानाचें खरें घर म्हणजे मक्काशरीफ. त्या नंतर जेथें जेथें मुसलमानांची वस्ती असेल त्या त्या स्थानाबद्दल त्याला आपुलकी वाटेल. पण इतर कोणत्याहि देशाबद्दल त्याला निस्सीम आदर किंवा पूज्य बुद्धि वाटणें शक्य नाहीं. या दृष्टीनें मुसलमान हा मुसलमान आहे. तो तुरकी नाहीं, अरबी नाहीं. अफगाणी नाहीं. आणि तसाच हिंदुस्थानीहि नाहीं.

* 'Home is the sailor home from the sea; and the hunter home from the hill !—'

● काकासाहेब कालेलकर.

मुसलमानांच्या ठिकाणीं अतिदैशिकता (Extra teritorialism) असल्याचेंहि कारण हेंच आहे. या देशांत ते बाहेरून आले हें त्याचें खरें कारण नव्हे. बाहेरून आले याचा अर्थ काय? मूठभर मुसलमान या देशावर चाल करून आले आणि नंतर त्यांनीं याच देशांतल्या लोकांना मुसलमान केलें. पण ही गोष्ट इतर सर्वच देशांना लागू आहे. मूठभर खिस्ती लोक युरोपखंडांतील निरनिराळ्या देशांत गेले आणि त्यांनीं त्या देशांतील लोकांना खिस्ती बनविलें. मूळ खिस्ती माणूस कुठला होता याची आतां त्या देशांतील लोकांना शुद्धहि नाहीं. बौद्ध लोक चीन देशांत गेले आणि त्यांनीं तेथील लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. मुसलमानांत हा जो देशांतरवाद दिसून येतो, त्या देशांतरवादाचें खरें मर्म त्यांच्या अतिरेकी धार्मिक वृत्तींत सांठविलेलें आहे. जेवढा मुसलमान तेवढाच आमचा मग तो पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि कां राहात असेना असें त्या वृत्तीचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. मुसलमान–मुसलमानांच्या बंधुत्वाला भौगोलिक मर्यादा नाहीं. ज्या प्रदेशांत मुसलमानाला आपल्या धर्माचें आचरण करतां येत नसेल तेथें त्यानें राहूं नये, तेथून 'हिजरत' करावी. अशा प्रकारचा देशत्याग हें एक महान् पुण्यकर्म समजलें जातें. जेथें अन्याय असेल, अधर्म असेल तेथें धार्मिक माणसानें अन्नपाणी ग्रहण करूं नये असा संकेत आहे. म्हणूनच रामशास्त्र्यांसारखा न्यायप्रिय, धर्मज्ञ पुरुष राघोबाच्या पुण्यांत पाणीहि पिणार नाहीं, अशी प्रतिज्ञा करून निघून गेला. धार्मिक पुरुषाच्या दृष्टीनें तीर्थक्षेत्र हेंच त्यांचें पुण्यधाम असल्यामुळें तीर्थयात्रा करणें आणि क्षेत्राच्या ठिकाणीं तीन दिवस तरी राहणें तो आपल्या आयुष्यांतलें परम कर्तव्य समजतो.

ही दृष्टि फक्त मुसलमानांपुरतीच मर्यादित नाहीं. हिंदु धार्मिक पुरुषाचीहि दृष्टि अशीच आहे. कुठलाहि वैदिक धर्माभिमानी पुरुष मी हिंदी किंवा हिंदुस्थानी आहे, या गोष्टीवर जोर देत नसतो. तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र असतो. फार तर हिंदु असतो. पण हिंदुस्थानी नसतो. म्हणजे त्याचें हिंदुत्व मुख्य असतें, नागरिकत्व गौण असतें. हिंदुत्वांतहि प्रांतपरत्वें महाराष्ट्रीय हिंदु, गुजराती हिंदु असे भेद कल्पितां येतील. पण ते सगळे भेद गौण आहेत. महाराष्ट्रांत राहून त्याला जर आपल्या धर्माचें आचरण करतां आलें नाहीं तर तो खुशाल दुसरीकडे जाऊन वसती करील. सारांश, अतिप्रादेशिक भावनेचें किंवा देशांतरवादाचें मूळ परलोकवादांत अथवा लोकांतरवादांत आहे. देश हा धर्मासाठीं हवा आहे. आणि धर्म इहलोकांतील द्वाड विषयसुखासाठीं नसून परलोकांतील सुखासाठीं आहे. म्हणून

आधीं धर्म मग देश अशी धार्मिक माणसाची मनोरचना असते. इस्लाम धर्मात भावनांचे सारेच आवेग उत्कट व तीव्र स्वरूपांत व्यक्त झालेले आढळतात. म्हणून मुसलमानांच्या वृत्तींत हा लोकांतरवाद व देशांतरवादहि उत्कट स्वरूपांत प्रगट झालेला आढळून येतो.

विश्वकुटुंबभावना आणि पारलौकिकता किंवा प्रदेशांतील धार्मिकता याच्यांत बाह्यतः साम्य भासलें तरी वस्तुतः अत्यंत वैषम्य आहे हें सहज लक्षांत यावें. गांधींनींहि एकदां म्हटलें होतें ×माझा धर्म भौगोलिक मर्यादा जाणत नाहीं. पण हा धर्म म्हणजे प्रेमाचा धर्म. मैत्रीचा धर्म. सेवेचा धर्म. सेवेला देशकालाची मर्यादा नाहीं, तेथें आपपर भेद नाहीं, हें म्हणणें निराळें आणि जेथें मला माझ्या विशिष्ट संप्रदायाप्रमाणें वागतां येईल किंवा जेथें जेथें मला माझ्या विशिष्ट संप्रदायाचे लोक भेटतील, अथवा ज्या ठिकाणीं यदृच्छेनें माझ्या जातीचे अगर विशिष्ट संप्रदायाचे लोक एकत्र झाले असतील तो माझा मुलुख, ती माझी पुण्यभूमि, तें माझें पाकिस्तान हें म्हणणें निराळें. पहिली भावना व्यापक आहे. संग्राहक आहे. दुसऱ्यांचा आपल्यांत समावेश करून घेणारी आहे. दुसरी भावना व्यवच्छेदक आहे, तुटकपणाची आहे. इतरांना दूर सारणारी, वगळणारी आहे.

या भावनेचा समूळ उच्छेद करावयाचा झाल्यास धर्मच अजिबात नाहींसा करणें जरूरीचें आहे काय असा प्रश्न या ठिकाणीं उत्पन्न होतो. मानवांच्या कल्याणाकरितां धर्म टिकवावयाचा झाल्यास तो कोणत्या स्वरूपांत टिकवावा या प्रश्नाचा विचार पुष्कळांनीं पुष्कळ प्रकारांनीं केलेला आहे. तेव्हां तूर्त तो व्यापक प्रश्न बाजूला ठेवून इतकें मात्र निश्चित सांगतां येईल कीं, धर्मांतून हें परलोकवादाचें प्रस्त मात्र नाहींसें झालें पाहिजे. या लोकीं संयमानें व सदाचारानें राहून इथल्यापेक्षां अधिक शाश्वत आणि अधिक ऐश्वर्ययुक्त असें सुख दुसऱ्या कुठल्याहि लोकीं मिळवावयाचें आहे, या कल्पनेपेक्षा हा मर्त्यलोकच स्वर्गलोकाइतका ऐश्वर्यसंपन्न व वैभवशाली बनवावयाचा आहे आणि त्याकरितां सदाचारसंपन्न आणि संयमशील जीवन आवश्यक आहे, ही भावना लोकांच्या मनांत बिंबली पाहिजे. म्हणजे नागरिकांच्या ठिकाणीं पारलौकिकतेपेक्षां लौकिकता अधिक येईल. परलोकवाद म्हणजे आध्यात्मिकता नव्हे. आध्यात्मिकता श्रेष्ठ कीं आधिभौतिकता श्रेष्ठ हा अगदीं स्वतंत्र मुद्दा आहे. त्याचा विचार येथें अप्रस्तुत होईल. आध्यात्मिक मनुष्य आत्मज्ञानाकरितां किंवा आत्म-

× My religion knows no geographical boundaries.

संतोषाकरितां सगळ्या पृथ्वीचाहि त्याग करील. ही वैराग्यप्रधान आध्यात्मिकता निराळी आणि या लोकांतील सुखापेक्षां अधिक मोठें सुखोपभोग मिळविण्याच्या हपापामें पत्करलेली पारलौकिता निराळी. या परलोकांतील सुखकामनेचा निषेध श्रुतीनेच केलेला आहे! तद्यथेह कर्मचितो लोकक्षीयते, एवमेवामत्र पुण्यचितो लोकक्षीयते! (येथें ज्या-प्रमाणें कर्मानें मिळविलेला लोक, कर्मानें मिळविलेला भोग क्षय पावतात. त्याचप्रमाणें इतरत्रहि पुण्यानें मिळविलेले भोग क्षय पावतात.) आध्यात्मिकता सामाजिकतेला अनुकूल आहे. आणि पारलौकिकता सामाजिकतेला प्रतिकूल आहे. आध्यात्मिक माणसाची वृत्ति उदार व व्यापक बनत जाते. तिच्यांतून 'अयंनिजाहः परोवा'— ही भावना कमी कमी होत जाते आणि विश्वकुटुंबीयत्वाची भावना वाढूं लागते. याप्रमाणें आध्यात्मिकता आंतरराष्ट्रीय वृत्तीला बाधक नाहीं. उलट कचित् प्रसंगीं आध्यात्मि-कतेमुळें माणसाची अहंता व्यापक होते आणि म्हणून ती परिणामी सार्वभौम आंतर-राष्ट्रीयत्वाला पोषकच ठरते. परलोकवादाचें तसें नाहीं. त्यांत जें वैराग्य आहे तें वास्तविक वैराग्य नसून लोकांतरनिष्ठा आहे. किंचित खोलवर विचार केला असतां असें दिसून येईल कीं, लोकांतरनिष्ठेच्या पोटींच हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या देशांतरनिष्ठेचा जन्म झालेला आहे.

अशी कल्पना करा कीं, उद्यां या देशांतील सर्वच हिंदूंना मुसलमान व्हावें लागलें, किंवा ख्रिस्ती व्हावें लागलें, तर त्यांची या देशाविषयीची भावना आजच्या-सारखीच राहील कां? मी हिंदु असल्यामुळें हिंदुस्थान हा देश माझा आहे, अशी हिंदु धर्माभिमानी व्यक्तीची भावना आहे. अर्थात् जो हिंदु नसेल त्याचा हा देश नव्हे, असा अर्थहि त्या भावनेंत गर्भित आहे. म्हणजे हिंदु जोंपर्यंत हिंदु राहील तोंपर्यंतच त्याचा हा देश राहील. तो हिंदुत्वाला पारखा झाला कीं, देशालाहि मुकला अशी समजूत या अर्थाच्या मूळाशीं आहे. याचाच अर्थ असा कीं हिंदु माणसाची स्वदेशनिष्ठा त्याच्या हिंदुत्वावर अवलंबून आहे. पण वस्तुतः त्याने हिंदुत्वाचा त्याग केल्याबरोबर त्याच्या हिंदुस्थानीयत्वाचा अगर हिंदुत्वाचा त्याग घडत नाहीं. पण त्याच्या धर्मनिष्ठेला ही कल्पनाच सहन होत नाहीं. तो म्हणतो, जेथें मला माझ्या धर्माचें पालन करतां येत नसेल तो मुळीं माझा देशच नव्हे. तो हिंदु आहे म्हणूनच हिंदुस्थानी आहे. किंबहुना तो आधीं हिंदु आणि नंतर हिंदुस्थानी आहे. मुसलमानांची परिस्थिति व भावना याहून अगदीं निराळी आहे. म्हणून त्याच धार्मिकतेच्या भूमिकेवरून जिनासाहेब म्हणतात, "मी हिंदुस्थानी नाहीं."

धार्मिक मनुष्याची धर्मनिष्ठा म्हणते, मला हिंदु म्हणून या देशांत राहतां आलें तरच मी राहीन. मला हिंदु म्हणून या देशांत राहतां येतें म्हणूनच तो मला प्रिय

आहे. म्हणूनच मला तो पूज्य आहे. एरवीं मी तो देश सोडून देईन आणि जेथें मला माझ्या धर्माचें पालन करतां येईल तेथें राहीन. माझ्या हिंदुत्वाच्या रक्षणा-करितां मला भारतीयत्व सोडावें लागलें तरी तें मी सोडीन पण हिंदुत्व सोडणार नाहीं. माझें भारतीयत्व नष्ट झालें तरी हिंदुत्व नष्ट होतां कामा नये, याचाच अर्थ सरळ मराठींत मी आधीं हिंदु व नंतर हिंदी आहे. अध्यात्मवादी व्यक्ति म्हणते, देहाचा नाश झाला तरी चालेल पण मी माझा आत्मा गमाविणार नाहीं; धर्मनिष्ठ व्यक्ति म्हणते, देश गेला तरी चालेल पण धर्म जातां कामा नये.

हिंदु म्हणेल, हिंदीत्व गेलें तरी पुरवलें, पण हिंदुत्व मात्र कायम राहिलें पाहिजे. मुसलमान म्हणेल, मुसलमानत्व कायम राहिलें म्हणजे पुरें, हिंदीत्वाची मला चाड नाहीं. दोघांच्याहि म्हणण्याचा इत्यर्थ, मी हिंदु आहें, मी मुसलमान आहें; मी हिंदुस्थानी नाहीं.

देशापेक्षां धर्म मोठा या सूत्राचा अर्थ जो तो आपापल्या परीनें करूं लागतो. दरेक म्हणतो धर्म एकच आहे आणि तो म्हणजे माझा. देव एकच आहे आणि तोहि म्हणजे माझाच. देव दोन असूंच शकत नाहीत. त्यामुळें धर्महि दोन असूं शकत नाहींत. अशा रीतीनें एकेश्वरवादांतून एकधर्मवादाचा जन्म होतो. आणि असहिष्णुता व धार्मिक कलह यांचें बंड माजतें. त्यामुळें धार्मिक माणसें बहुधा संकुचित, अनुदार व असहिष्णु असल्याचें आढळून येतें.

परवांच आमच्या नागपूरला एक युवक परिषद झाली. एका ठरावावरील चर्चेत असा मुद्दा निघाला कीं स्वखुषीनें धर्मांतर विहित मानावें कीं निषिद्ध ? तो तरुण माणसांचा मेळावा होता. तरी बहुतेकांचें म्हणणें असें पडलें कीं स्वखुषीनें धर्मांतर हा दरेक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे. त्याच्यावर गदा कशी आणतां येईल ?

असाच एक मुद्दा घटनासमितींत पुढें आलेल्या जवाहरलालजींच्या ठरावा-वरील चर्चेच्या वेळीं निघाला होता. मूलभूत हक्कांच्या यादींत धर्माचरणाच्या स्वातंत्र्याबरोबर धर्मप्रचाराच्या स्वातंत्र्याचाहि समावेश करण्यांत यावा असा आग्रह धरण्यांत आला. दरेकाला मतस्वातंत्र्य असावें आणि स्वधर्माचरणाचेंहि स्वातंत्र्य असावें हें म्हणणें बरोबर आहे. पण धर्मप्रचाराचें स्वातंत्र्य असावें हें म्हणणें युक्त नाहीं. या मुद्याची थोडी फोड करणें जरूर आहे.

आपण आपल्या धर्माचा प्रचार कां करूं इच्छितों ? आपल्याला आपला धर्म इतर धर्मांपेक्षां सरस वाटतो म्हणून. आपली अशी इच्छा असते कीं इतरांनीं

आपापले सदोष व त्या मानानें कमी प्रतीचे धर्म सोडून आपल्या उत्कृष्ट धर्माचा स्वीकार करावा. आपण जगांतील इतर धर्मांचें अस्तित्व सहन करीत असलों तरी ते धर्म खरे नाहींत, चुकीचे आहेत अशी आपली भावना असते. म्हणूनच आपण आपल्या धर्माचा प्रचार करतों. थोडक्यांत आणि सडेतोड भाषेंत याचाच अर्थ असा कीं धर्म एकच आहे आणि तो म्हणजे माझा. म्हणजे काय, आम्हीं सर्व धर्म समान मानीत नाहीं.

दुसरें असें कीं, आज धर्मांतराचा अर्थ समाजांतर असा आहे. जो हिंदु आहे तो मुसलमान राहूं शकत नाहीं किंवा ख्रिस्ती राहूं शकत नाहीं. त्यामुळें अनुयायांची संख्या वाढविणें हा धर्मप्रचाराचा बाह्य हेतु होऊन बसला आहे. आणि जेथें ज्या धर्मांचे लोक जास्त असतील तो त्यांच्या हक्काचा देश अशी एक नवीनच प्रादेशिकता किंवा क्षेत्रवाद त्यांतून उत्पन्न झाला आहे.

वरील विवेचनावरून स्वखुषीचें धर्मपरिवर्तन हे शब्द तत्त्वत: किती भ्रामक आहेत आणि धर्मप्रचाराचें स्वातंत्र्य तत्त्वत: किती तर्कदुष्ट आणि व्यवहारत: किती भयावह आहे हें विवेकी लोकांच्या सहज ध्यानांत येईल. विचारस्वातंत्र्य व विचारप्रचारस्वातंत्र्य अवश्य हवें. धार्मिक विचारांच्या प्रचाराचें स्वातंत्र्यहि असायला हरकत नाहीं. पण धर्मप्रचाराचें स्वातंत्र्य म्हणजे वस्तुत: सगळ्यांना एकमेकांच्या धर्माला वाईट म्हणण्याचें स्वातंत्र्यच देण्यासारखें आहे. धार्मिक विचारांचा प्रचार करण्याची मुभा असावी पण विशिष्ट धर्मसंस्थेच्या किंवा धर्मसंप्रदायाच्या अनुयायांची संख्या वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्याची मोकळीक मात्र नसावी. एरवीं धर्मामुळें होणारे अनर्थ टळणार नाहींत.

खऱ्या धार्मिक पुरुषांनीं विधर्मीयांच्या राज्यांत राहूं नये असाहि धार्मिक पुरुषाचा एक दंडक आहे. धार्मिक मुसलमान म्हणतो, मुसलमानेतरांच्या राज्यांत राहणें हराम आहे. धार्मिक हिंदु म्हणतो, अविंधाच्या किंवा गोमांसभक्षकाच्या राज्यांत राहणें महत्‌पाप आहे. म्हणून एका देशांत दोन धर्मांचे लोक एकमेकांच्या सत्तेखालीं कसे राहूं शकतील ! अर्थात् राहूं शकणार नाहींत. म्हणून जितके धर्म तितकीं राज्यें, जितकीं राज्यें तितकीं स्थानें, असा धर्मप्राण जीनासाहेबांचा सोपा व सरळ युक्तिवाद आहे. आणि स्वत:चा धर्म हाच सद्धर्म असल्यामुळें सगळें जगच पाकिस्तान बनलें पाहिजे, असा त्यांच्या धर्मनिष्ठेचा त्यांना आदेश आहे. म्हणून ते म्हणतात, " मी हिंदुस्थानी नाहीं. मला देश नाहीं, मला फक्त धर्म आहे. त्या धर्माचे

लोक जेथें राहत असतील तो आमचा देश, इतर धर्माच्या लोकांनींहि या सद्धर्माचा स्वीकार करावा हा आमचा प्रयत्न. या दृष्टीनें सर्वच देश आमचे. ”

यावर धार्मिक माणूस चिडून असा प्रश्न करील कीं धार्मिकतेचे इतके भयंकर दुष्परिणाम दाखविण्यांत तुमचा हेतु काय आहे ? सर्वांनीं धर्माला रामराम ठोकून नास्तिक बनावें असें तुम्हांला सुचवायचें आहे काय ?

या प्रश्नाचें उत्तर असें कीं, हल्लीं लोक ज्याला धर्म म्हणतात त्याला कायमचा रामराम ठोकणें जरूरीचें आहे. कारण त्या धर्मामुळें एकेश्वरवादाच्या नांवाखालीं ममेश्वरवाद माजतो व सद्धर्मवादाच्या नांवाखालीं मद्धर्मवादाचें प्रस्थ माजतें. जो हल्लीच्या धर्मापैकीं एकहि धर्म मानीत नाहीं किंवा धार्मिक पुरुषांच्या दृष्टीनें निरीश्वरवादी आहे, असा माणूस नास्तिकच असतो असें नाहीं. निरीश्वरवाद्यांत व कुठलाहि धर्म न मानणाऱ्या लोकांतहि आस्तिकता भरपूर असू शकते, असा अनुभव आहे. अशा आस्तिकाला ‘ आमचा स्वदेश, भुवनत्रयीं वास ’ असा प्रत्यय कोणत्याहि संताइतकाच येणें शक्य आहे. कारण तो इतर लोकांच्या जीवनाशीं समरस झालेला असतो. स्वर्गांतली सुखें येथेंच सर्वांना सुलभ व्हावीं असें त्याचा संप्रदायरहित धर्म त्याला सांगतो.

धार्मिक लोकांखेरीज दुसराहि एक असा वर्ग आहे कीं जो म्हणतो, “ आम्हांला कुठलाहि मायदेश नाहीं, आम्हीं देशादेशामधल्या सीमा पुसून काढूं इच्छितों. हें सगळें जग हाच आमचा स्वदेश आहे. या जगांत जेथें साम्यवादाचा प्रयोग होत असेल तोच आमचा स्वदेश आहे, साम्यवादाची प्रयोगभूमी हीच आमची काशी आहे, ” तत्त्वत: आणि वस्तुत: या वर्गाचीहि गणना ‘ मी हिंदुस्थानी नाहीं ’ म्हणणारांतच करायला हरकत नाहीं. पण धार्मिक लोकांचे आणि यांचे शब्द एकच असले तरी त्यांच्या भूमिकेंत व वृत्तींत जमीनअस्मानाचें अंतर आहे. धार्मिक मनुष्य म्हणतो कीं, जो आमच्या धर्माचा असेल तो आमचा, मग तो कुठल्याहि देशांत राहत असो. हा दुसरा वर्ग म्हणतो, ज्याच्या पोटापाण्याचा प्रश्न आमच्यासारखाच बिकट आणि उग्र स्वरूपाचा होऊन बसला असेल, ज्याला विपन्नावस्थेंत मरेपर्यंत आयुष्याचे क्षण मोजीत बसावें लागत असेल, तो आमचा. असे काबाडकष्ट करून उपाशीं राहणारे लोक जगभर पसरलेले आहेत. जग हें अशाच दलित, वंचित आणि पीडित लोकांचें आहे, म्हणून आम्हीं देशबीश कांहीं जाणत नाहीं. राष्ट्रभेदाचीं कृत्रिम भावनात्मक बंधनें आणि राज्यभेदाचीं कृत्रिम शासनात्मक बंधनें आम्ही पटापट तोडून टाकूं.

पण या वर्गीला जडवादाची भावना झाली आहे. सुदैवानें अजून जडत्वाची भावना झालेली नाहीं. सामान्य व्यवहारांतील चतुर माणूस म्हणतो, 'आधी पोटोबा, मग विठोबा' आणि आपल्या म्हणण्याच्या दृष्टीकरतां समर्थ रामदासासारख्या वैराग्यशील साधुपुरुषाच्या उक्तींचा दाखला देतो, 'आधी प्रपंच करावा नेटका.' व्यवहारचतुर माणसाचें एक स्वतंत्र दर्शन असतें. त्याला अनुसरून तो धर्मग्रंथांचाहि अर्थ करीत असतो. व्यास म्हणाले,

'अरे बाबांनो धर्माचें सेवन करा. धर्मापासूनच अर्थ आणि काम प्राप्त होतात. 'धर्मात् अर्थश्च कामश्च'. व्यवहारचतुर पुरुष लागलीच म्हणतो, अगदीं बरोबर आहे. धर्म आम्हांला अर्थ आणि काम देतो म्हणूनच तो सेव्य आहे. किंबहुना जो अर्थ आणि काम देईल तोच धर्म, जो देणार नाहीं तो अधर्म. अध्यात्मवादी म्हणतो, अरे बाबा हा अर्थ उफराटा आहे. व्यवहारनिष्ठ म्हणतो, याहून निराळा अर्थ असूंच शकत नाहीं, असला तर तो आमच्या कामाचा नाहीं.

आधुनिक वस्तुवाद्यांचें अर्थशास्त्र व्यवहारवाद्याच्या एक पाऊल पुढें जातें. व्यवहारवादी म्हणतो, 'आधीं पोटोबा, मग विठोबा' आधुनिक वस्तुवादी म्हणतो, 'पोटोबाच विठोबा आहे,—पोटोबांतूनच विठोबाचा जन्म होतो. पोटपूजेच्या पद्धतीवर विठोबाच्या पूजेचा प्रकार अवलंबून आहे. आणि पोटोबाच्या आकारावर विठोबाचें स्वरूप अवलंबून आहे.' जसा पोटोबा तसा विठोबा. पोटोबा विठोबापेक्षां प्रबल आहे—'सर्वारंभा: तंदुला: प्रस्थमूला:'—सांसारिक वृत्ति' किंवा प्रापंचिकता आणि वस्तुनिष्ठा यांच्यांत महदंतर आहे. जो वस्तुनिष्ठ असतो तो ऐहिक प्रश्नांचा विचार करील. परंतु त्याची विचारसरणी नेहमीं अर्थप्रधान किंवा आर्थिक पायावरच उभारलेली राहील असें नाहीं. परंतु आज वस्तुनिष्ठेचा अर्थ अर्थनिष्ठा असा करण्यांत येतो. जो द्रव्यनिष्ठ किंवा उपकरणवादी असेल तो वस्तुनिष्ठ असा वस्तुनिष्ठेचा कित्येकांनी अर्थ केलेला आहे. त्यामुळें नवीन मनुष्य एका निराळ्या अर्थानें द्रव्याचा गुलाम झालेला आहे. 'अर्थस्य पुरुषो दास:' माणूस हा द्रव्याचा दास आहे. या वाक्याचा भांडवलशाही समाजांतील अर्थ वेगळा. तरी तें वाक्य एका निराळ्या अर्थानें आजच्या द्रव्यनिष्ठ तत्त्वज्ञानाला लागूं पडतें. भांडवलशाहींत त्या वाक्याचा सरळ अर्थ माणूस हा पैशाचा गुलाम आहे. तो विकला जाऊं शकतो आणि विकत घेतला जाऊं शकतो असा आहे. अर्थशास्त्रावर उभारलेल्या लोकशाहीच्या तत्त्वज्ञानांत त्याच वाक्याचा अर्थ निराळा आहे. भांडवल-

शाहींत मनुष्य द्रव्याचा गुलाम असतो, 'यस्यास्ति वित्तम्'—त्याचा गुलाम असतो, पण अर्थप्रधान लोकशाहींत तो वित्तवंताचा किंवा अर्थवंताचा गुलाम नसतो,तर अर्थाचा, द्रव्याचा, वित्ताचा दास होऊन बसतो. अर्थरचना सांस्कृतिक उन्नतीचा पाया आहे. धर्म अर्थानुवर्ती आहे. काम अर्थानुवर्ती आहे. अशा तऱ्हेचें नवीन तत्त्वज्ञान त्याच्या मनावर आपला पगडा बसवितें. या केवळ अर्थप्रधान समाज-विज्ञानाचें गुण-दोष विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे.येथें त्याचा उल्लेख करण्याचा हेतु एवढाच कीं ज्याप्रमाणें परलोकवादी धार्मिक लोक 'मी हिन्दुस्थानी नाही' या तत्त्वज्ञानाचे अर्थतः व परिणामतः पुरस्कर्ते असतात. त्याचप्रमाणें साम्यवादी भिन्न भूमिकेवरून त्याच तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करतात. द्रव्यवादी अर्थशास्त्र्यांचाहि एक वर्ग आहे. परंतु वर सुचविल्याप्रमाणें धार्मिक लोकांचे आंतरराष्ट्रीयत्व अभेद-प्रवर्तक व साम्यवादी असतें.

याप्रमाणें तीन भिन्न भूमिकांवरून 'मी हिंदुस्थानी नाहीं' म्हणणाऱ्या तीन प्रकारच्या व्यक्ति या देशांत विद्यमान आहेत.

(१) भूमिनिष्ठा किंवा दैशिकता यांच्यापेक्षां धर्मनिष्ठा किंवा धार्मिकता श्रेष्ठ मानणारे कायदेआजम महमदअली जीना साहेब आणि तत्सम अन्य धर्मवादी.

(२) साऱ्या भेदांचे मूळ आर्थिक विषमता आहे. म्हणून देशभेद व राष्ट्रभेद यांच्यापेक्षा आर्थिक भेदच अधिक मूलभूत व महत्त्वाचे मानणारे साम्यवादी आणि—

(३) धार्मिक, आर्थिक, किंवा प्रादेशिक हे सर्वच भेद कृत्रिम आहेत, मानवमात्र एक आहे असें प्रतिपादन करणारा साम्ययोगी गांधी.

परलोकवादी धार्मिकाला अशी विनंती आहे कीं, आपल्याला या पृथ्वीच्या बाहेर कोठे तरी अंतराळांत निराळा स्वर्ग शोधावयाचा नसून ही समस्त मेदिनीच वाराणसी बनवायची आहे. माणूस हा केवळ चैतन्यमय नसून शरीरी आहे. तो हवेंत तरंगत नाहीं. अर्थप्राण साम्यवादाला अशी विनंती आहे कीं, आपल्याला केवळ आर्थिक समानताच स्थापावयाची नसून तिच्यापुढे एक पाऊल टाकावयाचें आहे. माणूस हा फक्त पार्थिव नाही. नुसताच मार्तीचा नाही आर्थिक समानतेला जर सार्वत्रिक संपन्नता नसली तर समान विपत्तीमुळें पुन्हां विषमतेची बीजें रुजूं लागण्याचा संभव आहे. आणि केवळ संपन्नताहि शुद्ध स्वरूपाच्या कल्याणकारी आंतरराष्ट्रीयत्वाच्या विकासाला पुरेशी ठरेल असें नाहीं. त्यासाठीं मनुष्याच्या ठिकाणीं द्रव्यनिष्ठेपेक्षां मानवनिष्ठा जास्त प्रमाणांत बाणली पाहिजे. ही मानवनिष्ठा

म्हणजेच साम्ययोग. मी हिंदुस्थानी नाहीं या जीनासाहेबांच्या संप्रदायवादी घोषणेंत बंधु-द्रोह आणि भूमिद्रोह आहे. त्या घोषणेचा अर्थ मी हिंदुस्थानी नाहीं, मी अरबी नाहीं, मी फक्त मुसलमान आहे; इतकाच होतो. जेथें साम्यवादी असेल तीच आमची मायभूमी, या साम्यवाद्यांच्या घोषणेंत देशनिष्ठेचा निषेध असला तरी बंधुद्रोह नाहीं, आणि 'मी फक्त हिंदुस्थानीच नाहीं' या साम्ययोगाच्या घोषणेंत व्यापक देशधर्माबरोबर अनंत मानवनिष्ठाहि आहे. गीतेच्या शब्दांत, 'इहवर्ते जित: सर्गो एषां साम्ये स्थितं मन:' साम्यवादीहि निसर्गावर विजय मिळविण्याची भाषा बोलतो. आर्थिक विषमतेचा नायनाट करून सार्वत्रिक समान संपन्नतेच्या पायावर समाजाची रचना झाली कीं, मनुष्य-निसर्गावर विजय मिळविण्याच्या उद्योगालाच स्वत:ला वाहून घेऊन, याच्या एक पाऊल पुढें जाऊन साम्ययोगी होऊन म्हणतो, आर्थिक समानतेच्या जोडीला मानवमात्रांत परस्पर बंधुत्वाच्या भावनेचा विकास करून आपण सर्वच दृष्टीनें सृष्टीवर विजय मिळवूं या.

—" नवयुग " स्वातंत्र्य अंक १९४७

# मानवतेचा मानदंड : गांधी

★

## ही गांधीजींची निष्ठा कीं पिसाटाचें वेड ?

हिंदुस्थानांत हल्लीं जे अमानुष मानवहत्येचे प्रकार चालू आहेत, त्यामुळें प्रत्येक जिवंत मनाच्या माणसाचें पित्त खवळून गेलें आहे. शांत प्रकृतीच्या माणसाचें अंत:करणहि प्रक्षुब्ध व संतप्त झालेलें आहे. अशा अमानुषपणाचा प्रतिकार अहिंसक मार्गानें होणें अशक्य आहे, असें गांधींच्या अनेक प्रामाणिक अनुयायांनाहि वाटूं लागलें आहे. अहिंसा अव्यवहार्य आहे, कुचकामाची आहे, अतिमानवी आहे, असें त्यांनाहि वाटूं लागलें आहे. उलट, प्रतिकूल परिस्थितीच्या झंझावातांनीं गांधींची निष्ठा विझून न जातां उलट अधिक प्रज्वलित आणि उज्ज्वल झालेली आहे. इतक्या प्रतिकूल परिस्थितींतहि जी निष्ठा मंद होण्याऐवजीं तीव्रतर होते, ती खरोखरीच निष्ठा आहे कीं तें एका पिसाट माणसाचें वेड आहे, याची मीमांसा करण्याची वेळ आज आलेली आहे.

## गांधीहि माणूसच आहेत !

'गांधी तो गांधी आणि आह्मी ते आह्मी, आपण सामान्य माणसांनीं त्यांची बरोबरी करण्याच्या भलत्या भरीला पडूं नये,' असा त्यांतल्या त्यांत समंजस व विनयशील टीकाकारांचा पोक्त सल्ला आहे. यांत त्यांचा हेतु गांधींची मर्यादा राखून, व्यवहार साधून घेण्याचा असतो. त्यांचें म्हणणें कांहीं अंशीं यथार्थ आहे;—पण कांहीं अंशींच ! गांधी हा थोर माणूस आहे, हें खरें आहे; पण शेवटीं माणूसच आहे. तो थोर आहे म्हणून आपल्याहून निराळा आहे; म्हणजे त्या प्रमाणांत

असामान्य आहे. पण तो माणूसहि आहे म्हणून आपल्यासारखाच आहे; म्हणजे त्या प्रमाणांत सामान्य आहे. त्यांच्यांत व इतरांत जो सामान्य अंश आहे म्हणजे समान धर्म आहे, त्यावरच त्यांची जीवननिष्ठा आधारलेली आहे. हेंच गांधींचें वैशिष्ट्य आहे. त्यांच्यांतला व इतरांतला जो समान अंश, त्यालाच ते मनुष्यत्व किंवा माणुसकी म्हणतात.

## माणुसकीचे दोन घटक

या माणुसकीचे दोन मुख्य गुण आहेत. एक मानवता,–इंग्रजींत जिला आपण 'ह्युमॅनिटी'–माणुसकी म्हणतों, तो. आणि दुसरा पौरुष,–इंग्रजींत ज्याला 'मॅनलीनेस'– मर्दुमकी म्हणतों, तो. हे दोन गुण मिळून अहिंसा बनली आहे. या दोन्ही गुणांचा आपल्या मानाने गांधींच्या ठिकाणीं अधिक विकास झालेला आहे, म्हणून ते आपल्या पेक्षां थोर. पण आपणहि माणसें आहोंत. त्यामुळें हे दोन्ही गुण आपल्याहि ठिकाणीं उण्या अधिक प्रमाणांत उपजतच आहेत. म्हणून आपण गांधींच्या जातीचे आहोंत. या दोन गुणांवरील निष्ठा जशी गांधींच्या ठिकाणीं आहे, तशीच ती आपल्याहि ठिकाणीं आहे. एरवीं आपण गांधींना थोर मानलेंच नसतें. या दोन गुणांवरील निष्ठा म्हणजेच अहिंसानिष्ठा. आपण स्वभावतः अहिंसानिष्ठ नसतो, तर गांधी हे आपल्याला महात्मा किंवा महापुरुष कधींच वाटले नसते.

## अहिंसानिष्ठेला शास्त्रीयतेचें अधिष्ठान आहे काय ?

'इतक्या प्रतिकूल परिस्थितींतहि यत्किंचित् न डगमगणाऱ्या गांधींच्या या मानवनिष्ठेला ऊर्फ अहिंसानिष्ठेला शास्त्रीयतेचें व वास्तविकतेचें कांहीं अधिष्ठान आहे काय,' हा मुद्याचा प्रश्न आहे. याच दृष्टीनें सध्याच्या परिस्थितीचें किंचित् दिग्दर्शनात्मक विश्लेषण व परीक्षण करण्याचें योजिलें आहे.

## बंगालच्या घटनांनीहि हादरा बसला नाही

बंगाल्यांत इतका कहर झाला, राक्षसी अत्याचारांत माणुसकी बेपत्ता झाली, तिचा कुठे मागमूसहि लागेना. तेव्हां अदम्य मानवनिष्ठेच्या स्फूर्तिदायक आवेशाने

गांधी उद्गारले,– *"मला अशा तऱ्हेनें विचार करतां येणार नाहीं, एरवीं मी माझ्या निष्ठेला जागूं शकणार नाहीं. आणि ती निष्ठा तर आज पूर्वीपेक्षाहि अधिक जाज्वल्य झालेली आहे. आतांपर्यंत आलेल्या कटु अनुभवाचा तिच्यावर मुळींच परिणाम झालेला नाहीं. एका निमिषार्धांत समाजचे समाज एका विशिष्ट मताकडे वळल्याचे चमत्कार अनेकदां घडले आहेत. इतिहासांत अशा दाखल्यांची मालिकाच आपणांस दिसून येते."

## गुंडगिरीला धार्मिकतेचें रोंगण

या दृष्टीनें आजच्या परिस्थितीची थोडीशी मीमांसा करणें जरूरीचें आहे. आज गुंडगिरीचें जे थैमान चाललेलें आहे, त्यांतहि एक वैशिष्ट्य आहे. हल्लीं चालू असलेली गुंडगिरी म्हणजे नेहमीची मामुली गुंडगिरी नव्हे. तिच्यांत माणुसकीला अत्यंत अपायकारक असा एक भयंकर स्वरूपाचा विशेष आहे. हे जे गुंड आहेत, ते जातिनिष्ठ व धर्मनिष्ठ आहेत. ते माणसांची कत्तल करतात, लहान लहान अर्भकें व मुलें यांची हत्या करतात; पण फक्त परधर्मीयांच्या. ते संपत्ति लुटतात, घरें जाळतात, नासधूस करतात; पण फक्त परधर्मीयांची. ते स्त्रियांवर जुलूम करतात, त्यांच्याशीं बळजबरीनें लग्नें लावतात; पण फक्त परधर्मीयांच्या. आणि त्याच धर्म-विशिष्ट व जातिविशिष्ट भूमिकेचा परिणाम म्हणून ते परधर्मीयांना जुलुमानें बाटवितातहि. म्हणजे ही गुंडगिरी निर्भेळ गुंडगिरी नव्हे. तिला धार्मिकतेचें रोंगण दिलेलें आहे. म्हणून ती जास्त भयंकर स्वरूपाची आहे; आणि त्यामुळेंच तिचा प्रतिकार साध्या गुंडगिरीपेक्षा अंमळ निराळ्या प्रकारें करावा लागेल. या गुंडांना असें वाटतें कीं, ही नरहत्या, बालहत्या, भ्रूणहत्या करतांना, स्त्रियांची अब्रू घेतांना आणि त्यांना बळजबरीनें आपल्या अंतःपुरांत खेंचतांना, आपण आपल्या धर्माची व जातीची सेवा करीत आहोंत; आणि स्वर्गामध्यें हक्काचें व अधिक मानाचें स्थान मिळविण्याचे अधिकारी होत आहोंत.

---

*"It is not permitted me to think in these terms, or, else I would be denying my faith, which today burns brighter than ever in spite of all the bitter experience that I have had. History provides us with whole series of miracles of massess of people being converted to a particular viewpoint, in the twinkling of an eye....."

## हिंदूंची संकुचित व अहंकारी वृत्ति

या भयंकर परिस्थितीची बीजें हिंदूंच्या व मुसलमानांच्या धार्मिकतेच्या विशिष्ट स्वरूपांत दडलेलीं आहेत. हिंदु हा जितका सहिष्णु भासतो, तितकाच संकुचित व अहंकारी आहे. हें विधान हिंदु व्यक्तींच्या वृत्तीला अनुलक्षून केलेलें नाहीं. हिंदु समाजाची मूलभूत मनोवृत्ति या ठिकाणीं विवक्षित आहे. इतर धर्मांचा माणूस आपल्या पेक्षां कमी प्रतीचा आहे; तो इतका कीं, या अमंगळ देहांत आणि अपावन जन्मांत त्याला हिंदु होतांच येणार नाहीं, अशी सामान्य हिंदूंची सार्वत्रिक समजूत आहे. त्यामुळें इतर धर्माच्या माणसाला हिंदूंच्या समुदायांत एक प्रकारची सुरक्षितता वाटते. आपल्याला हिंदु होतांच येणार नाहीं अशी ज्याची समजूत झालेली असेल, त्याला आपल्याला कोणी बळजबरीनें बाटवील, अशी भीति वाटण्याचें कारणच नाहीं. हाच न्याय स्त्रियांच्या अपहरणालाहि लागू आहे. हिंदु कुठल्याहि परधर्मीय स्त्रीशीं लग्न करून तिच्याबरोबर राजरोसपणें संसार करूं शकत नाहीं. त्यामुळें सामान्य हिंदु पुरुषापासून परधर्मीय स्त्रीला भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

## प्रत्यहंकार निर्माण कसा होतो ?

हें हिंदुनिष्ठ मनोवृत्तीचें वस्तुनिष्ठ वर्णन आहे. पण ही त्या मनोवृत्तीची सुपरिणाममूलक बाजू झाली. या मनोवृत्तीची जी दुसरी बाजू आहे, ती मात्र तितकीच अनर्थमूलक आहे. अहंकारामुळें ज्याला आपण आपल्याहून हीन मानतों आणि म्हणून आपल्या गोटांत सामील करून घेण्यास तयार नसतों, त्याच्या मनांत प्रत्यहंकाराची, उरफाट्या स्वाभिमानाची व आक्रमणशीलतेची भावना आपण जागृत करतों. हिंदु समाजांतील उच्चवर्णीयांनीं निम्नवर्णियांत अशाच प्रकारची भावना उत्पन्न केली आहे. हल्लींची हिंदु समाजाची रचनाच त्या भावनेनें दूषित व कलुषित झालेली आहे. तीच भावना अहिंदूंच्या बाबतींत प्रवृत्त झाली म्हणजे अहिंदूंच्या ठिकाणीं प्रतिकारी भावना निर्माण होते.

## मुसलमानी धार्मिकतेचें स्वरूप

आतां मुसलमानाच्या धार्मिकतेचें थोडेसें विश्लेषण करूं या. तोहि धर्मप्राण आहे, किंबहुना धर्मबद्ध आहे. म्हणजे त्याचें सगळें जीवन धर्मभावनेनें जखडलेलें आहे. त्यामुळें जो त्याच्या धर्माचा नसेल, तो काफर आहे; म्हणजे अपवित्र आहे, हीन आहे. पण इतका हीन कुणीच नाहीं कीं त्याला मुसलमान होतां येऊं नये. मनुष्यमात्र मुसलमान होण्यास पात्र आहे, मुसलमान होण्याचा अधिकारी आहे;

नव्हे मुसलमान होणें हें त्याचें कर्तव्य आहे. तो जर नादानपणामुळें किंवा अज्ञानामुळें आपल्या या कर्तव्याला चुकत असेल, तर सामोपचारानें किंवा बळजबरीनें त्याला सन्मार्गावर आणणें हें दरेकाचें कर्तव्य आहे असें तो मानतो. अर्थातच शक्य तितक्या जास्त लोकांना मुसलमान बनविणें हें त्याचें पवित्र कर्तव्य होऊन बसतें. या मूलभूत भूमिकेची प्रतिक्रिया अशी होते कीं, दरेक मुसलमानेतराला आपण मुसलमान बनविलें जाऊं अशी भीति सदोदित वाटत राहते. ह्मणून त्याला मुसलमानांच्या समुदायांत सुरक्षितता वाटत नाहीं. मुसलमान होण्याची दरेकाची पात्रता हेंच भीतीचें कारण होऊन बसतें. तीच गोष्ट स्त्रियांच्या बाबतींत. सहाजिकच मुसलमानेतर स्त्रियांना मुसलमान पुरुषांपासून निरंतर भीति वाटते.

## हिंदु धार्मिकतेचें दौर्बल्य कशांत आहे?

असें हें हिंदु धार्मिकतेचें व मुसलमान धार्मिकतेचें थोडक्यांत मूळ स्वरूप आहे. दोघांचीहि धार्मिकता परिमित स्वरूपांची. एकाची जातिबद्ध तर दुसऱ्याची संप्रदायबद्ध. हिंदूंची धार्मिकता जातिबद्ध ह्मणजे जन्माश्रित आहे. जो ब्राह्मणाच्या कुळांत जन्माला आला, तो जन्मतः व आजन्म पवित्र, हें हिंदु धार्मिकतेचें स्वरूप. ज्यानें इस्लामचा स्वीकार केला, तो पाक झाला, हें मुसलमानांच्या धार्मिकतेचें स्वरूप. जन्म कुणाला घेतां येत नाहीं ह्मणून बाह्य उपायांनीं हिंदु समाजाचा आकार वाढाविणें शक्य राहिलेलें नाहीं. हिंदूंची प्रजा वाढाविणें हाच एकमात्र उपाय उरला. 'अनेन प्रसविष्यध्वं';– या यज्ञाच्या योगानें तुम्ही प्रसव पावा, 'प्रजया पितृभ्यः' प्रजा उत्पन्न करून आपआपल्या पितरांचें ऋण फेडा, ह्याच हिंदूंच्या सामाजिक धर्माज्ञा. जन्म स्वीकारतां येत नाहीं, पण संप्रदाय स्वीकारतां येतो. त्यामुळें संप्रदायाच्या आकाराची वाढ बाह्य उपायांनीं होऊं शकतें. हिंदु समाजांतील वैष्णव, शैव इत्यादि संप्रदायांचें उदाहरण घ्या. ब्राह्मण किंवा क्षत्रिय होतां येत नाहीं. पण शैव किंवा वैष्णव होतां येतें. त्यामुळें बळजबरीनें, दडपणानें किंवा प्रलोभनानें वैष्णव, शैव वगैरेंची संख्या वाढविणें शक्य आहे. जशी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांची वाढवितां येणें शक्य नाहीं. फार काय गांधी, अप्पा पटवर्धन किंवा गोपाळराव वाळुंजकर यांच्यासारख्या 'शिवोभूत्वा शिवं यजेत्' वृत्तीच्या नैष्ठिक सेवकाला हरिजन व्हावेसें वाटलें, तर तें देखील होतां येत नाहीं. एवंच काय, कीं जातिबद्ध धार्मिकता ही गुणनिष्ठहि राहूं शकत नाहीं. आत्मबल व संख्याबल या दोन्ही दृष्टींनीं ती दुबळी व अक्षम ठरते. उलटपक्षी संप्रदायाश्रित धार्मिकता आक्रमणशील होत जाते. आकार किंवा संख्या वाढाविण्यावर तिचा कटाक्ष असतो.

याप्रमाणें हिंदूंच्या संकुचित अनाक्रमणशीलतेचें व मुसलमानांच्या असहिष्णु आक्रमणशीलतेचें मूळ त्यांच्या धार्मिकतेच्या मूळ स्वरूपांत आहे.

## त्यांत लोकशाहीची भर पडली

लोकशाहीचा उदय झाल्यापासून ही वृत्ति जास्तच बळावली. कारण लोकशाही संख्यानिष्ठ आहे. संख्यावाद हा लोकसत्तेचा पाया आहे. एक माणूस, एक मत; हें निर्भेळ लोकशाहीचें मूलभूत तत्त्व आहे. अर्थात् ज्याच्याकडे जास्त माणसें, त्याच्याकडे जास्त मतें. त्यामुळें धार्मिकतेंत राजकीय सत्तावादाची भर पडली आणि दोन्हींचें रूपांतर नागड्या संख्यावादांत झालें. धर्माची चाड कुणालाच नाहीं. संख्या वाढविण्याची काळजी मात्र दरेक धर्मोन्मत्ताला आहे. एकीकडे संकुचित धर्माग्रह आहे. दुसरीकडे आक्रमणशील व अंध धर्मोन्माद आहे. राजकीय क्षेत्रांत संख्याबल दोघांनाहि हवें आहे. पण मुसलमानांच्या संख्यावादाला त्यांच्या धार्मिक भूमिकेचा आधार आहे, तर हिंदूंच्या संख्यावादाला त्यांची धार्मिक भूमिका व परिस्थिति प्रतिकूल आहे. या दोन भूमिकांच्या संघर्षातून हल्लीच्या विषम परिस्थितीचा जन्म झालेला आहे.

## दोन गुंडगिरींतील भेद

पुरावा म्हणून हिंदु गुंडगिरी व मुस्लिम गुंडगिरी यांच्यांतील भेदाचा उल्लेख करतां येईल. गुंडगिरीला देखील हिंदु, मुसलमान हीं विशेषणें लावण्याची पाळी यावी, हें मोठेंच दुर्दैव म्हटलें पाहिजे. पण वस्तुस्थितीकडे डोळेझांक करणें शक्य नाहीं. दोघांच्या गुंडगिरींत मूलभूत स्वरूपाचा फरक आहे, ही गोष्ट विसरतां येणार नाहीं. हिंदु गुंड हा मुसलमान गुंडाप्रमाणेंच जुन्या वळणाचा असतो. तो कांहीं सुधारक नसतो; किंवा आर्यसमाजी अथवा ब्राम्हसमाजीहि नसतो. शुद्धीची चळवळ त्याच्या गांवींहि नसते. त्यामुळें तो मुसलमानाला मारतो, लुबाडतो, छळतो, पण बाटवीत नाहीं. तो कदाचित् एखाद्या मुसलमान स्त्रीवर बलात्कारहि करील, तिचे हाल हाल करील, पण तिला घरांत घेण्यास धजणार नाहीं. कारण, त्याचे धार्मिक संस्कार व परिस्थिति तसें करण्यास अनुकूल नाहींत. उलटपक्षीं मुसलमान गुंड चालून येतांच, मी मुसलमान होतो असें तुम्हीं म्हटलें, तर तो तुम्हांला त्रास देणार नाहीं, तुमची मालमत्ता लुटणार नाहीं, तुमचें मोठ्या आनंदानें स्वागत करील. जी स्त्री मुसलमान होण्यास तयार होईल, ती ताबडतोब अब्रूदार झालीच!! हिंदु गुंड व मुसलमान गुंड यांच्या वर्तनांत हा फरक

निर्विवाद आहे. कोण सरस, कोण निरस, कोण उदात्त, कोण हिणकस हें कदाचित् भल्याभल्या तत्त्वज्ञांनाहि निश्चित करतां येणार नाहीं. आपल्याला या ठिकाणीं त्यांच्याशीं कर्तव्यहि नाहीं. तो आपला अधिकार नव्हे. आपल्याला फक्त वस्तुनिष्ठ तात्त्विक विवेचन करावयाचें आहे.

## हिंदु कां खुपतो ?

हिंदूंच्या आळींत, त्यांच्या सभा-संमेलनांत आणि जमावांत मुसलमानाला त्या मानानें भीति वाटत नाहीं, याचें बीज हें इतकें खोल आहे. मुसलमान ह्मणजे मोठा मर्द आहे आणि हिंदु तेवढा भ्याड, हें ह्मणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. कारण या देशांतले बहुतेक मुसलमान हिंदूंचेच मुसलमान झालेले आहेत. आज जो हिंदु होता, तो उद्यां मुसलमान झाल्याबरोबर एकदम शूर बनून जातो, असें थोडेंच आहे ? त्याचें शरीर, त्याचें रक्त, त्याचें हृदय, त्याचें मन, त्याची बुद्धि ह्यांपैकीं कशांतच बदल होत नाहीं. तरीपण त्याच्या वृत्तींत पालट होतांना दिसतो. याचें कारण वरील विवेचनांत सुचविलेलें आहे. हिंदु भित्रा नसतो. पण दुसऱ्याला हिंदु बनविणें सामान्यतः त्याच्या कुळीं नसतें. त्यामुळें धार्मिक दृष्टीनें तो अनाक्रमणशील असतो. याची प्रतिक्रिया अशी होते कीं, इतर धर्मियांना त्याची भीति किंवा संशय वाटत नाहीं. पण त्याबरोबरच हिंदु हा पावित्र्यवादी असतो, ह्मणजे सोवळा असतो. 'अस्पर्श-भावना' त्याच्या रोमारोमांत भिनलेली असते. ह्मणून तो इतरांना आपल्यापेक्षां अनधिकारी मा तो. याची प्रतिक्रिया अशी होते कीं, इतर धर्मियांना त्याच्या या बाण्याचा संताप ये तो; आणि त्याचा नक्षा उतरावासा वाटतो.

## अविश्वासाचें बीज यांत आहे

मुसलमानांच्या आळींत सभा-संमेलनांत अथवा समुदायांत हिंदु फारच क्वचित् निर्भयपणानें वावरतात. याचेंहि कारण तेंच. ते उपजतच भित्रे असतात असें मुळींच नाहीं. पण त्यांची वृत्ति मुसलमानांविषयीं साशंक असते. याचें कारण इतरांस मुसलमान बनविणें,-साधल्यास गोडीगुलाबीनें, जरूर तर मारून मुटकून, बळजबरीनें,- हा मुसलमानाचा धार्मिक बाणा असतो. धर्मांतून बळजबरीचें तत्त्व बाद केलें आणि अगदीं निर्भेळ धार्मिकतेची सोज्वळ भूमिका स्वीकारली, तरी इतरांस आपल्या धर्मांत सामील करून घेणें हें महान् पुण्यकार्य ठरतें. धर्मांतर करविण्याचें तत्त्वच मुळीं दोन भिन्न धर्मियांच्या सहजीवनावर कुठाराघात करणारें आहे. यांत हिंदूंच्या अविश्वासाचें बीज साठविलेलें आहे. पुढें आक्रमणशील, जयिष्णु वृत्तीचें पर्यवसान

आडदांडपणांत व गुंडगिरींत होऊं लागतें आणि सोवळेपणांतून उद्दाम तिरस्कार-वृत्तीचा व अविश्वासाचा जन्म होतो. अविश्वासाचा परिणाम पुढे भीतींत होतो. भीति एकाला भ्याड तर दुसऱ्याला क्रूर बनविते. हिंदु समाज व मुस्लिम समाज यांच्या हल्लीच्या वर्तनाकडे पाहिल्यास या परंपरेची सत्यता प्रत्ययाला येते. साधारणपणें सामान्य मुसलमान जालीम असल्याचा भास होतो आणि सामान्य हिंदु मिळमिळीत, भित्रा असल्याचा भास होतो.

## गांधीजींच्या विचारसरणीची मीमांसा

अशा परिस्थितींत 'तुमची अहिंसा आमच्या काय कामाची ?' असा प्रश्न विचारण्याची साहजिकच प्रत्येकाची प्रवृत्ति होते. यावर गांधीजींचें उत्तर शास्त्र-शुद्धहि आहे आणि व्यावहारिकहि आहे. ते म्हणतात, माझ्या अहिंसेचीं दोन लक्षणें आहेत. एक प्रेम व दुसरें पुरुषार्थ. जेथें पुरुषार्थ नसेल, तेथें प्रेम राहूंच शकत नाहीं. भित्र्या व कमकुवत मनांत तें मावत नाहीं. त्यांत प्रेम ओतलें कीं तें हृदय कच्च्या कांचेच्या बाटलीप्रमाणें तडून जातें, फुटून जातें. आपल्याला ज्याचें भय वाटत असेल, त्याच्याबद्दल प्रेम वाटणें शक्यच नाही. वाघावर प्रेम कोण कसें करूं शकणार ? वाघ पिंजऱ्यांत ठेवल्यास शेळीला त्याची भीति वाटणार नाही. पण त्याच्याबद्दल प्रेमहि वाटणार नाही. वाघ व शेळी यांच्या ऐवजीं दोन वाघ असले आणि ते परस्परभक्षक असले, तरी तीच स्थिति राहील. एका वाघाला दुसऱ्या वाघाचें भय वाटणार नाहीं हें खरें. पण त्यांना एकत्र राहतांहि येणार नाहीं. ते दोनच अटींवर एकत्र राहूं शकतील. एक तर, त्यांनीं आपसांत सशस्त्र तह करायला हवा किंवा एकमेकांशीं निःशस्त्र सलोखा करायला हवा. गांधी म्हणतात, सशस्त्र संधीची स्थिति स्पृहणीय नाही. सशस्त्र संधीनें हिंदु मुसलमानांचा प्रश्न सुटणार नाही. सशस्त्र संधीचा मार्ग म्हणजे पाकिस्तानचा मार्ग. दोन्ही वाघांनी आपापली मर्यादा ठरवून घ्यावयाची आणि ती कुठल्याहि स्थितींत ओलांडावयाची नाही, याचें नांव परस्पर-संमतीचें पाकिस्तान. दोन्ही वाघ एकमेकाला भितात म्हणून ते आपापल्या पिंजऱ्यांत राहतील. पण ते एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून विश्रब्धतेनें झोंपलेले कधींच आढळणार नाहींत. दोघांपैकीं एकाला निश्चित करावयाचें झाल्यास दुसऱ्याला हद्दपार तरी केलें पाहिजे किंवा ठार तरी केलें पाहिजे. गांधी म्हणतात, परिणामतः हे दोन्ही उपाय एकाच स्वरूपाचे आहेत. मुसलमानांनीं हिंदूंना किंवा हिंदूंनीं मुसलमानांना हद्दपार केले काय किंवा ठार केले काय–दोन्हींचा परिणाम अर्थात् पाकिस्तानच. मग गोडीगुलाबीनेंच पाकिस्तान देऊन मोकळे कां होऊं नये ?

## शौर्यानेच क्रौर्याचा प्रतिकार होईल

तर मग आम्ही करावें तरी काय ? या क्रौर्याचा प्रतिकार प्रेमानें कसा हो करावा ? आम्ही निर्बीज व्हावें असें तुमचें म्हणणें आहे काय ? असा प्रश्न सहाजिकच संतापून विचारावासा वाटतो. यावर गांधींचें उत्तर असें:– क्रौर्याचा खरा उतारा प्रेम हाच आहे. पण तो तुम्हाला आपल्या आवाक्याबाहेरचा वाटत असला तर सोडून द्या. भित्रेपणा हें पाप आहे. कारण भीतीला प्रीतीचें वावडें आहे. जेथें भीति असेल, तेथें द्वेष ठेवलेलाच. द्वेष असेल तेथें सूडबुद्धि व हिंसावृत्ति आलीच. आणखी क्रौर्य तें काय असतें ? प्रेमाचा मार्ग साधत नसेल तर तो सोडून द्या. **पण क्रौर्याचा प्रतिकार क्रौर्यानें होणार नाहीं, ही खूणगांठ बांधून ठेवा. क्रौर्याचा प्रतिकार शौर्यानेच होईल.** तें शौर्य अहिंसक असलें तर अहंविशेष; हिंसक असलें तरी चालेल, पण क्रौर्य मात्र नको. या उत्तरांत कोठेंहि विसंगति नाहीं, अव्यवहार्यता नाहीं, अशास्त्रीयता नाहीं. गांधी पूर्वी जें म्हणत होते, तेंच आज म्हणत आहेत.

## गुंडगिरी आणि धर्मरक्षण

हिंसक शौर्य ह्मणजे सभ्य हिंसा. हिंसेलाहि शिष्टपणाची, सभ्यपणाची मर्यादा असली, तरच तिची गणना शौर्यांत होते. असभ्य हिंसा ह्मणजेच क्रौर्य, कसाबकरणी, अमानुषता ! गांधी ह्मणतात, आपण कसाबाबरोबर कसाब झालों तर दोन कसाब होतील, मारेकऱ्यांचा संप्रदाय वाढेल. सैतानाबरोबर सैतान झालों, हैवानाबरोबर हैवान झालों, तर हैवानांची संख्या वाढेल. आपल्याला गुंडांचें पारिपत्य करावयाचें आहे. स्वत: गुंड बनावयाचें नाहीं. आजची परिस्थिति मोठी भीषण आणि लाजिरवाणी आहे. धर्माचें रक्षण करण्याचा मक्ता गुंडांकडे गेलेला आहे. सज्जनांनीं धर्माचें आचरण करावें; पण त्यांचें रक्षण करण्याची जबाबदारी मात्र गुंडांवर, अशी चमत्कारिक परिस्थिति आहे. त्यामुळेंच गुंडांची प्रतिष्ठा आहे. गुंड हा उत्पन्न कसा होतो ? तो काय अस्मानांतून पडतो ? तो काय हवेवर जगतो ? गुंड जन्माला कसा येतो ? तो पोसला कसा जातो ? हा मोठा महत्त्वाचा सामाजिक प्रश्न आहे. त्याचें विवेचन करूं लागल्यास तो एक स्वतंत्र लेखच लिहावा लागेल. येथें इतकेंच ह्मणावयाचें आहे कीं, धर्मरक्षणाच्या नांवावर गुंडगिरीचे प्रस्थ माजावें, ही स्थिति कोणत्याहि धर्माच्या उत्कर्षाला पोषक होणार नाहीं. हिंसा धर्मसंमत आहे किंवा नाहीं ? तलवारीनें धर्माचें रक्षण करणें किंवा त्याची प्रतिष्ठा वाढविणें शक्य किंवा योग्य आहे कां नाहीं ? हे सारे वाद बाजूला ठेवले तरी धर्माचें रक्षण गुंडगिरीनें होणें शक्य नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. फार फार तर क्षत्रियाची मर्यादित व सभ्यपणानें युक्त

हिंसा धर्मसंमत ठरूं शकेल. क्षत्रियाचें शौर्य धर्माचें रक्षण करील. पण क्षत्रियांच्या क्षात्रतेजानें रक्षित धर्म आणि गावगुंडांच्या भरमसाट अत्याचारांनीं रक्षित धर्म यांच्यांत जमीन–अस्मानचें अंतर आहे. एकाला जर धर्म म्हणावयाचें तर दुसऱ्याला पाप म्हणावें लागेल. एकाला जर पौष्टिक द्रव्य म्हणावयाचें तर दुसऱ्याला मादक पदार्थ म्हणावें लागेल. एकाला जर अमृत म्हणावयाचें तर दुसऱ्याला हलाहल म्हणावें लागेल.

## प्रतिगुंडगिरी कां नको ?

आपल्याला मानवी सभ्यतेचें व स्वधर्माचें रक्षण करावयाचें आहे; तें अहिंसक शौर्यानेंच होईल; फार तर, तें हिंसक प्रतिकारानें होईल; पण क्रौर्यानें कालत्रयीहि होणार नाहीं, असा गांधींच्या म्हणण्याचा आशय आहे. म्हणून ते म्हणतात गुंडगिरीशीं प्रतिगुंडगिरीनें लढूं नका. गुंडगिरीचा प्रतिकार पराक्रमानें करा.

## क्रौर्य निंद्य, पण पौरुष वंद्य

म्हणून ते बिहारच्या लोकांना उद्देशून म्हणतात,× (ता. १० नोव्हें. १९४६ च्या 'हरिजना' वरून ) पण या पत्रांत मी तुमच्याशीं अहिंसेविषयीं बोलूं इच्छित नाहीं. तथापि येवढें मात्र खास सांगूं इच्छितों कीं, तुम्हीं जें केल्याचें सांगण्यांत येत आहे, त्याला कोणी कधींहि शौर्याचें कृत्य म्हणणार नाहीं. हजारों लोकांनीं कांहीं शें माणसांना मारून टाकणें हें कांहीं शौर्य नव्हे. तें तर भ्याडपणापेक्षांहि वाईट आहे. तें राष्ट्रीयत्वाला किंवा कुठल्याहि धर्माला शोभण्यासारखें नाहीं. तुम्ही जर ठोशाला ठोसा दिला असता तर तुम्हांला नांवें ठेवण्याची कुणाचीहि छाती झाली नसती.

×" But I do not want in this letter to talk of Ahimsa to you. I do want however to tell you that what you have reported to have done, will never count as an act of bravery, For thousands to do death a few hundreds is no bravery. It is worse than cowardice. It is unworthy of nationalism or any religion. If you had given a blow for blow no one would have dared to point a finger against you. What you have done is to degrade yourselves and degrade India."

पण तुह्मीं जें केलें आहे, त्यानें तुमचा अधःपात तर झालाच; पण तुम्हीं हिंदुस्थान-लाहि खाली ओढलेंत. " आपली अहिंसेवरील निष्ठा तिळमात्रहि ढळूं न देतां गांधींनीं हिंदु समाजांतील पौरुषाला अशा रीतीनें प्रोत्साहन दिलें आहे. अत्याचाराचा, अन्यायाचा प्रतिकार करा, पण प्रत्यपकारी बनूं नका. ते ह्मणतात,+ ( १० नोव्हेंबर १९४६ च्या 'हरिजना' वरून ) "तुम्हांला थापड मारणाराला क्षमा करण्याइतकें औदार्य तुमच्या अंगीं नसेल तर तुम्ही उलट त्याच्या थोबाडींत मारा. मला हें कळण्यासारखें आहे. पण जर तो बदमाष पळून गेला आणि तुम्ही त्याच्या नातलगाला अगर धर्मबंधूला बदला घेण्याकरितां मारलें तर तें माणसाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारें होईल. एखाद्यानें माझी मुलगी पळविली तर मी काय त्याची किंवा त्याच्या मित्राची मुलगी पळवूं ? हें मी अत्यंत निंद्य मानतों. "

## माणुसकी व मर्दुमकी यांचा समन्वय

गुंडगिरीच्या प्रतिकाराचा असा असंदिग्ध मार्ग सांगून गांधींनीं आपल्या अहिंसेची प्रतिष्ठा व मूल्य वाढविलें आहे. माणुसकी व मर्दुमकी यांच्या समन्वयाचा प्रयोग करणें ही त्यांची जीवनसाधना आहे. त्या साधनेला अनुसरूनच आज त्यांचा प्रचार व आचरण होत आहे. माणसांतील माणुसकी जागी करण्याकरितां ते त्याच्या अंतःकरणांत दडलेल्या देवाचें आवाहन करीत आहेत व त्याच्या सैतानी वृत्तीचा प्रतिकार करण्याकरितां त्याच्या पुरुषार्थाला आव्हान देत आहेत. त्यामुळें ज्यांना त्यांच्या या दुहेरी साधनेचें रहस्य उमगलेलें नाहीं, त्यांना त्यांच्या वचनांत व वर्तनांत विसंगति दिसून येते, अव्यवहार्यता दिसून येते. ते गोंधळून व संतापून विचारतात, 'का हो! बंगालमध्यें अनन्वित अत्याचार झाले असतांना गांधी बंगालमधील

---

+" If you could not be generous enough to forgive a person who gave you a slap, you could give him one in return. I can understand that. But if the miscreant ran away and the injured party slapped his relation or co-religionist by way of retaliation, it is below human dignity. If some one abducted my daughter, am I to abduct the abductor's or the abductor's friend's daughter ? I hold it to be in-famous "

मुसलमानांविरुद्ध प्राणांतिक उपोषणाची भीति घालीत नाहीं, उलट बिहारमधील आपल्याच लोकांना दाबण्याकरितां प्रायोपवेषण करण्याचा धाक घालतो. ही वीर-वृत्ति आहे कीं आत्मघातकी नेभळटपणा ?

मुद्दा महत्त्वाचा व विचारणीय आहे. त्याची थोडी मीमांसा करूं या.

## गांधींच्या दुहेरी साधनेचें रहस्य

गांधी हे आधींपासूनच असे विचित्र आहेत. यांतच त्यांचें 'गांधीत्व' आहे. धर्मकारणांतच नव्हे तर राजकारणांतहि ते याच वृत्तीनें वागत आले आहेत. १९१९ सालीं अमृतसरच्या कॉंग्रेसमध्यें जालियनवाला बागेंतील अत्याचाराबद्दल सरकारच्या निषेधाचा ठराव आला. गांधी म्हणाले, 'आधीं मर्यादेच्या अतिक्रमाबद्दल लोकांना ठपका द्या आणि मग सरकारचा धिक्कार करा.' थोरामोठ्यांना देखील तें चमत्कारिक वाटलें, तऱ्हेवाईकपणाचें वाटलें परंतु यांतच गांधींच्या प्रतिकारतंत्राचें रहस्य आहे. त्यांना पुरुषार्थाशीं मानवतेचा मेळ घालावयाचा आहे. माणूस पुरुषार्थाला पारखा झाला तर षंढ होईल आणि माणुसकीला आंचवला तर स्वत्वालाच मुकेल, याची त्यांना जाणीव आहे. म्हणून त्यांच्या साधनेंत हे दोन परस्परविरुद्ध प्रवाह दिसून येतात. बंगाल-मध्यें मुसलमान गुंडांनीं अत्याचार सुरू केल्याबरोबर ते तेथें धांवून गेले. तेथील हिंदूंना धीर देऊन त्यांची पुरुषार्थ वृत्ति जागृत करावी आणि मुसलमान गुंडांच्या हृदयां-तील बंधुत्ववृत्ति जागृत करावी हा त्यांचा हेतु. पुन्हा तीच दुहेरी साधना. एकाची मर्दुमकी जागी करायची आणि दुसऱ्याची माणुसकी. याची मर्दुमकी जागृत झाल्यावाचून त्याच्या माणुसकीला जाग येणार नाहीं, या गोष्टीची प्रतीतीहि अल्प प्रमाणांत कां होईना, येऊं लागली. त्यांच्या प्रार्थनेंत अनेक मुसलमान भाग घेऊं लागले. नमाजाची वेळ झाली असतां तेथेंच हिंदूंच्या सान्निध्यांत ते नमाज पढूं लागले.

## बिहारबाबत निराळा न्याय कां ?

बिहारच्या बाबतींत गांधींची भूमिका अगदींच वेगळी पडते. तेथें जुलुम करणारा वर्ग हिंदूंचा. गांधी स्वतःला हिंदु मानतात. ह्मणून हा त्यांचा स्वधर्मीय झाला. त्यामुळें ते त्यांच्याशीं अधिकारानें हुज्जत घालूं शकतात; हिंदु या नात्यानें त्यांचें काय कर्तव्य आहे, तें आत्मविश्वासानें सांगूं शकतात. अमृतसरला त्यांची जी भूमिका होती, तीच येथेंहि आहे. ह्मणून बिहारच्या हिंदूंना त्यांनीं बजाविलें कीं, तुम्ही जर सैतानाचा प्रतिकार सैतान बनून कराल, तर मला प्रखर प्रायश्चित करावें लागेल. बिहार व बंगाल यांच्या बाबतींत गांधींच्या भूमिकांतील भेद लक्षांत घेतल्यास, त्यांच्या धोरणांत विसंगति दिसून येणार नाहीं.

## जिनांना गर्भित आव्हान

या त्यांच्या वर्तनानें एक फार मोठा व्यावहारिक लाभहि झालेला आहे. बिहारच्या बाबतींत मी जी वृत्ति पत्करली, ती बंगालच्या बाबतींत कुणी प्रमुख मुसलमान पुढारी पत्करील कां—असें त्यांच्या धोरणांत गर्भित आव्हान आहे. अर्थात् तसें आव्हान देण्याच्या हेतूनें त्यांनीं हें धोरण स्वीकारलेलें नाहीं, हें उघड आहे. पण ज्याला सज्जनतेची यत्किंचितहि चाड असेल, त्याच्याकरितां गांधींच्या वर्तनांत आव्हान अंतर्निहित आहे. कायदेआझम जिनासाहेबांचा उपोषणाच्या मार्गावर विश्वास नसेल; पण नौखालीचे अत्याचार चालू राहिल्यास मला स्वतःला तेथें येऊन सशस्त्र प्रतिकार करावा लागेल, जातीनें हिंदूंच्या मदतीला धावून यावें लागेल, असें त्यांना ह्मणतां आलें असतें. पाकिस्तानची चळवळ गांवगुंडांच्या हातांत गेल्यास मी प्रत्यक्ष प्रतिकाराची भाषा तूर्त बंद करीन, असें त्यांना बजावतां आलें असतें. बंगालच्या सरकारला दोष देऊन त्याचें मार्गदर्शन करायला त्यांना स्वतःला कलकत्त्याला जातां आलें असतें. हें सर्व त्यांनीं करावें असें स्वतःच्या वागणुकीनें व धोरणानें गांधीनीं सुचविलें आहे. पं. जवाहरलालांनीं बिहारच्या हिंदूंना बॉंबगोळ्यांचा धाक घातला. तसा कायदेआझमांना बंगालच्या मुसलमानांना घालतां आला असता. यापैकीं त्यांनीं कांहींच केलेलें नाहीं. त्यामुळें त्यांच्यांत व गांधींत केवढा भयंकर फरक आहे, हें जगाच्या निदर्शनाला आलें आहे; आणि अखिल हिंदुस्थानचा प्रतिनिधि होण्याचा गांधींचा दावा सिद्ध झाला आहे.

## ' त्यापेक्षां माझे डोळे मिटलेले बरे '

बंगालविषयीं बोलतांना ते ह्मणाले, ●( १० नोव्हें. १९४६ च्या ' हरिजना '

---

● " My technique of non-violence is on trial, It remains to be seen how it would answer in the face of the present crisis. If it has no validity, it is better that I myself should declare my insolvency. I am not going to leave Bengal uutil the last embers of trouble are swept out. I may stay on here for a whole year or more. If necessary I will die here, but I will not acquiece in failure. If the effect of my presence in flesh is to make people to look upto me in hope and expectation, which I can do nothing to indicate, it would be far better that my eyes were closed in death. "

वरून ) ही माझ्या अहिंसकतंत्राच्या कसोटीची वेळ आहे. या आणीबाणीच्या प्रसंगीं तें तंत्र कसें काय कसोटीला उतरतें, हें बघायचें आहे. तें जर टिकण्यासारखें नसेल, तर माझें दिवाळें वाजलें, हें मी स्वतःच जाहीर करणें श्रेयस्कर होईल. या आगेची शेवटली ठिणगी विझून जाईपर्यंत मी बंगालांतून जाणार नाहीं. येथें मी सबंध वर्षभर किंवा त्यापेक्षांहि अधिक काळ राहीन. तशीच पाळी आली तर येथेंच मरेन. पण हार मानणार नाहीं. माझ्या शरीरानें येथें येण्याचा परिणाम जर लोकांनीं मोठ्या आशेनें, अपेक्षेनें माझ्याकडे पाहण्यांत होत असेल आणि त्यांच्या आशा व अपेक्षा पूर्ण करण्याचें मला साधत नसेल, तर माझे डोळे कायमचे मिटले-लेच बरे! बंगालच्या पीडित जनतेंत जीव ओतून तिला पुरुषार्थाला प्रवृत्त करण्यासाठीं हा पवित्र निर्धार व संकल्प त्यांनीं जाहीर केला.

## याच्या मुळाशीं तादात्म्याची भावना

आतां बिहारच्या संबंधांत ते काय म्हणतात, तें पाहा.* ('हरिजन' ता. १० नोव्हेंबर १९४६ ) "मी स्वतःला तुमच्यापैकींच समजतों. तुमच्या प्रेमामुळें तुमच्या-विषयींची ती निष्ठा माझ्या ठिकाणीं उत्पन्न झालेली आहे. आणि बिहारच्या हिंदूंनीं काय करावें हें तुम्हांला जितकें कळतें असें तुमच्या वर्तनावरून दिसून आलेलें आहे, त्यापेक्षां मला अधिक कळतें, म्हणून थोड्या फार प्रमाणांत प्रायश्चित्त घेतल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. कलकत्त्याला आल्यानंतर लवकरच मुख्यतः प्रकृतीच्या कारणाकरितां मी शक्य तितक्या कमी आहारावर होतों. बिहारच्या शोकजनक घटनेची माहिती मिळाल्यापासून आतां तो अल्प आहार प्रायश्चित्त

---

*"I regard myself as a part of you. Your affection has compelled that loyalty in me, and since I claim to have better appreciation than you seem to have shown of what 'Bihari Hindus' should do, I can not rest till I have done some measure of penance. Predominantly on reasons of health I had put myself on the lowest diet possible soon after my reaching Calcutta. That diet now continues after the knowledge of the Bihar tragedy. The low diet will become a fast unto death, if the erring Biharis have not turned over a new leaf."

म्हणून चालू आहे. प्रमादशील बिहारी लोकांनीं जर आपल्या वागणुकींत फरक केला नाहीं, तर त्या अल्प आहाराची परिणति प्राणांतिक उपोषणांत होईल." बिहारच्या हिंदूंची मानवी वृत्ति जागृत करण्याच्या हेतूनें हा पुण्य संकल्प त्यांनीं जाहीर केला. बंगालच्या संकल्पांतहि मुसलमानांच्या मानवतेवरील श्रद्धा आहे. त्यांच्या विषयींची आत्मीयताहि आहे. पण बिहारच्या संकल्पांत तादात्म्याची भावना आहे. गांधी कुणालाच शत्रु मानीत नाहींत. त्यांच्या आस्तिकतेला सैतानाचें अस्तित्व खपत नाहीं. त्यांच्या मानवतेला शत्रुत्त्वाची भावना सहन होत नाहीं. पण शरीराच्या मर्यादेमुळें, संस्कारामुळें व सहवासामुळें कुणी त्यांचे अधिक निकटचे मित्र असतात, तर कुणी त्या मानानें अंमळ दूरचे. जे अधिक निकटचे असतात, त्यांच्याशीं त्यांचें तादात्म्य झालेलें आहे. ह्मणून त्यांची व स्वतःची भूमिका गांधी एकच मानतात. जे अंमळ लांबचे असतात, त्यांच्याशीं तादात्म्य व्हावें ह्मणून ते स्वतःबरोबर स्वकीयांनाहि आपल्या विशिष्ट तंत्राचें अनुसरण करायला सांगतात. ह्मणून बिहारच्या हिंदूंची आगळीक त्यांना मुळींच सहन होत नाहीं.

## गुन्ह्याचा तिरस्कार, गुन्हेगाराचा नव्हे

परंतु बंगालच्या हिंदूंना ते तेथील गुंडांचा प्रतिकार मित्रभावाने करायला सांगतात. ते म्हणतात, * (ता. १० नोव्हेंबर १९४६ च्या 'हरिजना' वरून) "अगदी लहानपणापासून अपराध्याचा तिरस्कार कधींहि न करतां अपराधाचा तिरस्कार करण्याचें वळण माझ्या मनाला लागलें आहे. म्हणून मुसलमानांनीं गुन्हा केला असला, तरी ते माझे मित्र आहेत. परंतु त्यांनीं अपराध केला आहे हें त्यांना सांगणें माझें कर्तव्य आहे."

## लादलेलें ऐक्य काय कामाचें ?

हिंसेनें शांति प्रस्थापित होऊं शकेल. पण सलोख्याचें वातावरण निर्माण होऊं शकणार नाहीं, हा शास्त्रीय सिद्धांत गांधींनीं सुचविलेला

* From my earliest childhood I have learnt to dislike the wrong; never the wrong-doer. Therefore even if the Muslims have done any wrong, they still remain my friends. But it is my duty to tell them that they have done wrong."

आहे. ह्मणून ते म्हणतात कीं, खरें ऐक्य कधींहि बळजबरीनें लादलें जाऊं शकत नाहीं.<sup>©</sup> 'तें ऐक्य खरें असलें पाहिजे. सैन्यानें किंवा पोलिसनें लादलेलें नव्हे.' ह्मणण्याचा आशय असा कीं, सैन्यानें अगर पोलिसनें लादलेलें ऐक्य वास्तविक ऐक्यच नव्हे. ती बळजबरीची व निर्जीव शांतता आहे.

## सुज्ञहि गांधळले

कॉंग्रेसनें सत्तास्वीकार केल्यापासून अहिंसात्मक प्रतिकाराचें युग आतां संपलें, अशी भावना स्वाभाविकपणें बळावूं लागली आहे. कॉंग्रेस ही जोंपर्यंत फक्त प्रजापक्षाची संस्था होती, तोंपर्यंत प्रतिकार ह्राच तिचा बाणा होता. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत तो प्रतिकार अहिंसात्मकच असणें अपरिहार्य होतें. त्या प्रतिकारतंत्राचा स्वीकार कॉंग्रेसनें त्या मर्यादेंतच केला होता. आतां कॉंग्रेस, अल्प प्रमाणांत कां होईना, शासनहि करूं लागली आहे. त्यामुळें तिला दंडाचा व शस्त्राचा प्रयोग करावा लागतो. ह्मणून आतां—' गांधींच्या अहिंसेला कोण विचारतो ? '—असें प्राकृत जनांनाच नव्हे, तर सुज्ञ लोकांनाहि वाटूं लागलें आहे. त्याचप्रमाणें राजकीय प्रतिकाराच्या बाबतींत धोरण म्हणून जी अहिंसा प्रभावशाली व कार्यक्षम ठरली, ती गुंडांच्या प्रतिकाराच्या बाबतींत कितपत यशस्वी ठरेल, याचीहि शंका बहुतेक सर्व लोकांना येऊं लागली आहे. त्यामुळें अहिंसेच्या उपयुक्ततेचा प्रश्न पुन्हा नव्यानें उपस्थित झाला आहे. या प्रश्नाचें उत्तर गांधी काय देतात, तेंच आतां पाहूं.

## पाकिस्तानविषयीं गांधींची भूमिका

गांधी म्हणतात, या देशांत जोंपर्यंत इंग्रजांची म्हणजे इंग्रज लष्कराची गरज राहील, तोंपर्यंत पूर्ण स्वराज्य स्थापन होणार नाहीं. जोंपर्यंत हिंदु-मुसलमानांना एकमेकांची भीति वाटत राहील तोंपर्यंत इंग्रजांची गरज राहील. इंग्रजांची गरज नाहींशी करावयाची असेल, तर हिंदूंना मुसलमानांची व मुसलमानांना हिंदूंची भीति वाटतां कामा नये. आपल्याला हा टप्पा अजून गांठावयाचा आहे. हा प्रश्न सोडविण्याचे फक्त तीनच प्रकार शक्य आहेत. एक—हिंदु—मुस्लिम ऐक्य. दोन—हिंदु मुसलमानांनी विभक्त होणें. तीन—दोघांपैकीं एकाचा या देशांतून अंत होणें. ह्मणजे सगळ्या मुसलमानांनीं हिंदु होणें किंवा सगळ्या हिंदूंनीं मुसलमानांचा वध

---

© 'The unity should be genuine, not imposed by the military or the police'

करून त्यांचा समूळ उच्छेद करणें. किंवा मुसलमानांनी हिंदूंचा नीमोड करणें. या पैकीं फक्त दोनच प्रकार शक्य कोटींतील आहेत. हल्लीच्या स्थितीपेक्षां विभक्त जीवन म्हणजे पाकिस्तान शतपटीनें पत्करेल. ज्यांना हिंदु–मुसलमानांचें ऐक्य अशक्य वाटत असेल, त्यांनीं तावडतोब पाकिस्तान कबूल करून मोकळें व्हावें हा उत्तमपक्ष आहे. कारण एरवीं त्यांना तिसऱ्या उपायाचें अवलंबन करावें लागेल. मुसलमानांनीं आपल्या भागांतील हिंदूंचा छळ कायम ठेवल्यास, तेथील हिंदु त्या भागांतून पळ काढतील. त्याचप्रमाणें हिंदूंनीं आपल्या भागांतील मुसलमानांची तशीच गति केल्यास, त्यांनाहि पळ काढावा लागेल. अशा रीतीनें आपोआप पाकिस्तान अस्तित्वांत येईल. इतकी मारामारी व नरमेध करून शेवटीं पाकिस्तानच मिळायचें, तर तें आजच मोकळ्या मनानें कबूल करून टाकणें श्रेयस्कर नाहीं कां? निदान तेढ व कटुता तरी वाढणार नाहीं. शेजारी म्हणून सलोख्याची भावना निर्माण होण्याची शक्यता कायम राहील.

## हिंदु–मुस्लिम ऐक्यावर अचल श्रद्धा

ज्यांना पाकिस्तान नको असेल आणि मुसलमानांच्या माणुसकीवर विश्वासहि ठेवावयाचा नसेल, त्यांच्यापाशीं कोणचा उपाय आहे हें समजणें कठीण आहे. सगळ्या मुसलमानांना दडपून टाकणें अशक्य आहे. हिंदु प्रांतांतील मुसलमान व मुसलमानप्रांतांतील, हिंदु यांनीं एकमेकांना ओलीस ठेवले असें मानलें, तर कुणालाहि स्वस्थता व शांतता लाभणार नाहीं. तेव्हां एकच मार्ग शिल्लक राहतो, आणि तो म्हणजे हिंदु–मुसलमानांनीं गुण्यागोविंदानें एकत्र नांदणें. गांधींची अमोघ निष्ठा म्हणते,* (ता. १० नोव्हेंबर १९४६ च्या 'हरिजन' वरून) "मी तुम्हाला सांगतों कीं, हिंदु–मुसलमान हे एकमेकांचे शत्रु कधीहि होऊं शकत नाहींत. कारण, ते दोघेहि हिंदुस्थानांत जन्मले, हिंदुस्थानांतच वाढले, आणि त्यांना येथेंच जगावें व मरावें लागणार आहे." हें हिंदु–मुसलमानांचें ऐक्य प्रस्थापित करण्यासाठीं मुसलमान व हिंदु यांनीं उभयपक्षीं काय काय केलें पाहिजे, याचा आतां विचार करूं.

* "I would tell you that Hindus and Muslims can never be enemies, one of the other, They have been born and brought up in India and they have to live and die in India."

## धर्मपरिवर्तन हा गुन्हा ठरतो

(१) मुसलमानेतरांना मुसलमान बनविणें हें धर्मकृत्य आहे या भावनेला मुसलमानांनी कायमची तिलांजलि दिली पाहिजे. ज्यांना मानवी स्वास्थ्याची व कल्याणाची यत्किंचितहि चाड असेल अशा मुसलमानांनी मोठ्या साक्षेपाने व दृढ-निश्चयानें या भावनेचा निषेध करून तिच्याविरुद्ध सतत प्रचार केला पाहिजे. जगांतील सगळे धर्म समान म्हणजे बरोबरीचे आहेत हा सिद्धांत आपल्याला मान्य आहे का नाहीं असा प्रश्न दरेक धर्माभिमान्यानें स्वतःला केला पाहिजे आणि त्याचें प्रामाणिक उत्तर स्वतःच्या मनाला दिलें पाहिजे. हा प्रश्न विचारण्यांत मोठा खोल व दूरगामी हेतु आहे. या प्रश्नाचें उत्तर जर अस्तिपक्षीं दिलें, तर धर्म-वादाचा पायाच नाहींसा होतो. कारण जगांतील सारेच धर्म सारख्याच प्रमाणांत खरे किंवा खोटे आहेत असें एकदा मानलें, म्हणजे धर्मपरिवर्तन हा धार्मिक व सामाजिक गुन्हा ठरतो.

## नरहत्येपेक्षांहि महान् पातक

(२) एक धर्म सोडून खरा दुसरा धर्म स्वीकारणें म्हणजे एक धर्म हीन व दुसरा थोर मानणें होय. म्हणजे सर्व धर्म समान मानण्याचें तत्त्व गेलेंच. जोंपर्यंत सर्व धर्म सारखेच मानण्यांत येणार नाहींत, तोंपर्यंत भिन्न धर्मीयांचें सहजीवन अशक्य आहे. मुसलमानांनीं सर्व धर्म समान मानलेले नाहींत. एवढेंच नव्हे, तर ज्याचा धर्म त्याला श्रेष्ठ हें अविरोधाचें तत्त्वहि त्यानीं मानलेलें नाहीं. म्हणून त्यांच्या दृष्टीनें आज भिन्न भिन्न धर्मीयांचें सहजीवन तत्त्वत: अनिष्ट व व्यवहारत: अशक्य आहे. त्यामुळेंच पाकिस्तान हें त्यांचें ध्येय आहे. परंतु सर्व धर्मांना समान न लेख-ण्याची वृत्ति असामाजिक आणि अहंवाद वाढविणारी आहे. जोंपर्यंत मुसलमान ही वृत्ति सोडणार नाहींत, तोंपर्यंत त्यांना ईश्वरनिष्ठेच्या नांवावर मानवद्रोहाचें पातक करावें लागेल आणि हें पातक नरहत्येपेक्षांहि महान् आहे.

## सक्तीचा अट्टाहास काय म्हणून ?

सर्व धर्म समान मानल्यानंतरहि निरनिराळ्या लोकांना आपआपल्या वृत्तिप्रमाणें एखाद्या विशिष्ट धर्मसंस्थापकाची किंवा संताची शिकवण विशेष आवडणें शक्य आहे. सर्व धर्मांची मूलभूत शिकवण अर्थात् एकच असणार. एरवी त्यांचें महत्त्व सारखें मानतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें सर्व संतांची शिकवणहि मूलत: एकच असणार. तरीपण त्यांच्या उपदेशाच्या शैलींत व चरित्रांत फरक राहणारच. त्यामुळें

दरेकाला त्याच्या अभिरुचिप्रमाणें एखाद्या संताचें चरित्र व उपदेश इतरापेक्षां अधिक आवडण्याचा संभव आहे. एखाद्याला हजरत मुहंमद यांचें चरित्र व शिकवण किंवा कुराणशरीफ अधिक आवडेल आणि तो त्याचें वाचन व चिंतन करून त्यांतील उपदेशाप्रमाणें वागण्याचा प्रयत्नहि करील. पण त्यासाठीं त्यानें आपलें नांव, आपला पोषाख, आपले स्वच्छतेचे नियम आणि आपली भाषा या सर्व गोष्टींत बदल केला पाहिजे हा आग्रह सुजाण मुसलमानांनीं सोडून दिला पाहिजे. कारण वर म्हटल्याप्रमाणें, धर्मपरिवर्तन हा गुन्हा आहे. आणि धर्मपरिवर्तनाबरोबर समाजपरिवर्तनहि होणें तर त्याहिपेक्षां अधिक अनर्थकारक आहे. ह्या बाबतींत हिंदी खिस्त्यांचें उदाहरण उल्लेखनीय आहे. अनेक हिंदी खिस्त्यांची राहणी अजूनहि हिंदु लोकांसारखीच आहे. कांहीं हिंदु कुटुंबें अगदी थेट अहिंदु पद्धतीनें राहतात, तर कांहीं खिस्ती कुटंबें अगदी थेट हिंदु पद्धतीनें राहतात. त्यांचीं नांवेंहि हिंदु पद्धतीचीं आहेत. त्यांत पुन्हा गंमत अशी कीं, एकाच कुटुंबांतील कांहीं व्यक्तींचीं नांवें हिंदु पद्धतीची असतात, तर कांहींची खिस्ती पद्धतीची असतात.

### राहणी–भाषा बदलण्याचें कारण नाहीं

परिचित उदाहरण घ्यायचें झाल्यास आपल्या येथील सुप्रसिद्ध राष्ट्रीय पुढारी श्री. साळवे यांचें घेतां येईल. साळवे साहेबांचें नांव ' प्रसादराव ' आहे. आणि त्यांच्या पत्नीचें नांव ' कॉर्नेलियाबाई ' आहे. त्यांची भाषा मराठी आहे. इतरांच्या आणि त्यांच्या राहणींत लक्षांत येण्यासारखा फरक नाहीं हीच गोष्ट हिंदी मुसलमानांच्या बाबतींतहि होऊं शकली पाहिजे. जो अल्लाचा भक्त झाला आणि महंमदसाहेबांचा अनुयायी झाला, त्याचेंहि जुनें नांव कायम राहूं शकावें. जुनी राहणी बदलण्याचें कारण राहूं नये. जी भाषा त्याच्या घराण्यांत चालत आली असेल, त्याच भाषेंत त्याला खुदाची इबादत करतां आली पाहिजे.

### मुसलमानांतील विचारस्वातंत्र्याचा अभाव

(३) याचाच अर्थ असा कीं, मुसलमानांनी विचारस्वातंत्र्याचें तत्त्व पूर्णपणें मान्य केलेलें नसतेंच. कट्टा अनुयायी बहुधा सनातनी असतो; अर्थात् पुराणप्रिय व गतानुगतिक असतो. किरस्ताव व हिंदु हे देखील बहुतांशी पुराणप्रिय व गतानुगतिक असतो. किरस्ताव व हिंदु हे देखील बहुतांशी पुराणप्रिय व गतानुगतिक आहेत. पण एकंदरीत विचारस्वातंत्र्याचें प्रमाण त्यांच्यांत मुसलमानापेक्षां पुष्कळच

जास्त आढळून येतें. वेद हे अपौरुषेय नाहींत असें प्रतिपादन करणारे विद्वान् आपल्या विद्वत्तेमुळें व चारित्र्यामुळें लोकादरास पात्र आहेत. हिंदु समाजांत हिंदु धर्माचे अभिमानी जसे कांहीं अपौरुषेयत्ववादीहि आहेत, तसे कांहीं पौरुषेयत्ववादीहि आहेत. आणि एकंदरींत हिंदु धर्मसंस्थांमध्यें अपौरुषेयत्व मानणारे विद्वान् फारच कमी आहेत. मुसलमान समाजांत अगदी भिन्न परिस्थिति आहे. कुराण अपौरुषेय नाहीं, महंमदसाहेबांचीं वचनें आजच्या परिस्थितींत पाळलींच पाहिजेत असें नाहीं, असें म्हणण्याची हिंमत भल्या भल्या सुशिक्षित मुसलमानांचीहि नाहीं. अनेक मुसलमानांना तसें वाटत असेल, पण उघड प्रतिपादन करण्याची हिंमत कुणीहि दाखविलेली नाहीं.

## सावरकर आणि जिना यांच्यांतील भेद

फार कशाला हिंदु सभेचे नेते व मुस्लिम लीगचे नेते यांच्या वचनांतील व वर्तनांतील फरक लक्षांत घेतला असतां ही गोष्ट सहज पटण्यासारखी आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हे वेदांचें अपौरुषेयत्व मानीत एवढेंच नव्हे तर वेद किंवा गीता यांचें प्रामाण्यहि त्यांना मान्य नाहीं. राम किंवा कृष्ण यांना ते देवाचे अवतार मानत नाहींत; गाईला पूज्य मानत नाहींत; व्रतबंध, विवाह इत्यादि संस्कार त्यांना मान्य नाहींत. धर्मशास्त्राप्रमाणें वारसाचे किंवा लग्नाचे कायदे करावेत हेंहि त्यांना जीर्णमतवादाचें द्योतक वाटतें. ते सुधारक आहेत आणि आपल्या सुधारकी मतांचें उघडपणें प्रतिपादन करतात. उलट कायदेआजमांची वृत्ति व वर्तन पाहा. त्यांच्या वागणुकींत इस्लाम धर्मात सांगितलेला एकहि नियम पाळलेला आढळून येणार नाहीं. पण ते नियम आतां बदलले पाहिजेत, कुराणाचें किंवा पैगंबराचें वाक्य या युगांत प्रमाण नाहीं, असें प्रतिपादन त्यांनीं कधींहि केलेलें नाहीं. ते सुधारकच नाहींत. उलट, प्रसंग येईल तेव्हां तेव्हां अगदी एखाद्या सनातनी गणंगाप्रमाणें ते सगळ्या चालीरीतींचें, परंपरेचें व रूढीचें समर्थन करण्यास कमी करीत नाहींत. याचा परिणाम असा झाला आहे कीं, मुसलमानेतराला कुराण छापण्याचा अधिकार नाहीं. पैगंबराच्या चरित्राची चिकित्सक मीमांसा करण्याची सोय नाहीं. उलट, श्रीकृष्णाच्या चरित्राची व श्रीरामाच्या चरित्राची तर्ककर्कश वृत्तीनें चिकित्सा करणारे अनेक धार्मिक व प्रतिष्ठित हिंदु आजहि विद्यमान आहेत. बौद्धिक स्वातंत्र्याचें हें समाजोपकारक तत्त्व जोंपर्यंत मुसलमान मोकळ्या मनानें स्वीकारणार नाहींत, तोंपर्यंत त्यांच्या धर्मनिष्ठेला बौद्धिकतेचें म्हणजे विचाराचें भक्कम अधिष्ठान कधींच लाभणार नाहीं. अशी धर्मनिष्ठा संकुचित संघटनेच्या कडव्या शिस्तीच्या जोरावर

कांहीं दिवस प्रभावशाली ठरली, तरी परिणामीं टिकणें शक्य नाहीं. कारण ईश्वर-कृपेनें माणसाला बौद्धिक गुलामगिरी यावच्चंद्रदिवाकरौ सहन होणें शक्य नाहीं.

## मुसलमान सुधारक झाला पाहिजे

(४) शेजाऱ्यावरील प्रेम म्हणजे परधर्मीयावरील प्रेमच आहे ही गोष्ट मुसलमानांनी ध्यानांत घेतली पाहिजे. आपला परधर्मीय शेजारी आपल्या मैत्रीचा, सेवेचा व सहाय्याचा प्रथम अधिकारी आहे. ही गोष्ट त्यांच्या मनांत बिंबली पाहिजे म्हणजे हळू हळू त्यांची सांप्रदायिकता नष्ट होईल. आज त्यांच्यांत लोकशाहीला आवश्यक अशी समानत्वाची भावना आहे. पण ती मुसलमानांपुरतीच मर्यादित आहे. एक मुसलमान दुसऱ्या मुसलमानाच्या ताटांत जेवील; त्याचें उष्टें देखील खाईल पिईल; पण तो आपल्या मुसलमानेतर शेजाऱ्याला समान हक्काचा अधिकारी मानणार नाहीं. या वृत्तीचा परिणाम असा होतो कीं, हिंदुस्थानांतल्या मुसलमानाला आपल्या परधर्मीय शेजाऱ्यापेक्षां तुर्कस्थानांतला व मिश्र देशांतला मुसलमान अधिक जवळचा वाटतो. त्यामुळें तो राष्ट्रीय चळवळीशीं समरस होऊं शकत नाहीं. तो ‘ वंदेमातरम् ’ हि म्हणणार नाहीं तर ‘ जय हिंद ’ हि म्हणणार नाहीं तर ‘ अल्ला हो अकबरच ’ म्हणेल. त्याच्या धर्माचा झेंडा व राष्ट्राचा झेंडा एकच राहील. ज्या देशांत ही स्थिति पालटली आहे, त्या देशांतील मुसलमान प्रगतिशील व क्रांतिप्रवण आहे. पण आमच्या देशांतील मुसलमानांत अजून प्रगतिशीलतेचा प्रादुर्भाव झालेला नाहीं. सुधारक वृत्ति जर उत्पन्न झाली नाहीं तर इस्लामची प्रगति व विकास खुंटलाच म्हणून समजा.

## क्रांतिनिष्ठ मुसलमानांचें कर्तव्य

(५) प्रत्यक्ष व्यवहारांत वरील तत्त्वांचें प्रतिपादन करून त्यांच्या अंमलबजावणीसाठीं चळवळ झाली पाहिजे. मान व परायण व उदारमनस्क मुसलमानांनी पडेल तें सोसून मशीदींतून, सभांतून, धर्मप्रवचनांतून मुसलमानांच्या मनावर हीं तत्त्वें सारखी ठसविलीं पाहिजेत. जो मुसलमान अन्यधर्मीय स्त्रीशीं बळजबरीनें निका लावील, तो अत्याचारी मानला गेला पाहिजे. त्याला या गुन्ह्याबद्दल सामाजिक व धार्मिक शासन झालें पाहिजे. त्यांच्या घरांत दाखल झालेल्या स्त्रीला सोडविण्यासाठीं सर्व प्रतिष्ठित मुसलमानांनीं एकचटून प्रयत्न केला पाहिजे. अन्यधर्मीयांची संपत्ति फक्त ते अन्यधर्मीय आहेत म्हणूनच लुटणारांना किंवा नष्ट करणारांना त्यांच्या धर्मबाह्य वर्तनाबद्दल कडक धार्मिक शासन झालें पाहिजे. एकापेक्षां जास्त स्त्रियांशीं लग्न

करणें हा गुन्हा ठरविण्यांत आला पाहिजे. जेथें जेथें संपत्तीचा विध्वंस आणि स्त्रियांचें अपहरण सांप्रदायिक दृष्टीनें झालें, तेथें तेथें त्या त्या भागांतील संभावित मुसलमानांनीं स्वत: प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. गांधींनीं आपल्या उदाहरणानें या बाबतींत कित्ता घालून दिलाच आहे. अशा अनेक सूचना करतां येतील. पण त्या ऐकतो कोण ? अन्यधर्मीयानें केलेल्या सूचना कोणत्या मुसलमानाला मान्य होणार आहेत ? क्वचित् एखाद्याच ! हें कार्य समाज-क्रांतिनिष्ठ मुसलमानांनीं केलें तरच होण्यासारखें आहे. ह्यासाठीं त्यांना अदम्य निश्चयाची, अढळ निष्ठेची अविचल धैर्याची व अचाट पराक्रमाची आवश्यकता आहे.

### हिंदु समाजावरील जबाबदारी

पण, मुसलमानांनीं या सर्व गोष्टी स्वयंस्फूर्तीनें न केल्या, तर त्यांच्या ठिकाणीं तशी प्रेरणा उत्पन्न करण्यासारखी परिस्थिति निर्माण करावी लागेल. हें कार्य हिंदूंचें व अन्य समाजनिष्ठ मुसलमानेतरांचें आहे. हिंदूंनीं जर जातीयतेला मूठमाती दिली तर जवळ जवळ त्या क्षणापासून मुसलमानांच्या सांप्रदायिकतेच्या अंताला आरंभ होईल, याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं. यासाठीं हिंदु समाजाच्या वृत्तींतहि क्रांतिकारक परिवर्तन होणें आवश्यक आहे.

## नवीन तत्त्वांचा स्वीकार करा

### बळजबरीनें कोणीहि बाटत नाहीं

( १ ) हिंदु होतां येत नाहीं, हें फार चांगलें. पण त्याबरोबरच एकदा जो हिंदु झाला, तो अहिंदु कधींच होत नाहीं, या नवीन तत्त्वाचा स्वीकार हिंदु समाजानें केला पाहिजे. पण जोंपर्यंत जात आहे, तोंपर्यंत हें साध्य होणार नाहीं. बळजबरीनें बाटविण्यांत आलेले हिंदु व भ्रष्ट करण्यांत आलेल्या स्त्रिया पुन्हा हिंदु-धर्माच्या कक्षेंत आल्या तरी हिंदु समाजांत दाखल होऊं शकत नाहींत. कारण, तो समाज जातिबद्ध आहे आणि जातिबद्धता म्हणजे रोटीबंदी व बेटीबंदी. उच्च-नीच-तेची भावना जातिबद्ध समाजाच्या पांचवीला पुजलेली असते. त्यांमुळें जो वर्ग समाजांत प्रतिष्ठित किंवा सत्ताधारी असतो, त्याला धर्मांतराची गरज साधारणपणें भासत नाहीं. त्याच्या सर्व महत्त्वाकांक्षांची व वासनांची तृप्ति होण्याची सोय समाजांत असते. पण जो खालचा वर्ग असतो, म्हणजे जो अनधिकारी अप्रतिष्ठित असतो, त्याला प्रतिष्ठेसाठीं अथवा समान अधिकारासाठीं संप्रदायबद्ध समाजांत प्रवेश करणें अधिक प्रशस्त व श्रेयस्कर वाटतें. हें हिंदुसमाजाचें मर्मस्थान आहे. हा

आमच्या समाज–पुरुषरूपी नलराजाच्या पायाचा आंगठा आहे. त्याच्या द्वारें हिंदुसमाजांत कलिवृत्तीचा म्हणजे कलागतीचा प्रवेश होतो. म्हणून हिंदुसमाजानें कायमचें असें ठरवून टाकलें पाहिजे कीं बळजबरीनें कुणीहि बाटत नाहीं; आणि स्वेच्छेनेंहि धर्म–परिवर्तन होऊं शकत नाहीं; कुठलीहि स्त्री बळजबरीनें भ्रष्ट होत नाहीं.

## जातीयता नष्ट करा

( २ ) हिंदुसमाजानें मुसलमानांच्या दोषांचें अनुकरण करणें सर्वथा निंद्य मानलें पाहिजे. दोषानें कुणाचीच उन्नति होत नाहीं. मुसलमान समाजांतील शक्तीचें अधिष्ठान त्या समाजांतील दोष नसून गुण आहेत. त्या समाजांतील एकात्मता व ऐक्यभावना यांचें अनुकरण करणें इष्ट व आवश्यक आहे. पण त्यासाठीं जातीयतेचा अंत झाला पाहिजे. जातीयतेचा अंत करून व्यापक ऐक्यभावनेचा विकास अवश्य करावा. पण त्या ऐक्यभावनेंत सांप्रदायिकतेचा दोष शिरूं देतां कामा नये.

## अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे

( ३ ) आत्मरक्षणासाठीं मनोबल व आवश्यक वाटल्यास शरीरबल संपादन करणें दरेकाचें कर्तव्य आहे. पण त्याचप्रमाणें अन्यायाचा प्रतिकारहि करणें प्रत्येकाचा धर्म आहे. पण त्यांत जातीचा अगर संप्रदायाचा फरक करतां कामा नये. जेथें भय असेल, तेथें अभयदान देणें, रक्षणाकांक्षा असेल तेथें रक्षणाची व्यवस्था करणें आणि अन्याय असेल तेथें प्रतिकार करणें, हा खरा धर्म आहे–तो सार्वजनिक आहे. सार्वजनिक म्हणजे जाति–संप्रदाय–वर्ण–निरपेक्ष.

## महिलांनाहि संरक्षणक्षम करा.

( ४ ) अन्यायाचा प्रतिकार म्हणजे सूड नव्हे. सूडानें कांहीं काळ परस्पर भीतीची शांतता प्रस्थापित होऊं शकेल. पण आपली अभीप्सित क्रांति मात्र होणार नाहीं. स्त्रियांच्या अपहरणाचें उदाहरण घेऊं. जे आमच्या स्त्रिया पळवितील, त्यांच्या स्त्रिया आम्हींहि पळवूं, असें धोरण स्वीकारल्यास कदाचित् एकमेकांचा जरब वाटून स्त्रिया पळविण्याच्या प्रकाराला आळा बसेल. पण तेवढ्यानें तो प्रश्न मात्र सुटणार नाहीं; आणि दोन्ही समाजांपैकीं कुठल्याहि समाजाची नैतिक भूमिका उन्नत होणार नाहीं. नैतिक भूमिकेला पोषक अशी शांतता प्रस्थापित

करण्याचे दोनच उपाय आहेत. एक, कोणत्याहि समाजांतील स्त्री पळविण्याची शक्यता राहूं नये. प्रत्येक नागरिकाला धर्मप्रचारकांनीं व समाजनेत्यांनीं तसें वळण लावलें पाहिजे. पण दुसरा मार्ग त्याहून अधिक कल्याणकारक व श्रेयस्कर आहे. तो असा कीं, स्त्री ही पळविण्याची वस्तूच राहतां कामा नये. सारांश समाजाची नैतिकता वाढविण्यासाठीं दरेकाला स्त्रियांचें रक्षण करतां येईल इतका पुरुषार्थ संपादन केला पाहिजे आणि दरेक स्त्री स्वसंरक्षणक्षम बनेल इतकी क्रांति घडवून आणतां आली पाहिजे.

## खरें धर्म–संघटन कोणतें ?

(५) आपण इंग्रजांसारखे झालों कीं आपली भरभराट होईल, असा भ्रम अव्वल इंग्रजींतील अनेक देशभक्तांना झाला होता. तसाच कांहींसा प्रकार हिंदु-संघटनाच्या कांहीं पुढाऱ्यांच्या बाबतींत झाला आहे. आपण मुसलमान न होतां, मुसलमानांसारखे झालों तरच तरणोपाय आहे, असा त्यांचा समज झाल्यासारखा दिसतो. परिणाम असा झाला कीं, हिंदुत्वाच्या रक्षणाच्या नांवाखालीं मुसलमानांचें विवेकहीन अनुकरण होऊं लागलें. ते बायकांना पडद्यांत ठेवतात, सहसा बाहेर पडूं देत नाहींत. तसें आपणहि करावें. कारण, त्या बंद राहिल्या म्हणजे सुरक्षित राहतात. ते मांस खातात म्हणून आपणहि खावें. कारण, मांसभक्षणानें शरीर रगदार होतें. ते आपला समाज मशीदीच्या आवारांत बंद ठेवतात. त्याला बाहेरचें वारें फारसें लागूं देत नाहींत. तसें आपणहि करावें कारण बाहेरचें वारें लागल्यानें विचारस्वातंत्र्य हवेसें वाटूं लागतें. ते इतर समाजांच्या विरुद्ध तावडतोब एकोपा करतात, तसा आपणहि त्यांच्या विरुद्ध केला पाहिजे; आणि हळू हळू हिंदु संघटनेचा विस्तार मुसलमानेतर संघटनांत झाला पाहिजे; ही वृत्ति सर्वथा त्याज्य मानली पाहिजे. कारण तिच्यामुळें हिंदुत्वाचें स्वरूपच अजिबात नष्ट होतें. इतर धर्मांचें गुण आत्मसात् केल्यानें आपला धर्म व समाज समृद्ध आणि बलवान होतो. अन्यधर्मीय लोक जर या मार्गाचा अवलंब करणार नाहींत, तर ते करंटे व नादान ठरतील; आणि शेवटीं त्यांची शक्ति क्षीणच होईल. त्यामुळें या बाबतींत आपण यांचें अनुकरण करण्याचें कारण नाहीं. स्वधर्मांतील दोषांचें निवारण करून अन्यधर्मांतील गुणग्रहण करणें म्हणजेच खरें धर्मसंघटन. जाति वर्ण-संप्रदाय-निरपेक्ष अन्यायाच्या प्रतिकाराबरोबर धर्मसंघटनाची ही पद्धति जर हिंदु समाजानें स्वीकारली तर तो समाज स्वतः धन्य होईल, आणि आपल्या पुरुषार्थानें इतर समाजांनाहि धन्य करील.

### गांधीजी हाच खरा धार्मिक पुरुष

या सर्व विवेचनावरून दिसून येईल कीं, या देशांत गांधी हाच खरा धार्मिक पुरुष आहे. त्याची मानवनिष्ठा निरपवाद व अप्रतिबद्ध आहे. तोच खरा हिंदु आहे. कारण त्याचा सैतानावर विश्वास नाहीं. दुर्जनाच्या हृदयांत देखील भगवंताची वसति आहे अशी त्याची अद्भुत श्रद्धा आहे. म्हणून आतां तर त्यानें असेंहि जाहीर करून टाकलें कीं, गुंड म्हणून कुणी निराळा प्राणी अगर निराळी जात नाहींच.

गांधी हेच खरे मुसलमान आहेत. कारण ते एकच देव मानतात. हिंदूंचा देव निराळा व मुसलमानांचा निराळा, असें मानणें त्यांच्या मतें देवद्रोहाचें लक्षण आहे. ते महंमदाला खुदाचा रसूल मानतात; पण यामुळें इतर रसूलांचा इन्कार करीत नाहींत.

तेच खरे ख्रिस्ती आहेत. कारण, पर्वतावरील दिव्य प्रवचनाचा विनियोग सामाजिक जीवनांत करण्याचा महान् प्रयोग त्यांनीच केला आहे.

### गांधींच्या धोरणाचीं तीन अचल तत्त्वें

गांधींच्या मूलभूत धोरणाचीं तीन अविचल अधिष्ठात्री तत्त्वें आहेत.

एक-माणसावरील विश्वास म्हणजेच ईश्वरावरील श्रद्धा; आणि माणूस म्हटला की त्यांत दुर्जनहि आलाच; म्हणून दुर्जनावरहि अविश्वास ठेवणें हें नास्तिकतेचें लक्षण आहे. त्यामुळें त्यांना कुणी परका नाहीं; कुणी शत्रु नाहीं. पूर्व बंगाल्यांत एकाकी जाऊं नका, तुमच्या जीवाला भीति आहे; अशी शंका जेव्हां जिव्हाळ्याचीं माणसें बोलून दाखवूं लागलीं, तेव्हां आस्तिकांचे मुकुटमणि गांधी म्हणाले, ‘अरे ज्या लोकांत मी जात आहे, ते काय माझे सोबती नाहींत? मी तर एखाद्या मुस्लिम-लीगच्या माणसाकडे जाऊन राहूं इच्छितों. मी जेथें जाईन, तेथें सर्व माझेच आहेत. परका असा कुणी नाहीं. मग भीति कशाची?’

दोन—आमचा देश मानव्याची योगभूमि व प्रयोगभूमि आहे. या देशांत निरनिराळया वर्णांचे व धर्मांचे लोक गुण्यागोविंदानें एकत्र नांदावे आणि त्यांनीं परस्परांचें जीवन सुखी व समृद्ध करावें, असा ईश्वरी संकल्प आहे. म्हणून आमचा हिंदुस्थान मानव्याचें प्रयाग आहे. या अर्थानें ती पुण्यभूमि आहे; योगभूमि आहे. येथें जर धर्मवाद माजले आणि धर्माच्या नांवावर मनुष्यद्रोहाचें थैमान सुरू झालें तर ही पुण्यभूमि कलिभूमि होईल; नापाकिस्तान होईल.

तीन—समाजद्रोही व्यक्तींपासून शांतताप्रिय नागरिकांचें रक्षण करण्यासाठीं आणि समाजांत अशी व्यवस्था आणि कायद्याची मर्यादा कायम ठेवण्याकरितां पोलिसांचा आणि क्वचित् प्रसंगीं लष्कराचाहि उपयोग करावा लागला, तरी क्षम्य मानतां येईल.

पण दोन भिन्नधर्मीय समाजांत शांतता कायम ठेवण्याकरितां जर पोलिसांचा व लष्कराचा उपयोग करणें प्रत्यहीं आवश्यक होऊं लागलें, तर इंग्रजी राज्याचीं पाळेमुळें या देशांत आणखी पक्की रुजतील. कारण हिंदी–हिंदु व हिंदी–मुसलमान यांच्यांत शांतता ठेवण्याकरितां तिऱ्हाइताची गरज लागेल. म्हणजे इंग्रजांची प्रतिष्ठा वाढेल आणि त्यांची सत्ता दृढमूल होईल. या देशांत इंग्रजांची सत्ता उरूं नये असें प्रतिपादन करणारा आमचा सर्वश्रेष्ठ पुढारी, पुरुषार्थाचा एकमात्र मार्ग एकटाच चोखाळीत आहे. हिंदु–मुसलमानांनीं एकमेकांवर विश्वास ठेवल्याखेरीज इंग्रजांचें प्रस्थ मोडणार नाहीं; म्हणून विश्वास ठेवण्याचा प्रयोग मुसलमान करीत नसतील तर मी करीन, अशा आत्मप्रयत्नानें हा अद्वितीय वीर पुरुष पुढें सरसावला आहे. लोकवस्तींची अदलाबदल करा म्हणणारे वियोगवादी, कलहप्रिय, व्यवच्छेदक वृत्तीचे कायदेआजम कुणीकडे आणि माणसामाणसांची ताटातूट करूं नका, नामशेष व्हा, पण विभक्त होऊं नका, असा उपदेश करून त्याप्रमाणें धैर्यानें प्रयोग करणारा मानव्यनिष्ठ गांधी कुणीकडे! गांधी म्हणतात, इंग्रजांचें राज्य नको आहे. म्हणूनच हिंदु–मुसलमानांचें संयुक्त जीवन हवें आहे.

## सागरासारखें व्यापक व गंगेसारखें पवित्र तत्त्वज्ञान

गांधींच्या विचारसरणीचा आणि आचारसरणीचा पाया हा असा उदात्त, शास्त्रशुद्ध आणि वस्तुनिष्ठ आहे. जगांत सर्वत्र जातिवादाचें व संप्रदायाचें स्तोम माजलें असतांना, चहुकडे तलवारीची आणि शस्त्रास्त्रांची भाषा ऐकूं येत असतांना, मानव मानवाचा वैरी बनण्यांतच आपल्या जीवनाचें सार्थक मानीत असतांना, जो महाभाग उच्च स्वरानें, मला माझ्या अहिंसेची शरम वाटत नाहीं, असें नम्र आत्मप्रत्ययानें सांगतो, मानवद्रोहाच्या विषारी झंझावातांत ज्याची मानव्यनिष्ठा विझून न जातां वरती उफाळते त्याचें चरित्र व चारित्र्य, त्याचें तत्त्वज्ञान व धोरण सागरासारखें व्यापक आहे, गंगेसारखें पवित्र आहे आणि गौरीशंकरासारखें उज्ज्वल व उत्तुंग आहे. कालिदासाचा देवतात्मा हिमालय हा जर पृथ्वीचा मानदंड असेल, तर मानवात्मा गांधी हा अखिल मानवतेचा मानदंड आहे. त्याच्या वृत्तीवरून, उक्तीवरून व कृतीवरून मानवतेची लांबी, रुंदी, उंची व खोली मोजतां येते. अशा महा मानवात्म्याला, त्याच्या अकुंठित निष्ठेला, त्याच्या अमर्याद पराक्रमाला, त्याच्या अनंत वीर्याला, त्याच्या अमित विक्रमाला शतशः प्रणाम. ' नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते '–हेंच मानवाचें भव्य, पुण्यकारक आणि कल्याणमय ' विश्वदर्शन ' आहे!

—ता. २६–११–४६
" तरुणभारत " विशेषांक १९४७

●